# महाविद्यालयातील ठळक वैशिष्ट्ये

- स्वच्छ, सुंदर व निसर्गरम्य परिसर
- व्यक्तिमत्व विकासास संधी
- भव्य व सुसज्ज प्रयोगशाळा, विज्ञान कार्यशाळा
- कमवा व शिका योजना
- भव्य प्रेक्षागृह, सेमिनार हॉल
- कॅन्टीन व बेकरी
- सुसज्ज, वातानुकूलित अलिशान संगणक प्रयोगशाळा
- मुला-मुलींसाठी स्वंतत्र वसतिगृहे व मेस
- प्रशस्त, समृध्द परिपूर्ण ग्रंथालय आणि पुस्तक पेढीची सोय
- विद्यार्थी सहकारी ग्राहक भांडार
- भाषा विज्ञान प्रयोगशाळा
- मागासवर्गीय विद्यार्थ्यांना सर्व प्रकारच्या सोयी व सवलती
- दृकश्राव्य साधनांचा वापर
- विविध प्रकारच्या सरकारी आर्थिक सवलती व शिष्यवृत्त्या
- तज्ज्ञ व अनुभवी प्राध्यापक वर्ग
- विविध पारितोषिके
- सामान्यज्ञान परीक्षेची सोय
- यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ (नाशि
- इलेक्ट्रॉनिक्स, कॉम्प्युटर, माहिती व तंत्रशिक्षणाची
- वाणिज्य प्रयोगशाळा
- स्पर्धात्मक परिक्षांचे केंद्र, व्यावसायिक व करिअर
- वर्किंग वुमेन्स होस्टेल
- बँकेची सुविधा
- सेवकांची सहकारी पतसंस्था
- विविध विषयांवरील चर्चासत्रे व परिसंवाद
- करिअर ओरिएंटेड प्रोग्राम्स्
- कविवर्य मोरोपंत वादविवाद व वक्तृत्व स्पर्धा
- विद्यापीठ व बोर्ड परिक्षेत उज्ज्वल यशाची दीर्घ परं
- सुसज्ज व्यायामशाळा, खेळांची सोय, योगाभ्यास कें
- प्रिंटींग प्रेस
- राष्ट्रीय छात्रसेना (एन.सी.सी.) आर्मी विंग
- राष्ट्रीय सेवा योजना (एन.एस.एस.)
- एम.एच.टी. - सी.ई.टी.मार्गदर्शन केंद्र




अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे

**तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय कला, विज्ञान व वाणिज्य, बारामती**

बारामती ४१३ १०२, जिल्हा - पुणे, महाराष्ट्र (भारत)

दूरध्वनी : (०२११२) २२२४०५, फॅक्स : (०२११२) २२२७२८ वेबसाईट : www.tccollege.org. ई-मेल : principal@tccollege.org

printom269@gmail

अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे

# तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय
## कला, विज्ञान व वाणिज्य बारामती



कनिष्ठ

# अनेकान्त

२०१८-१९

अंक दुसरा



प.पू.यशाजी महाराज साहेब
प.पू.रोहिणी महाराज साहेब
यांची महाविद्यालयास सदिच्छा भेट
व आशीर्वचन



अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचा वर्धापन दिन समारंभ
**अनेकान्त प्रकाशन सोहळा**



मा.खासदार श्री. अमर साबळे यांच्या उपस्थितीत
उद्योजकता विकास केंद्राचे प्रासंगिक उद्घाटन



मा.खासदार श्री. अमर साबळे यांच्या समवेत
संस्थेचे पदाधिकारी संवाद साधताना



उद्योजकता विकास केंद्राचे ऑनलाईन उद्घाटन प्रसंगी उपस्थित मा



कनिष्ठ
# अनेकान्त

नियतकालिक : २०१८ - २०१९
(अंक दुसरा)

अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे
## तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय कला, विज्ञान व वाणिज्य बारामती

* धार्मिक अल्पसंख्यांक संस्था *
नॅक पुनर्मूल्यांकन 'A+' (CGPA 3.55)
एच.एस.सी. बोर्ड कोड नं. V.11.02.001 (1976-77)

## संपादक मंडळ

प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर – अध्यक्ष
श्री. राजेंद्र आगवणे – संपादक
श्री. अभिनंदन शहा – प्रबंधक
श्री. गोरखनाथ मोरे – समन्वयक (शास्त्र शाखा)
सौ. वैशाली माळी – उपप्राचार्य

सौ. स्मिता मंगुडकर, श्री. प्रविण यादव, श्री. योगेश सोन्रा, श्री. संजय शेंडे, श्री. मानाजी गावडे
सौ. प्रियांका सायकर, श्रीमती क्षितीजा दोशी, श्री. अशोक देवकर, श्री. सचिन सोन्रा, श्री. किशोर भोसले



## || अनेकान्त एज्युकेशन सोसायटी, बारामती : नियामक मंडळ ||


मा. श्री. जवाहर शाह (वाघोलीकर)
सचिव


मा. श्री. अरहतदास हिराचंद शहा (सराफ)
अध्यक्ष


मा. श्री. सुनिल शिवलाल शहा (लेंगरेकर)
खनिजदार


मा. श्री. राजकुमार तुळजाराम शाह (वाघोलीकर)


मा. श्री. सुभाष माणिकलाल शाह (वाघोलीकर) (१४ मार्च २०१९पर्यंत)


मा. श्री. चंद्रगुप्त माणिकलाल शाह (१७ मार्च २०१९ पासून)


मा. श्री. चकोर नलिनचंद्र गां


मा. डॉ. श्री. सुभाष बापुराव अडदंडे


मा. श्री. पद्माकर पायगोंडा पाटील


मा. डॉ. श्री. महावीर रायप्पा अक्कोळे


मा. श्री. मिलिंद राजकुमार श (वाघोलीकर)


मा.श्री.विकास शशिकांत शहा (लेंगरेकर)


मा.श्री.चंद्रवदन विद्याचंद्र शहा (मुंबईकर)


मा.डॉ.श्री.धवलकुमार शामगोंडा पाटील


मा.श्री.अशोक सुरेंद्र शिरगुप्पे


मा.श्री.जिनेंद्र भाऊ द

अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे
तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय कला, विज्ञान व वाणिज्य, बारामती
कनिष्ठ अनेकान्त २०१८-१९

## हार्दिक अभिनंदन



**प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर**

* थायलंड येथील ICRAIR-2019 मध्ये Nitrogen Partitioning in Airispolochia Bracteolate Lam या विषयावर प्रबंध
* इंडियाज ग्रेटर मेकाँग सबरिझन इंटरनॅशनल कॉन्फरन्स ऑन इमर्जिंग ट्रेंड्स् इन सोशल सायन्सेस अ‍ॅण्ड मॅनेजमेंट F.R. Angel, Goa येथे शोध निबंध व मार्गदर्शक तज्ज्ञ


**सौ. अनिता पाटील**
महाराष्ट्र राज्य पाठ्य पुस्तक मंडळाच्या पर्यावरणशास्त्र अभ्यास गटात निवड (इ. ११वी, १२वी)


**सौ. वैशाली माळी**
कृतिशील शिक्षिका पुरस्कार प्राप्त महाराष्ट्र राज्य शाळा कृति समिती (सन २०१८-१९)


**श्री. राजेंद्र आगवणे**
एस. एस. सी. बोर्ड परीक्षा फेब्रुवारी २०१९ विषय - मराठी मुख्य नियामक नियुक्ती


**श्री. सचिन बारटक्के**
महाराष्ट्र राज्य पाठ्य पुस्तक मंडळाच्या रसायनशास्त्र अभ्यास गटात निवड (इ. ११वी, १२वी)


**सौ. मुग्धा टाकसाळे**
महाराष्ट्र राज्य पाठ्य पुस्तक मंडळाच्या अभ्यास गटात निवड (इ. ११वी, १२वी)


**श्री. सुभाष साखरे**
भूगोल प्रज्ञाशोध केंद्र नवी मुंबई - यांच्यातर्फे दिला जाणारा आदर्श भूगोल शिक्षक पुरस्कार प्राप्त सन २०१८


**श्री. संजय खोमणे**
उपक्रमशील शिक्षक - पुरस्कार (भूगोल)


इंग्रजी विषयाचे जेष्ठ शिक्षक श्री. भुजंगा सरवदे दि. ३१/५/२०१९ रोजी सेवा निवृत्त झाले. त्याप्रसंगी निरोप समारंभपूर्वक सन्मान करताना मा. प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर



मा. उपप्राचार्य सौ. वैशाली माळी कृतिशील शिक्षिका म्हणून महाराष्ट्र राज्य शाळा कृति समितीतर्फे मा.आमदार श्री. सावंत दत्तात्रय यांच्याकडून सन्मान स्वीकारताना

## ॥ कनिष्ठ विभागाचे यशवंत विद्यार्थी ॥


शिंदे ऋतिका
११वी कला, प्रथम
९५.२३%


शेख सानिया
११वी कला, द्वितीय
९३.६९%


भणगे केतकी
११वी कला, तृतीय
८७.३८%


प्राची ननवरे
११वी वाणिज्य, प्रथम
९२.३१%


शहा भूमी
११वी वाणिज्य, द्वितीय
९०.४६%


शिंदे शरयू
११वी वाणिज्य, तृतीय
८९.३८%


गांधी श्रीया
११वी शास्त्र, प्रथम
९४.११%


स्वामी शिवलिंग
११वी शास्त्र, द्वितीय
९३.८५%


भोपळे ओंकार
११वी शास्त्र, तृतीय
९२.६२%


होळकर आशिष
११वी ऑटो, प्रथम
८५.५४%


गुंजी कात्यायनी
११वी बेकरी, प्रथम
८१.६९%


पाटोळे दत्तात्रय
१२वी कला, प्रथम
८२.७७%


खर्डेकर ऋतुजा
१२वी कला, द्वितीय
८०.९२%


लाळगे आरती
१२वी कला, तृतीय
७९.५४%


दुगड कल्याणी
१२वी वाणिज्य, प्रथम
९०.६१%


खैरे नेहा
१२वी वाणिज्य, द्वि
८४.४६%


कल्याणकर श्रेयस
१२वी वाणिज्य, तृतीय
८३.२५%


शिंदे निखिल
१२वी शास्त्र, प्रथम
९३.५४%


पोंदकुले हर्षल
१२वी शास्त्र, द्वितीय
९२.३१%


गादिया सिध्दाली
१२वी शास्त्र, तृतीय
९१.५४%


शेख अमन
१२वी ऑटो, प्रथम
७६.६१%


सातपुते रूचा
१२वी बेकरी, प्र
७१.६९%

राष्ट्रपिता महात्मा गांधी
यांना
विनम्र अभिवादन.....



चित्रकार : श्री जितेंद्र काकडे
(अकरावी शास्त्र)

# अनेकान्त
## कनिष्ठ महाविद्यालय

अनेकान्त एज्युकेशन सोसायटी,

# नियामक मंडळ

| अ.क्र. | पदाधिकारी सदस्य | गांव | पद |
|---|---|---|---|
| १) | मा.श्री. अरहतदास हिराचंद शहा (सराफ) | बारामती | अध्यक्ष |
| २) | मा.श्री. जवाहर मोतीलाल शाह (वाघोलीकर) | बारामती | सचिव |
| ३) | मा.श्री. सुनील शिवलाल शहा (लेंगरेकर) | बारामती | खजिनदार |
| ४) | मा.श्री. राजकुमार तुळजाराम शाह (वाघोलीकर) | बारामती | सदस्य |
| ५) | मा.श्री. चकोर नलिनचंद्र गांधी | पुणे | सदस्य |
| ६) | मा.श्री. सुभाष माणिकलाल शाह (वाघोलीकर) (दि. १४-०३-२०१९ पर्यंत) | पुणे | सदस्य |
| ७) | मा.श्री. मिलींद राजकुमार शाह (वाघोलीकर) | बारामती | सदस्य |
| ८) | मा. श्री. चंद्रगुप्त माणिकलाल शाह (वाघोलीकर) (दि. १७-०३-२०१९ पर्यंत) | बारामती | सदस्य |
| ९) | मा.श्री. डॉ. सुभाष बाबुराव अडदंडे | जयसिंगपूर | सदस्य |
| १०) | मा.श्री. पद्माकर पायगोंडा पाटील | जयसिंगपूर | सदस्य |
| ११) | मा.श्री. विकास शशिकांत शहा (लेंगरेकर) | बारामती | सदस्य |
| १२) | मा.श्री. चंद्रवदन विद्याचंद्र शहा (मुंबईकर) | बारामती | सदस्य |
| १३) | मा.श्री. डॉ. महावीर रायाप्पा अक्कोळे | जयसिंगपूर | सदस्य |
| १४) | मा.श्री. डॉ. धवलकुमार शामगोंडा पाटील | जयसिंगपूर | सदस्य |
| १५) | मा.श्री. अशोक सुरेंद्र शिरगुप्पे | जयसिंगपूर | सदस्य |
| १६) | मा.श्री. जिनेंद्र भाऊ दत्तवाडे | जयसिंगपूर | सदस्य |

# कनिष्ठ महाविद्यालय शाळा समिती

| अ.क्र. | पदाधिकारी सदस्य | गांव | पद |
|---|---|---|---|
| १) | मा.श्री. अरहतदास हिराचंद शहा (सराफ) | बारामती | अध्यक्ष |
| २) | मा.श्री. डॉ.चंद्रशेखर वसंतराव मुरुमकर (प्राचार्य) | बारामती | सचिव |
| ३) | मा.श्री. जवाहर मोतीलाल शाह (वाघोलीकर) | बारामती | सदस्य |
| ४) | मा.श्री. मिलींद राजकुमार शाह (वाघोलीकर) | बारामती | सदस्य |
| ५) | मा. सौ. वैशाली भगवान माळी | बारामती | सदस्या |
| ६) | मा.श्री. राजेंद्र कोंडीबा आगवणे | बारामती | निमंत्रित |
| ७) | मा.श्री. गोरखनाथ तुकाराम मोरे | बारामती | निमंत्रित |

# पालक, शिक्षक संघ कार्यकारिणी २०१७-१९

H.S.C.Board Code No. : J. 11.02.011 (1976-77)
U-DISC No. 27250211827

| अ.क्र. | पदाधिकारी सदस्य | पद |
|---|---|---|
| १) | डॉ.चंद्रशेखर वसंतराव मुरुमकर (प्राचार्य) | अध्यक्ष |
| २) | श्री. रामकृष्ण मारुतराव धालपे | सचिव |
| ३) | श्री. हनुमंत विठोबा नाळे | उपाध्यक्ष (पालक प्रतिनिधी) |
| ४) | सौ. वैशाली भगवान माळी (उपप्राचार्य) | उपाध्यक्ष |
| ५) | श्री. मनोहर राजाराम हगारे | सहसचिव (पालक प्रतिनिधी) |
| ६) | सौ. निता नंदकुमार डोंबे | सहसचिव (पालक प्रतिनिधी) |





**वार्षिक निकाल २०१७ - १८ संकलित निकाल**

**इयत्ता - अकरावी, शाखा - कला, शास्त्र, वाणिज्य व व्यवसाय शिक्षण**

| अ. क्र. | तपशील | शाखा | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | कला | शास्त्र | वाणिज्य | ऑटो | बेकरी | एकूण |
| १ | परीक्षेस बसलेले एकूण विद्यार्थी | ५०१ | ८७१ | ५२९ | ५६ | २६ | १९८३ |
| २ | उत्तीर्ण विद्यार्थी संख्या | ४३८ | ८३८ | ५१६ | ५३ | २२ | १८६७ |
| ३ | अनुत्तीर्ण विद्यार्थी संख्या | ६३ | ३३ | १३ | ०३ | ०४ | ११६ |
| ४ | निकालाची टक्केवारी | ८७.४३% | ९६.२१% | ९७.५४% | ९४.६४% | ८४.६२% | ९४.१५% |
| ५ | विशेष प्राविण्यासह प्रथम श्रेणी | १५ | ११२ | ९२ | ०१ | ०१ | २२१ |
| ६ | प्रथम श्रेणी | ६० | ३०० | १७१ | १६ | ०७ | ५५४ |
| ७ | द्वितीय श्रेणी | १५७ | ३३९ | २१० | २० | ०९ | ७३५ |
| ८ | तृतीय श्रेणी | २०६ | ८७ | ४३ | १६ | ०५ | १४१ |

**इयत्ता - बारावी**

| अ. क्र. | तपशील | शाखा | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | कला | शास्त्र | वाणिज्य | ऑटो | बेकरी | एकूण |
| १ | परीक्षेस बसलेले एकूण विद्यार्थी | ३६४ | ७४५ | ४६८ | ४९ | १७ | १६४३ |
| २ | उत्तीर्ण विद्यार्थी संख्या | २५२ | ७३४ | ४४४ | ३८ | ११ | १४७९ |
| ३ | अनुत्तीर्ण विद्यार्थी संख्या | ११२ | ११ | २३ | ०९ | ०५ | १६० |
| ४ | निकालाची टक्केवारी | ६९.२३% | ९७.५२% | ९५.०७% | ८०.८५% | ६८.७५% | ९०.०१% |
| ५ | विशेष प्राविण्यासह प्रथम श्रेणी | ०८ | ८४ | ४० | ०१ | - | १३३ |
| ६ | प्रथम श्रेणी | ४१ | २६५ | १६८ | ११ | ०७ | ४९२ |
| ७ | द्वितीय श्रेणी | १३७ | ३६७ | २०६ | २६ | ०४ | ७४० |
| ८ | तृतीय श्रेणी | ६६ | १८ | ३० | - | - | ११४ |

**श्री. गोरखनाथ मोरे**
समन्वयक - शास्त्रशाखा व व्यवसाय शिक्षण

**श्री. राजेंद्र आगवणे**
समन्वयक - कला व वाणिज्य शाखा

**सौ. वैशाली माळी**
उपप्राचार्य

## गुणवंत विद्यार्थी

### एप्रिल २०१७-१८ मध्ये घेण्यात आलेल्या वार्षिक परीक्षांमध्ये गुणानुक्रमे प्रथम तीन क्रमांकाने उत्तीर्ण झालेले विद्यार्थी

| अ. क्र. | वर्ग व शाखा | विद्यार्थ्यांचे नाव | गुण | गुणानुक्रमे |
|---|---|---|---|---|
| १ | अकरावी कला | कु. शिंदे ऋतिका गणेश | ९५.२३% | I |
| २ | अकरावी कला | कु. शेख सानिया अयुब | ९३.६९% | II |
| ३ | अकरावी कला | कु. भणगे केतकी निशिकांत | ८७.३८% | III |
| ४ | अकरावी शास्त्र | कु. गांधी श्रीया स्वप्निल | ९४.१५% | I |
| ५ | अकरावी शास्त्र | श्री. स्वामी शिवलिंग सोमनाथ | ९३.८५% | II |
| ६ | अकरावी शास्त्र | श्री. भोपळे ओंकार संजय | ९२.६२% | III |
| ७ | अकरावी वाणिज्य | कु. ननावरे प्राची विनोद | ९२.३१% | I |
| ८ | अकरावी वाणिज्य | कु. शहा भूमी अमितकुमार | ९०.४६% | II |
| ९ | अकरावी वाणिज्य | कु. शिंदे शरयु दिपक | ८९.३८% | III |
| १० | अकरावी ऑटो | श्री. होळकर आशिष खंडेराव | ८५.५४% | I |
| ११ | अकरावी बेकरी | कु. गुंजी कात्यायानी चंद्रशेखर | ८१.६९% | I |

### फेब्रुवारी २०१७ मध्ये घेण्यात आलेल्या बोर्ड परीक्षांमध्ये गुणानुक्रमे प्रथम तीन क्रमांकाने उत्तीर्ण झालेले विद्यार्थी

| अ. क्र. | वर्ग व शाखा | विद्यार्थ्यांचे नाव | गुण | गुणानुक्रमे |
|---|---|---|---|---|
| १ | बारावी कला | श्री. पाटोळे दत्तात्रय बंडू | ८२.७७% | I |
| २ | बारावी कला | कु. खर्डेकर ऋतुजा संजय | ८०.९२% | II |
| ३ | बारावी कला | कु. लाळगे आरती दत्तात्रय | ७९.५४% | III |
| ४ | बारावी शास्त्र | श्री. शिंदे निखील अशोक | ९३.५४% | I |
| ५ | बारावी शास्त्र | श्री. पोंदकुले हर्षल सुशीलकुमार | ९२.३१% | II |
| ६ | बारावी शास्त्र | कु. गादिया सिद्धाली विनोदकुमार | ९१.५४% | III |
| ७ | बारावी वाणिज्य | कु. दुगड कल्याणी अशोक | ९०.६१% | I |
| ८ | बारावी वाणिज्य | कु. खैरे नेहा मोरेश्वर | ८४.४६% | II |
| ९ | बारावी वाणिज्य | श्री. कल्याणकर श्रेयश गणेश | ८३.२३% | III |
| १० | बारावी ऑटो | श्री. शेख अमन सादिक | ७६.६१% | I |
| ११ | बारावी बेकरी | कु. सातपुते रुचा ऋषिकेश | ७१.६९% | I |

**श्री. गोरखनाथ मोरे**
**समन्वयक - शास्त्रशाखा व व्यवसाय शिक्षण**

**श्री. राजेंद्र आगवणे**
**समन्वयक - कला व वाणिज्य शाखा**

**सौ. वैशाली माळी**
**उपप्राचार्य**





अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे

# तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती

शैक्षणिक वर्ष २०१८ - २०१९

## कनिष्ठ महाविद्यालय अंतरंग - दृष्टिक्षेप

| अ. क्र. | दिनांक | उपक्रम / विषय | प्रमुख वक्ते | कार्यक्रमाचे अध्यक्ष |
|---|---|---|---|---|
| १ | १२-०६-२०१८ | **बारावी बोर्ड परीक्षा** मार्च २०१८ इ. बारावी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार | - | प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर |
| २ | १८-०६-२०१८ | शिक्षकांसाठी मार्गदर्शनपर व्याख्यान | मा. प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर | प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर |
| ३ | १२-०७-२०१८ | शिक्षकांसह सहविचार सभा | मा. प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर | उपप्राचार्य सौ. वैशाली माळी |
| ४ | २८-०७-२०१८ | पर्यावरण शिक्षण प्रकल्प अंतर्गत क्षेत्रभेट | - | प्रा. अनिता पाटील पर्यावरण विभाग |
| ५ | ०१-०८-२०१८ | इ. ११ वी सर्व शाखेतील विद्यार्थी स्वागत समारंभ | मा. प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर | प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर |
| ६ | ०७-०८-२०१८ | कारगिल विजय दिन- व्याख्यान | निवृत्त ब्रिगेडियर श्री. हेमंत महाजन | उपप्राचार्य डॉ. सचिन गाडेकर |
| ७ | ०८-०८-२०१८ | स्मार्ट गर्ल कार्यशाळा | डॉ. सुहासिनी सातव नगरसेविका, बारामती, नगरपरिषद | प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर |
| ८ | ११-०८-२०१८ | जीवशास्त्र विभाग अभ्यास मार्गदर्शन | प्रा. मनिषा मांढरे मॉडर्न कॉलेज, पुणे | उपप्राचार्य सौ. वैशाली माळी |
| ९ | ११-०८-२०१८ | वसुंधरा वाहिनी विद्यार्थ्यांचा संवाद | ऋतुजा आगम, निवेदिका वसुंधरा वाहिनी, बारामती | प्रा. बी. एन. कुंभार प्रा. जगताप जी. एस. |
| १० | १५-०८-२०१८ | १५ ऑगस्ट दिनी वृक्षारोपण कार्यक्रम | मा. श्री. जवाहर शाह (वाघोलीकर) सचिव, अनेकान्त एज्यु. सो. | पर्यावरण संवर्धन समिती |
| ११ | २१-०८-२०१८ | संपूर्ण स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन एकदिवसीय कार्यशाळा | निखिल नानगुडे, ज्ञानोदय ॲकडमी, पुणे संचालक प्रा. विजयसिंह घाडगे | प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर |

अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे

# तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती

शैक्षणिक वर्ष २०१८ – २०१९

**कनिष्ठ महाविद्यालय अंतरंग – दृष्टिक्षेप**

| अ. क्र. | दिनांक | उपक्रम / विषय | प्रमुख वक्ते | कार्यक्रमाचे अध्यक्ष |
|---|---|---|---|---|
| १२ | २४-०८-२०१८ | वसुंधरा वाहिनी विद्यार्थ्यांचा संवाद | ऋतुजा आगम, निवेदिका वसुंधरा वाहिनी, बारामती | प्रा. बी. एन. कुंभार प्रा. जगताप जी. एस. |
| १३ | २४-०८-२०१८ | पालक – शिक्षक संघ सभा | पालक सदस्य | उपप्राचार्य सौ. वैशाली माळी |
| १४ | ०२-०९-२०१८ | पर्यावरण संवर्धन अर्थशास्त्र | प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर | पर्यावरण संवर्धन समिती |
| १५ | ०५-०९-२०१८ | शिक्षक दिन | उपप्राचार्य सौ. वैशाली माळी | व्यक्तिमत्त्व विकास समिती |
| १६ | ०६-०९-२०१८ | मी वाचलेले प्रभावी पुस्तक | प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर | पुस्तक प्रेमी मंडळ |
| १७ | ०८-०९-२०१८ | स्मार्ट गर्ल कार्यशाळा | डॉ. निकिता मेहता | प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर |
| १८ | ११-०९-२०१८ | संगणक विभागाचे मार्गदर्शनपर व्याख्यान | प्रा. अमोल गोडसे बी.सी.ए. कॉलेज | श्री. गोरखनाथ मोरे समन्वयक व व्यवसाय अभ्यासक्रम |
| १९ | १५-०९-२०१८ | अभियंता दिन | प्रा. निवृत्ती बोरावके | उपप्राचार्य सौ. वैशाली माळी |
| २० | १७-०९-२०१८ | संगणक विभागाचे मार्गदर्शनपर व्याख्यान | श्री. कुणाल वेरूळे बजाज, प्रा. लि. नागपूर | श्री. गोरखनाथ मोरे समन्वयक व व्यवसाय अभ्यासक्रम |
| २१ | १८-०९-२०१८ | हिंदी दिन | प्रा. डॉ. मिलिंद कांबळे विद्या प्रतिष्ठान कॉलेज. बारामती | श्री. राजेंद्र आगवणे समन्वयक कला व वाणिज्य |
| २२ | २१-०९-२०१८ | पर्यूषणपर्व निमित्त निबंध व चित्रकला स्पर्धा | – | अनेकान्त अविष्कार समिती |





अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे

# तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती

शैक्षणिक वर्ष २०१८ – २०१९

**कनिष्ठ महाविद्यालय अंतरंग – दृष्टिक्षेप**

| अ. क्र. | दिनांक | उपक्रम / विषय | प्रमुख वक्ते | कार्यक्रमाचे अध्यक्ष |
|---|---|---|---|---|
| २३ | २२-०९-२०१८ | वाणिज्य विभागातील करिअर संधी मार्गदर्शनपर व्याख्यान | कु. सोनिया चकोर शहा सी. ए., पुणे | उपप्राचार्य सौ. वैशाली माळी |
| २४ | २४-०९-२०१८ | व्यक्तिमत्त्व विकास कार्यशाळा | – | उपप्राचार्य सौ. वैशाली माळी |
| २५ | २५-०९-२०१८ | राज्यस्तरीय विज्ञान एकांकिका स्पर्धा | – | विज्ञान मंडळ समिती |
| २६ | २६-०९-२०१८ | इंग्रजी विभाग मार्गदर्शपर व्याख्यान | प्रा. रियाज वळसंगकर सोलापूर | उपप्राचार्य सौ. वैशाली माळी |
| २७ | २७-०९-२०१८ | पालक – शिक्षक संघ सभा | – | प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर |
| २८ | २९-०९-२०१८ | रसायनशास्त्र विभागाचे मार्गदर्शनपर व्याख्यान | डॉ. श्री. एस. एस. भट माजी उपप्राचार्य नौरोजी वाडिया कॉलेज, पुणे | उपप्राचार्य सौ. वैशाली माळी |
| २९ | २९-०९-२०१८ | पदार्थ विज्ञान विभागाचे मार्गदर्शनपर व्याख्यान | प्रा. भोसे सर, पुणे | श्री. गोरखनाथ मोरे समन्वयक व व्यवसाय अभ्यासक्रम |
| ३० | ३०-०९-२०१८ | शैक्षणिक सहल, अहमदनगर (कलाशास्त्र) | – | इतिहास, भुगोल, राज्यशास्त्र विभाग (कला शाखा) |
| ३१ | ०१-१०-२०१८ | गणित विभागाचे मार्गदर्शनपर व्याख्यान | प्रा. डॉ. व्हि. व्ही. खरात श्री. एस. सी. नवले, सिंहगड कॉलेज, सोलापूर | श्री. गोरखनाथ मोरे समन्वयक व व्यवसाय अभ्यासक्रम |
| ३२ | ०३-१०-२०१८ | म. गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती | प्रा. मानाजी गावडे | उपप्राचार्य सौ. वैशाली माळी |
| ३३ | ०३-१०-२०१८ | ब्रेनवेवज् टॅलेंट हंट स्पर्धा | प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर | उपप्राचार्य सौ. वैशाली माळी |

अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे

# तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती

शैक्षणिक वर्ष २०१८ - २०१९

**कनिष्ठ महाविद्यालय अंतरंग - दृष्टिक्षेप**

| अ. क्र. | दिनांक | उपक्रम / विषय | प्रमुख वक्ते | कार्यक्रमाचे अध्यक्ष |
|---|---|---|---|---|
| ३४ | ०३-१०-२०१८ | वृध्दाश्रम भेट, समाजशास्त्राचे विद्यार्थी | तांदुळवाडी बोरावके चॅरिटेबल ट्रस्ट, तांदुळवाडी | समाजशास्त्र विभाग |
| ३५ | ०८-१०-२०१८ | ॲन्टी रॅगिंग व शिस्त या विषयावर व्याख्यान | कॅ. दिपक जांभळे, वाघिरे महाविद्यालय, सासवड | उपप्राचार्य सौ. वैशाली माळी |
| ३६ | २१-१२-२०१८ | अनेकान्त अविष्कार २०१८ | प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर | अनेकान्त अविष्कार समिती |
| ३७ | १४-०१-२०१९ | भूगोल प्रज्ञाशोध परीक्षा | - | भूगोल विभाग |
| ३८ | ०१-०३-२०१९ | अनेकान्त सामान्यज्ञान परीक्षा २०१८ | - | कनिष्ठ विभाग स्पर्धा परीक्षा समिती |
| ३९ | ११-०४-२०१९ | शिक्षकांसाठी कार्यशाळा | डॉ. श्रीरंग क्षीरसागर, प्राचार्य डी.बी.पी. दयानंद कॉलेज, सोलापूर श्री. एन. डी. बिरनाळे, कस्तुरबा वालचंद कॉलेज. सांगली | प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर |
| ४० | १४-०४-२०१९ | उद्योजकतेच्या दिशेने | वाणिज्य विभाग कनिष्ठ महाविद्यालय | प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर |
| ४१ | १५-०४-२०१९ | वाचन सप्ताह - डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंती निमित्त | - | वाङमय मंडळ कनिष्ठ विभाग |





# प्राचार्यांचे मनोगत



**प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर**

कनिष्ठ महाविद्यालयाचा 'अनेकान्त' चा हा दुसरा वार्षिक अंक आपणापुढे सादर करताना मला विशेष आनंद होत आहे. कनिष्ठ महाविद्यालय म्हणजे शालेय शिक्षण संपल्यानंतर प्रगतीच्या आणि विकासाच्या अनेकविध वाटा दाखविणारी प्रकाशाची खिडकी. या किशोरवयीन अवस्थेमध्ये प्रत्येक विद्यार्थी आपला पुढील नविन उमेद, नव्या संकल्पना आणि नवी क्षितीजे पादाक्रांत करण्यासाठी स्वतःला सिध्द करीत असतो. त्याचवेळी त्याला स्वतःमधील क्षमतांची ओळख देखील होत असते.

अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय हे बारामती परिसर, पुणे जिल्हा व महाराष्ट्रातील एक ख्यातनाम व नामांकित महाविद्यालय आहे. आज समाजात विविध क्षेत्रात या महाविद्यालयात शिक्षण घेतलेल्या अनेक मान्यवरांनी आपले नाव कमावले आहे, यश संपादन केले आहे आणि आपल्या कतृत्वाची छाप सोडली आहे. अशा अनेकांच्या शैक्षणिक कारकीर्दीची सुरुवात या महाविद्यालयामध्ये झाली. निश्चितच हे महाविद्यालय त्यामुळे काळाचे दोन पावले पुढे चालत आहे हे सिध्द होते. या महाविद्यालयमध्ये होत असणारे 'आविष्कार' सारखे उपक्रम, अनेक स्पर्धा परीक्षांची पूर्वतयारी, मान्यवर तज्ञांचे व्याख्याने, अत्यंत दर्जेदार शिक्षक, प्रयोग शाळा, भव्य ग्रंथालय व त्यातील सुविधा आणि याबरोबरच भव्य असे विविध क्षेत्रात नेत्रदिपक कामगिरी करण्याचे संधी देणारे क्रीडांगण या सर्वांमुळे विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना पंख फुटतात आणि त्यांची कतृत्वाच्या दिशेने वाटचाल सुरू होते. अत्यंत व्यासंगी, विद्यार्थीप्रिय आणि समाजभान असणारे शिक्षक या महाविद्यालयाची विशेष ख्याती. निश्चितच या सर्वांचा परिणाम म्हणून या महाविद्यालयाने सातत्याने आपली उत्तुंग गुणवत्ता राखली आहे नी दरवर्षी त्यामध्ये भरच पडत आहे. या पार्श्वभूमीवर या कनिष्ठ विभागामध्ये असणारी एक उणीव 'अनेकान्त'च्या रुपाने भरुन निघत आहे. या एक आगळे समाधान आम्हा सर्वांना आहे. 'अनेकान्त'चे व्यासपीठ विद्यार्थ्यांच्या भावविश्वाला साद घालणारे आहे आणि विद्यार्थी देखील तेवढ्याच उत्साहाने 'अनेकान्त' च्या या उपक्रमात सहभागी होत आहेत. काळाच्या प्रवाहावरील आपली ओळख या पांढऱ्यावर काळे करून उमटवीत आहेत. या वर्षीचा हा अंक चाळताना देखील विद्यार्थ्यांच्या उत्साहाचे, त्यांच्यातील सर्जनशीलतेचे आणि त्यांच्या काही नवे करू पाहणाऱ्या स्वप्नांचे समग्र असे चित्र उमटलेले दिसेल आणि म्हणून या वर्षी 'अनेकान्त' हा केवळ वाचनीय नाही तर संग्राह्य दर्जेचा झालेला आहे आणि याचा आम्हाला विशेष अभिमान आहे.

हा अंक चाळत असताना विद्यार्थ्यांना महाविद्यालय आपल्याशी बोलत असल्याचा भास होईल आणि भावी काळात पुन्हा त्यांच्या जुन्या अल्लड वयातील या महाविद्यालयातील व्यथीत केलेल्या काळाच्या जुन्या आठवणी पुन्हा आरशाप्रमाणे स्पष्ट दिसून येतील. हा अंक दर्जेदार करण्यासाठी या अंकाचे संपादक आमचे जेष्ठ शिक्षक प्राचार्य राजेंद्र आगवणे याने विशेष प्रयत्न केलेले आहेत.त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन! त्याचबरोबर संपादक मंडळातील सर्व सदस्यांनी हा अंक दर्जेदार होण्यासाठी मनापासून काम केले. आणि याची छाप तुम्हाला पानोपानी आढळून येईल. संपादक मंडळातील सर्व सदस्यांचे देखील अत्यंत मनःपूर्वक अभिनंदन! खरेतर यातील प्रत्येक पानावर विद्यार्थ्यांच्या उत्साही चेहऱ्याची प्रतिमा उमटलेली दिसते आहे. त्यासाठी या उपक्रमात उत्साहाने आणि हिरिरीने भाग घेतलेल्या सर्व लेखक विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन. कोणीतरी म्हणाले आहे की,

"A big success always starts with a small step"

आपणां सर्वांना भावी कारकिर्दीसाठी शुभेच्छा देतो आणि थांबतो.

नववर्षाच्या शुभेच्छा!

धन्यवाद!

# संपादकीय....



श्री. राजेंद्र आगवणे

कनिष्ठ महाविद्यालयाचा हा'अनेकान्त' चा हा दुसरा अंक आपल्या हाती देत असताना मनस्वी आनंद होत आहे. गतवर्षी पेक्षा या अंकातील विषय संकल्पना वेगवेगळ्या आहेत. विशिष्ठ अशा ध्येयनिश्चतीमुळे साहित्यातील उद्दिष्ट्ये साध्य होताना दिसतील. हे विश्वची माझे घर... या उच्च अभिव्यक्तीला विज्ञान व तंत्रज्ञानाची जोड देऊन जगासमोरील उणीवा व त्यावर उपाय या विषयांवर विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले होते. याला काहीसे यश मिळाले असे वाटते.

कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थीवर्ग हा नवकल्पना, सर्जनात्मकता, स्वप्न यातून भविष्याची स्वप्न रंगवत असतात. प्रचंड आत्मविश्वास, स्फूर्ती व प्रेरणा यांतून जीवनाचा अर्थ शोधणारी तरूण पिढी, सामाजिक व कौटुंबिक भान व जाणीव करून घेणारी पिढी कृतिशील, सर्जनशील व्हावी या हेतुने गेली वर्षभर सर्व शिक्षक, विद्यार्थी यांनी मनापासून मेहनत घेतली आहे. त्याचेच प्रतिबिंब या अंकाच्या माध्यमातून आपणासमोर येईल.

मा. प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर यांच्या अद्वितीय व ओजस्वी कल्पनेतून व उत्स्फूर्त प्रतिसादातून या अंकाची निर्मिती होत आहे.

वसंतऋतुत निसर्गाला जसा बहर येऊन सारे आसमंत सुगंधीत व अल्हाददायक होते. सर्व पशुपक्षी, झाडेवेली सर्व भान हरपून स्वतःस उधळून देतात, त्याप्रमाणे ही तरूण पिढी स्वतः प्रती, आत्मिक, बौद्धिक, शारीरिक मानसिक विकास करून सुसंस्कारीत होताना दिसत आहे. हे संस्कारीत व्यासपीठ सर्वांना मुक्त त्यातून कविता, लेख, ललीत प्रकार, इ.तून मुले मुली लिहिती झाली. कनिष्ठ महाविद्यालयाच्या या उपक्रमाचा सर्वांना मनस्वी आनंद होत आहे. अनेक वर्षाच्या महाविद्यालयाच्या यशस्वी वाटचालीतून अनेक यशस्वी समाजसेवक, कवी, लेखक सद्सद्विवेक संपन्न नागरिक घडले आहेत. व घडत राहतील. त्यात निश्चितच अनेकान्त चा सहभाग आहे व राहणार आहे.

'अनेकान्त' अंक संपन्नतेसाठी मा. प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर, उपप्राचार्य, सौ. वैशाली माळी समन्वयक प्रा. गोरखनाथ मोरे, रजिस्ट्रार श्री. अभिनंदन शहा, का. अधि. श्री. विकास भोसले तसेच श्री. राकेश देवरे यांचे सहकार्य लाभले. 'अनेकान्त' समिती सदस्य यांनी खुप मेहनत घेऊन हा अंक सुंदर बनवण्यासाठी सहकार्य केले. या सर्वांचे मी मनःपूर्वक अभिनंदन व आभार व्यक्त करतो. अंकाचे मुद्रणाचे कामात अहमदनगर येथील मा.श्री. कृष्णा पेंडम यांच्या बाणेश्वर एजन्सीज कडून वेळेत व चांगले सहकार्य मिळाले. त्यांचे मनापासून मी आभार व्यक्त करतो. अनेकान्त हा अंक सर्वांनी वाचुन अभिप्राय द्यावा.

पुनश्च सर्वांना धन्यवाद.





## ॥ जिमखाना विभाग ॥




पुणे विभागीय स्पॉफ्टबॉल व बेसबॉल मुले स्पर्धेत उपविजेतेपद प्राप्त केलेल्या संघातील खेळाडू



पुणे विभागस्तर कब्बड्डी मुली स्पर्धेत उपविजेतेपद प्राप्त केलेल्या संघातील खेळाडू




पुणे जिल्हास्तर शुटींगबॉल मुली स्पर्धेत विजेतेपद व स्पॉफ्टबॉल स्पर्धेत तृतीय क्रमांक प्राप्त केलेल्या संघातील खेळाडू



पुणे जिल्हास्तर तलवारबाजी मुले व मुली स्पर्धेत विजेतेपद प्राप्त केलेल्या संघातील खेळाडू




पुणे जिल्हास्तर नेटबॉल मुली स्पर्धेत उपविजेतेपद प्राप्त केलेल्या संघातील खेळाडू

## जिमखाना विभाग - कनिष्ठ महाविद्यालय

### शालेय राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झालेले महाविद्यालयाचे खेळाडू


आर्यन जाधव
१२ वी विज्ञान (नेटबॉल)


अभिषेक देवकाते
१२ वी कला (कुस्ती)


श्रुती पानसरे
१२ वी कला (कराटे)

### असोसिएशनच्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झालेले महाविद्यालयाचे खेळाडू


लोहीताक्ष बनछोड
१२ वी कला (शुटींग)


मिताली मोकाशी
१२ वी विज्ञान (सिलंम्बम)


अभिषेक होले
११ वी वाणिज्य (बेसबॉल)


संतोष कचरे
११ वी विज्ञान (बेसबॉल)

### शालेय व असोसिएशनच्या राज्यस्तर स्पर्धेसाठी निवड झालेले महाविद्यालयाचे खेळाडू


अनिकेत लोणकर
१२ वी विज्ञान(बॅडमिंटन)


सार्थक शहा
१२ वी विज्ञान(तलवारबाजी)


क्षितीज कांबळे
१२ वी विज्ञान(तलवारबाजी)


यशोदा सांगळे
११ वी विज्ञान(तलवारबाजी)


प्रतिक गायकवाड
११ वी कला(बेसबॉल)


सुहास इंदापुरे
११ वी वाणिज्य(बेसबॉल)


अभिषेक पवारफ
११ वी कला(बेसबॉल)


ओंकार गावडे
११ वी विज्ञान(बेसबॉल)


श्रीतेज काळे
११ वी वाणिज्य(बेसबॉल)


शुभम रंधवे
११ वी वाणिज्य(बेसबॉल)


युवराज खोमणे
११ वी विज्ञान(बेसबॉल)


मन्सूर अत्तार
१२ वी विज्ञान(सॉफ्टबॉल)


वैभव हगारे
१२ वी विज्ञान(सॉफ्टबॉल)


मयूर भा[illegible]
१२ वी विज्ञान(बेसबॉल)


सुरज करचे
१२ वी कला(कबड्डी)


ऐश्वर्या झाडबुके
१२ वी विज्ञान(कबड्डी)


विक्रांत काळे
११ वी विज्ञान(कराटे)


साहिल ननावरे
११ वी वाणिज्य(शुटींग)


अवधूत मोरे
११ वी विज्ञान(जलतर[illegible]

# मराठी विभाग



मला असा भारत निर्माण करावयाचा आहे की,

जेथे गरिबातील गरीब माणसाला हा देश आपल्या सर्व व त्याची घडण करण्यामध्ये आपला वाटा आहे असे वाटेल. जेथे लोकांमध्ये उच्च-नीच वर्ग नसतील व जेथे सर्व जाती जमातीचे लोक गुण्यागोविंदाने एकत्र नांदतील. अशा भारतामध्ये अस्पृश्यतेतसारख्या व नशापानासारख्या लाजिरवाण्या कलंकाला जागा नसेल. स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने हक्क प्राप्त होतील जगातील इतर देशांशी आपले स्नेहाचे संबंध असतील, कारण आपण त्यांना लुबाडणार नाही किंवा आपण कोणाकडून लुबाडले जाणार नाही. त्यामुळे आपले सैन्यबळ अतिशय मर्यादित असेल. माझे भारतसंबंधीचे स्वप्न हे असे आहे. त्यामध्ये काहीही कमीपणा राहिला तरी माझे समाधान होणार नाही.

'महात्मा गांधी'

**अनेकान्त**
कनिष्ठ महाविद्यालय
सन २०१८ - २०१९

विभागीय संपादक
श्री. राजेंद्र आगवणे
श्री. मानाजी गावडे
श्री. संजय शेंडे
श्री. बापुराव कुंभार

# जिमखाना विभाग - कनिष्ठ महाविद्यालय

## शालेय राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झालेले महाविद्यालयाचे खेळाडू


आर्यन जाधव
१२ वी विज्ञान (नेटबॉल)


अभिषेक देवकाते
१२ वी कला (कुस्ती)


श्रुती पानसरे
१२ वी कला (कराटे)

## असोसिएशनच्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झालेले महाविद्यालयाचे खेळाडू


लोहीताक्ष बनछोड
१२ वी कला (शुटींग)


मिताली मोकाशी
१२ वी विज्ञान (सिलंम्बम)


अभिषेक होले
११ वी वाणिज्य (बेसबॉल)


संतोष कचरे
११ वी विज्ञान (बेसबॉल)

## शालेय व असोसिएशनच्या राज्यस्तर स्पर्धेसाठी निवड झालेले महाविद्यालयाचे खेळाडू


अनिकेत लोणकर
१२ वी विज्ञान(बॅडमिंटन)


सार्थक शहा
१२ वी विज्ञान(तलवारबाजी)


क्षितीज कांबळे
१२ वी विज्ञान(तलवारबाजी)


यशोदा सांगळे
११ वी विज्ञान(तलवारबाजी)


प्रतिक गायकवाड
११ वी कला(बेसबॉल)


सुहास इंदापुरे
११ वी वाणिज्य(बेसबॉल)


अभिषेक पवारफ
११ वी कला(बेसबॉल)


ओंकार गावडे
११ वी विज्ञान(बेसबॉल)


श्रीतेज काळे
११ वी वाणिज्य(बेसबॉल)


शुभम रंधवे
११ वी वाणिज्य(बेसबॉल)


युवराज खोमणे
११ वी विज्ञान(बेसबॉल)


मन्सूर अत्तार
१२ वी विज्ञान(सॉफ्टबॉल)


वैभव हगारे
१२ वी विज्ञान(सॉफ्टबॉल)


मयूर भापकर हगारे
१२ वी विज्ञान(बेसबॉल)


सुरज करचे,
१२ वी कला(कबड्डी)


ऐश्वर्या झाडबुके
१२ वी विज्ञान(कबड्डी)


विक्रांत काळे
११ वी विज्ञान(कराटे)


साहिल ननावरे
११ वी वाणिज्य(शुटींग)


अवधूत मोरे
११ वी विज्ञान(जलतरण)

# मराठी विभाग



मला असा भारत निर्माण करावयाचा आहे की,

जेथे गरिबातील गरीब माणसाला हा देश आपल्या सर्व व त्याची घडण करण्यामध्ये आपला वाटा आहे असे वाटेल. जेथे लोकांमध्ये उच्च-नीच वर्ग नसतील व जेथे सर्व जाती जमातीचे लोक गुण्यागोविंदाने एकत्र नांदतील. अशा भारतामध्ये अस्पृश्यतेतसारख्या व नशापानासारख्या लाजिरवाण्या कलंकाला जागा नसेल. स्त्रियांना पुरूषांच्या बरोबरीने हक्क प्राप्त होतील जगातील इतर देशांशी आपले स्नेहाचे संबंध असतील, कारण आपण त्यांना लुबाडणार नाही किंवा आपण कोणाकडून लुबाडले जाणार नाही. त्यामुळे आपले सैन्यबळ अतिशय मर्यादित असेल. माझे भारतसंबंधीचे स्वप्न हे असे आहे. त्यामध्ये काहीही कमीपणा राहिला तरी माझे समाधान होणार नाही.

*'महात्मा गांधी'*

**अनेकान्त**
कनिष्ठ महाविद्यालय
सन २०१८ - २०१९

**विभागीय संपादक**

श्री. राजेंद्र आगवणे
श्री. मानाजी गावडे
श्री. संजय शेंडे
श्री. बापुराव कुंभार

# अंतरंग....

## गद्य विभाग


| | |
|---|---|
| मातृभूमीला पत्र... | कु. ऋतिका गणेश शिंदे १२ वी, कला |
| आजचा तरूण - क्या खोया क्या पाया | श्री. राधेश्याम सुभेदार, ११ वी, शास्त्र |
| आई | कु. गौरी दत्तात्रय लाळगे, ११ वी, विज्ञान |
| आदर्श आई बाबा | कु. ऋतुजा तावरे, ११ वी वाणिज्य |
| वृध्दाश्रमाला भेट | कु. सानिया अय्युब शेख, १२ वी, कला |
| आमची बारावीची सहल | कु. ऋतिका गणेश शिंदे १२ वी, कला |
| मायबोली मराठी | कु. सानिया अय्युब शेख ,बारावी, कला |
| विद्यार्थ्यांचा अभ्यास... पालकांची डोकेदुखी | कु. पूजा विजय माने , ११वी विज्ञान |
| सेंद्रिय शेती काळाची गरज | श्री. बुरूंगले श्रीनाथ दादासो., ११ वी विज्ञान |
| गरज ही शोधाची जननी | कु. साक्षी वाघमारे, ११ वी विज्ञान |
| महात्मा फुले यांच्या शैक्षणिक विचारांची गरज | कु. दीपाली मदने १२वी, कला |
| महाविद्यालयातील माझी जडण घडण | कु. राधेश्याम सुभेदार ११वी, शास्त्र |
| भारतीय शास्त्रज्ञांची ओळख | श्री. तेजस भारत खरात, १२ वी विज्ञान |
| माझा एन.सी.सी. मधील अनुभव | श्री. रासकर अजयकुमार भरत, १२ वी कला |
| निरोप घेताना | कु. श्रीया स्वप्निल गांधी, १२ वी विज्ञान |
| माझा राईफल शुटिंगचा अनुभव | लोहित्ताक्ष गणेश बनछोड, १२ वी, कला |
| स्मरण महात्माजींचे | प्रा. मानाजी गावडे (मराठी विभाग) |
| करिअरच्या विविध वाटा | प्रा. पांडुरंग ओवेकर (इतिहास विभाग) |
| भारत माझा देश आहे ! | प्रा. प्रियांका भानुदास सायकर (राज्यशास्त्र विभाग) |
| व्यसनाधिनतेच्या विळख्यात अडकलेला तरूण | कु. साक्षी संदीप तपकीरे, ११ वी विज्ञान |
| व्यथा दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांची | कु. संध्या तानाजी इंगवले, ११ वी कॉमर्स |
| आयुष्याचा सांगाती | श्री. अशोक देवकर, शारीरिक शिक्षक |
| निसर्ग माझा मित्र | कु. पायल नंदकुमार लोणकर, १२ वी विज्ञान |


## पद्य विभाग


| | |
|---|---|
| सर्वगुणसंपन्न बायको | कु. रेणुका सुनिल कोरे, ११ वी विज्ञान |
| मातीशी नातं | श्री. सौरभ जगताप, ११ वी विज्ञान |
| उष: काल | श्री. प्रसाद शरद कोकीळ, १२ वी विज्ञान |
| धरा मार्ग सत्याचा | कु. राधा अविनाश चव्हाण, ११ वी विज्ञान |
| मी शेतकरी | कु. शिवानी राजेंद्र ढवळे, ११ वी विज्ञान |
| माझी एंजल | श्री. ओंकार सोमनाथ गुरव,११ वी विज्ञान |
| उंच भरारी | कु. साक्षी कुंभार, ११ वी विज्ञान |
| अनोखी भेट | श्री. गणेश सोमनाथ नेवसे, (११वी, विज्ञान) |
| एक कळी उमलण्याआधी | कु. शिवानी राजेंद्र ढवळे, ११वी विज्ञान |
| शब्द | कु. अमृता सुरज खरात, १२वी, कला |
| भ्रूण व्यथा | कु. अमृता सुरज खरात, १२वी, कला |
| आयुष्य | कु. दिपाली मदने, १२वी, कला |
| जीवन आहे तरी काय | कु. अमृता सुरज खरात, १२वी, कला |
| शोध | श्री. गणेश सोमनाथ नेवसे , ११वी, विज्ञान |
| शाळा माझी आई | कु. निलोफर नजीर सय्यद, ११ वी, विज्ञान |






# मातृभूमीला पत्र...

कु. ऋतिका गणेश शिंदे बारावी, कला

खूप दिवस झाले, म्हणत होते, एक पत्र लिहावे तुला आई. आई माझी मातृभूमी. तुला पत्र लिहिण्याचा तो क्षण आलाच पण खरं म्हणजे मला आज तुला पत्र लिहिण्याची गरज भासतेय. खूप खूप बोलायचे आहे. लिहायचे आहे.

मातृभूमी तुला आई म्हणण्याचे कारण म्हणजे 'मातृ'या शब्दाचे दोन अर्थ असतात. एक जन्मदात्री आई आणि जी आपल्या अंगाखांद्यावर खेळवते, जिच्या अंगाखांद्यावरच आम्ही मोठे होतो. ती आई म्हणजे तू मातृभूमी माझी भारतभूमी.

तुला पत्र लिहावेसे वाटले कारणही तसंच आहे. आई तू ७१ वर्षांपूर्वी ब्रिटिशांच्या वर्चस्वातून मुक्त झाली परंतु तू खरंच का आजच्या काळात मुक्त, सुरक्षित आहे? तुला अंतर्गत समस्या, आक्रमण, राष्ट्रीय एकात्मतेला असणारा धोका यामुळे तू एका बंधनात आहे असे मला वाटते दुसऱ्या बाजूने विचार केला असता तू एक महासत्ता होण्याच्या मार्गावर आहे, एक विकसित राष्ट्र होण्याच्या वाटेवर आहे.

१५ ऑगस्ट १९४७ रोजी तू १५० वर्षे राज्य करणाऱ्या ब्रिटिशांच्या ताब्यातून मुक्त झाली. तुझ्यासाठी अनेकांनी बलिदान दिले त्याचा इतिहास किती स्फूर्तिदायक आणि रोमांचक आहे! तू अनेक नररत्नांना जन्म दिला. तू मातृभूमीने सम्राट अशोकाचे शांतिपर्व, गौतम बुद्धांचा त्याग, महावीरांची अजोड संन्यस्त वृत्ती, शिवाजी महाराजांनी दिलेली स्वराज्याची प्रेरणा हे सर्व दिले. डॉ. राजेंद्रप्रसाद, स्वातंत्र्यवीर सावरकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, भगतसिंग, सुखदेव, राजगुरू, महात्मा गांधी, महात्मा फुले, स्वामी विवेकानंद यांसारखे अनेक विचारवंत तुझ्या कुशीत जन्माला आले. मला अभिमान आहे जिच्या कुशीत असे असंख्य हिरे-मोती जन्माला आले त्याच कुशीत मी जन्माला आले.

माझा भारत देश जगातील सर्वांत मोठे लोकशाही राष्ट्र आहे. याच भारतभूमीत जगातील सर्वांत मोठे संविधान तयार झाले. भारताला लाभलेली प्राचीन संस्कृती आम्हा भारतवासियांची अमूल्य ठेव आहे. कारण तिला हजारो वर्षांची तेजस्वी परंपरा लाभली आहे. माझ्या भारतात विविधतेतही एकता आहे. कारण आम्ही सर्व भारतीय आहोत. तुझीच लेकरे आहोत.

उंच उंच हिमालयाच्या रांगा, तिन्ही बाजूंनी वेढलेला समुद्र, जैवविविधता, वेगवेगळ्या संस्कृती हे सर्व मला केवळ तुझ्याच अंगाखांद्यावर बघायला मिळते.

परंतु आजच्या आधुनिक काळात तू अनेक अंतर्गत समस्यांनी ग्रासलेली दिसते. भ्रष्टाचार, महागाई, आर्थिक समस्या, बेरोजगारी, गरिबी, सामाजिक - आर्थिक विषमता, लोकसंख्येचा भस्मासूर, नक्षलवाद, दहशतवाद, दंगली, स्त्री-पुरुष असमानता, एकात्मतेचा अभाव या व अशा अनेक समस्या आहेत.

आज आई मी तुला एका महत्त्वाच्या समस्येविषयी बोलण्यासाठी आतुरतेने तुला हे पत्र लिहित आहे. ती समस्या म्हणजे स्त्री - पुरुष असमानता.

ताराबाई शिंदे यांनी १९ व्या शतकात स्त्री-पुरुष तुलना हा निबंध लिहिला पण आजच्या २१ व्या शतकात अजूनही या असमानतेचे रूपांतर समानतेत झालेले नाही यावरून तुला आजची महत्त्वाची समस्या कळलीच असेल ती म्हणजे स्त्री-पुरुष असमानता. प्रथमतः आई मी तुला कळकळीने सांगू इच्छिते की आम्ही स्त्रिया या भूमीवर असुरक्षित आहोत. बघ ना आई स्त्री-पुरुष ही तुझीच लेकरे आहेत. तुझ्या भूमीवर राहतात. मग पुरुषांना श्रेष्ठ आणि स्त्रियांना कनिष्ठ का मानले जाते. सिंधू संस्कृती मातृसत्ताक होती नंतर आजची समाजव्यवस्था, कुटुंबव्यवस्था, पितृसत्ताक बनली. पूर्वी स्त्रियांना समाजात दुय्यम स्थान दिले जायचे कारण स्त्री ही केवळ चूल आणि मूल संभाळते म्हणून. स्त्रियांना शिक्षण, सत्ता, संपत्तीचे सारे अधिकार नाकारण्यात आले. सतीप्रथा, हुंडाप्रथा, बालविवाह यासारख्या अनेक अन्यायकारक चालीरितीने अनेक स्त्रियांचे आयुष्य मातीस मिळाले.

पण आजच्या २१ व्या शतकात स्त्रियांच्या बाबतीत हीच परिस्थिती. आजही अनेक स्त्री संदर्भात गंभीर समस्या भारतीय समाजासमोर उभ्या आहेत. रूढी- परंपरांचा पगडा,

---

जग बदलायचे असेल तर आधी स्वत:ला बदलवा.

प्रत्येक धर्मातील खाजगी जीवन नियंत्रित करणारे धार्मिक कायदे, विपरित स्त्री-पुरुष प्रमाण, समान नागरी कायद्यांचा अभाव, कौटुंबिक हिंसाचार हुंडाबळी, बलात्काराच्या घटना, नोकरी करणाऱ्या स्त्रियांचे प्रश्न यासारख्या समस्यांना स्त्रीला आजही तोंड द्यावे लागते. आम्हा स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार मिळालेला आहे पण आजसुध्दा कितीतरी मुली या शिक्षणापासून वंचित आहेत.

खरं सांगू का आई, स्त्रियांवर अत्याचार केवळ लग्न झाल्यानंतर नाही होत तर मुलीच्या जन्मापासूनच ती नको म्हणून तिच्याकडे पाहिलं जातं. सर्वांना आई, बहिण, पत्नी, गर्लफ्रेंड, आत्या पाहिजे पण मुलगी नको असते. मुलाला जन्म देणारी आई ही एक 'स्त्री' च असते. तर स्त्रीच जन्मली नाही तर मुले कशी जन्माला येतील हीच गोष्ट विसरतात. मुलीला 'नकोशी' म्हणणारे 'बेटी बचाव, बेटी पढाव' असे म्हणतात. पण जर बेटींचा बचावच केला नाही तर बेटीला शिकवणार कसं. 'बेटी बचाव, बेटी पढाव' हे कागदावरचं सत्यात कधी येईल याचीच काळजी आहे.

स्त्रियांवरील अत्याचार रोखण्यासाठी खूप कायदे केले पण ते अंमलात येत नाहीत. अंमलात आले तरी अन्यायी महिलेपर्यंत पोहचत नाहीत.

असं सगळं असूनही आई मी तुला अभिमानाने सांगते आम्ही स्त्रिया पुरूषांच्या खांद्याला खांदा लावून सगळ्याच क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करत आहोत. मग ते कोणतेही क्षेत्र असो राजकीय, क्रीडा, आर्थिक... सगळ्यात स्त्रीच अव्वल. पुरुष वाघ असले तरी आम्ही स्त्रीया वाघीणी आहोत. एवढं उत्तुंग यश स्त्रियांनी मिळलं असलं तरी एकाच गोष्टीची कमतरता आहे ती म्हणजे आमच्या पंखात अन्यायाला वाचा फोडण्याचे बळ अजून आलेले नाही कारण आमच्या मनाचे खच्चीकरण या वाईट रूढी-परंपरा यामुळे झाले आहे. जेव्हा या वाईट अन्यायकारक रूढी-परंपरा स्त्रियांना दुय्यम स्थान देण्याची मानसिकता समाजाच्या मनातून नाहिशी होईल. तेव्हाच आम्ही पंखात बळ घेऊन उंच उंच भरारी घेऊन स्वच्छंदपणे, पूर्ण स्वातंत्र्याने या मातृभूमीवर, भारतभूमीवर विहार करू.

शेवटी आई तुझा निरोप घेण्यापूर्वी सांगते आम्ही स्त्रिया म्हणजे

**अबला नसून सबला आहे.**
**चिमणी नसून वाघिणी आहे.**
**निरक्षर नसून साक्षर आहे.**
**दुय्यम नसून प्रथम आहे.**

# सर्वगुण संपन्न बायको

सर्वगुण संपन्न बायको
म्हणे असते केवळ अफवा
एकतर फक्त सुंदर नाहीतर फक्त हुशार
चुकून माकून दोन्ही असली तर मग
भांडखोर असेल फार
देखणी हुशार असली जर कदाचित
स्वयंपाकाची बोम असणार १००% हीचीच
भले शाब्बास पुरुष प्रधान
आपल्याला गुणांचे फार ज्ञान
निरखा वेळ काढून गिरवा मग स्वतःचे ध्यान
बायको हवी सुंदर....
बर सुदरतेची व्याख्या काय ?
कॅटरिना, दिपिका, प्रियंका किमान दिसावी ऐश्वर्या रॉय
समजवाल का थोड आपल्या अपेक्षांचे सुत्र
अहो ऐश्वर्या रॉय मिळायला आपण कोणते बच्चन पुत्र
कबुल आहे चिडते भांडते थोडे भान नाही उरत
म्हणून काय टेंशन निमित्त सांगून ती मध्यपान नाही करत
उधळपट्टी करते पण घरासाठीच
तरीही पै-पै साठवतेय आणि स्वतः कडचे संपल्यावर तिच
या वर बहुतेक नवरोजींचे likes आणि वाह वाहा
हो खर सर्वगुण संपन्न बायको असते केवळ अफवा

– कु. रेणुका सुजित कोरे
(११ वी सायन्स)





# आजचा तरूण - क्या खोया क्या पाया

श्री. राधेश्याम सुभेदार, अकरावी, शास्त्र

भारताच्या किंबहुना कोणत्याही देशाच्या प्रगतीस कारणीभूत ठरणारा असा महत्त्वाचा घटक कोणता? असं सरसकट सर्व महापुरूषांना विचारणं तर अधिकार रित्या उत्तर येईलं 'युवक' . स्वामी विवेकानंद म्हणतात, मला ध्येयाने भारावून गेलेले १० तरूण द्या मी अवघे जग बदलेन. ज्या तरूणावर विवेकानंदांना एवढा विश्वास आहे. त्या तरूणांची आज दशा आणि दिशा काय आहे. याच्यावर विचारविमर्ष व तरूणांनी यातून नक्की काहीतरी घ्यावे. ह्या अट्टाहासासाठीच हा लेखन प्रपंच

खऱ्याअर्थाने देशाचं भवितव्य असणारा आजचा तरूण डोळ्यावरती मार्क्सची पट्टी बांधून वेगवेगळ्या स्पर्धा परीक्षांचा घाणा ओढताना आम्हाला दिसतो आणि पाहिजे तेवढे मार्क्स मिळाले नाहीत की, आत्महत्या करताना, नशाधीन होताना व दिशाहीन होताना आम्हाला दिसतो. तेव्हा निश्चितच आपल्यासमोर प्रश्नचिन्ह उभं राहतं. आजचा तरूण क्या खोया क्या पाया? मला माहीत आहे 'कुछ पाने के लिए कुछ खोना पडता है' परंतु आम्ही जे काही हरवलं व त्याबदल्यात जे काय मिळवलं याची तुलनात्मक मांडणी याठिकाणी झालीच पाहीजे.

आजच्या युवकानं काय हरवलं हे सांगण्यासाठी मी आपल्यासमोर काही निकष ठेवू इच्छितो. सर्वात प्रथम म्हणजे काकचेष्टा, काक – कावळा, चेष्टा अर्थात कष्ट. तळाचं पाणी वर आणणाऱ्या कावळ्या कडून घेणे, कष्ट करणे. पण आजचा तरूण ज्यावेळी परीक्षांमध्ये गाईडच्या पानांची ३/४ साईज मध्ये झेरॉक्स काढून पाकीटात ठेवताना मला दिसतो ना त्यावेळी तरूणातील कष्ट नावाची गोष्टचं मुळी मला नष्ट झाली असं वाटतं.

दुसरी गोष्ट म्हणजे अभ्यासामध्ये शार्टकटस् शोधणं अथवा अनेकांची ज्या मार्गावर जाऊन ते ठिसूळ केलेले आहेत. तेच करिअर साठी निवडणं म्हणून स्वयंअभ्यास आणि नवनिर्मितीचा ध्यास या दोन्ही गोष्टी तरूणातून हरवलेल्या आहेत असं मला वाटतं. म्हणून म्हणावसं वाटतं,

संघर्षाआधीच हरलास तू
कर्तबगारी आधीच गमावलीस
जीवन हा संघर्ष तोच नकोस म्हणतोस तू
जगण्याआधी संपलास तू

धैर्य,स्थैर्य, संकटांना सामोरे जाण्याची सचोटी त्याचबरोबर 'तत्परता' हा तारुण्याचा पहिला 'त' कार मला तरूणातून हरवताना दिसतो.

यानंतर आहे ते म्हणजे बळोध्यानम्‌याचा अर्थ बगळ्या प्रमाणे ध्यान म्हणजे एकाग्रता, ध्येयनिष्ठा डॉ.ए.पी.जे अब्दुल कलामांना विचारलं, तुम्ही लग्न का नाही केलंत? ते म्हणाले मी माझ्या ध्येयाप्रती इतका आसक्त होतो की मी लग्न करायचंच विसरुन गेलो. जीवनभर तरुणपणा ताजेतवाना ठेवणारा ज्ञानतपस्वी जेव्हा आम्हाला असं काहीतरी शिकवून जातो तेव्हा कट्ट्यावर बसून चव्हाटे करणारे आम्ही मुळात ध्येयच विसरलो आहोत याची जाणीव आम्हाला होते. मात्र जीवनवाटेवर मार्गक्रमण करणारा युवकाचा मनरथ मनोरथापर्यंत पोहचण्याआधीच अडखळतो तो म्हणजे फेसबुक, व्हॉट्सॲप, ट्विटर अशासारख्या प्रलोभनांमुळे, आकर्षणांमुळे त्यामुळे ऐन तारूण्यात झिंगाट होऊन रंगात येणाऱ्या अनेक संधी धुडकावणारे छत्रपती शिवाजी महाराज आम्हाला दिसतात तेव्हा आम्ही काहीतरी गंभीर हरवतोय असं जाणवतं.

चौथे म्हणजे श्वाननिद्रा-मुळी कुत्र्याची झोपच मुळी सावधानतेचं लक्षण. तरूण जर काही हरवत असेल तर ते म्हणजे सावधानता, सामाजिक भान व जबाबदारी. आपल्या बरोबर काय होऊ शकतं हे माहीत नसलेले अनेक तरूण व्हॉटसॲप, फेसबुक द्वारे होणाऱ्या कुचेष्टांचे बळी ठरतात सामाजिक भान नसणारे अनेक तरूण आपली शक्ती चुकीच्या गोष्टींमध्ये वाया घालवताना दिसतात आणि जबाबदारी ही संज्ञा माहीत नसलेले तरूण किल्ले, नैसर्गिक स्थळे अपवित्र करताना दिसतात. मध्यंतरी माझ्या मित्राने लिहिलेली एक ओळ मी वाचली 'राजे जेवढे बदाम तुम्ही तुमच्या जीवनात

खाल्ले असतील, तितके तुमच्या मावळ्याने रायगडावर कोरले असतील' परिस्थितीचं हे वास्तववादी चित्रण लक्षात घेतल्यानंतर आम्हाला समजतं आम्ही नक्कीच काहीतरी गंभीर हरवत आहोत. त्यानंतर अल्पाहारी – अल्पाहारी म्हणजे कमी खाणारा. नाही सात्विक जेवण तरूणाच्या जीवनातून हरवलंच आहे आणि पिझ्झा, बर्गर तो भरमसाठ ओढतच आहे. पण प्रत्येक इंद्रियाचा असा एक आहार आहे. डोळ्यांचा पाहणे, कानांचा ऐकणे, म्हणूनच अल्पाहारीची व्याख्या अशी होईल-योग्य तेच योग्य त्याच प्रमाणात योग्य त्याच वेळी ग्रहण करणे. पण सोशल मिडीयाच्या माध्यमातून आमचा तरूण जे काही ग्रहण करतोय ते त्याच्या बुद्धीला कलुषित करताना दिसून येतं व मी आणि माझ याभोवती फिरणारं वर्तुळ संस्काराच्या ऱ्हासामुळे त्या वेल ट्रेन पण वेल एज्युकेटेड नसणाऱ्या याचाच अर्थ उच्चशिक्षित मात्र सुशिक्षित नसणाऱ्या तरूणाच्या मनात निर्माण होतं. मग तो रॅगिंग, बलात्कार अशा गुन्ह्यांकडे वळताना दिसतो. याच ठिकाणी तेजस्विता हा तारूण्याचा दुसरा 'त' कार मला तरूणातून हरवताना दिसतो.

गृहत्यागी – म्हणजे आपला कम्फर्ट झोन यातून बाहेर पडणं याचे बहुतांशी तरूण सकारात्मक परिस्थितीत शिकतात त्यांना दोन वेळचं अन्न मिळवण्यासाठी कष्ट करावे लागत नाहीत. पण नकारात्मक परिस्थितीवर मात करणं त्यांना जमत नाही. आणि अनेक तरूण आत्महत्या करताना आज दिसतात इथेच तारूण्याचा तिसरा 'त' कार तरूणाच्या जीवनातून हरवताना दिसतो.

आम्ही काही हरवलंय काही मिळवलय. हरवलय त्याला परत प्राप्त करून जे मिळवलय त्याच्याबरोबर एक नवी सुरूवात करूया. म्हणून शेवटी एवढंच सांगतो,

ध्येयाचा वार तुझ्या प्रत्येक क्षणास होऊ दे
वेदना तुझ्या प्रत्येक मनास होऊ दे.
अशक्य म्हणेल शक्य आहे
इतका गर्व तुझ्या बुध्दीच्या मी पणास होऊ दे...

# आई

**कु. गौरी दत्तात्रय लाळगे, ११ वी, वाणिज्य**

'आ' म्हणजे आत्मा 'ई' म्हणजे ईश्वर अशा या सुंदर शब्दाचा सुंदर असा संगम होऊन आई हा अनमोल शब्द तयार होतो. आई हा शब्द कानावर पडताच हृदय प्रेमाने भरून जाते.

'स्वामी तिन्ही जगाचा आईविना भिकारी' कवी यशवंतांनी आईची थोरवी गाताना या ओळीचा उच्चार केला आहे. अगदी खरे आहे ते ! मातेचे प्रेम अतुलनीय आहे सत्ता, मत्ता, विद्वत्ता हे सारे या जन्मदेपुढे कपदार्थ आहेत म्हणून तर कोणाही पुढे न वाकलेला सिकंदर आपल्या मातेसमोर नतमस्तक होत असे महाराष्ट्राचे स्वराज्य संस्थापक शिवाजी महाराज हेही श्रेष्ठ मातृभक्त होते.

'घार हिंडते आकाशी
चित्त तिचे पिलापाशी'

ज्याप्रमाणे घार आकाशात हिंडत असते. तरीही तिचे लक्ष मात्र तिच्या पिल्लापाशीच असते. त्याचप्रमाणे मातेच्या वात्सल्याचे स्वरूप सर्वत्र सारखेच आढळते. मातेच्या वात्सल्याची अनेक उदाहरणे आपल्या परिचयाची आहेत. अतिशय कठोर प्रसंगी अपत्याच्या वात्सल्यापोटी माता आपल्या प्राणांची बाजी लावते. इतिहासातील याचे जिवंत स्मारक म्हणजे रायगडावरील हिरकणी बुरूज!

माता आपल्या लेकरासाठी काय करीत नाही! ती त्याला जन्म देते एवढेच नव्हे तर सर्वस्वी परावलंबी असलेल्या बाळाला ती डोळ्याचा दिवा व तळहाताचा पाळणा करून सर्वतोपरी संभाळते ती त्याचे संगोपन करते. त्याला नीतीकथा, चातुर्यकथा सांगून तो त्याचे कुसूम-कोमल मन फुलवते. त्यावर सुसंस्कार घडवते. शिवबा, विनोबा, बापुजी यासारख्या थोर व्यक्तींनी आपल्या यशाचे श्रेय आपल्या मातेलाच दिले आहे. बापुजी तर आपल्या आत्मवृत्तात सांगतात एक माता ही समग्र शिक्षकांपेक्षाही श्रेष्ठ आहे. प्रत्येक माणूस आता ज्या सध्याच्या स्थितीत आहे. तो फक्त त्याच्या





आईमुळेच आहे. आई ही थोर गुरूही आहे. म्हणून तर बापुजी म्हणत एक आई शंभर गुरूंहूनही श्रेष्ठ आहे.

मातेचे कृपाछत्र एवढे विशाल आहे की शंभर वेळा जन्मूनही ते फिटणार. नाही. तिचे आपल्यावरील उपकार अमाप आहेत. जननी हे दैवत असामान्य आहे. ते आपल्यावर सदैव कृपा प्रसादाची खैरात करीत असते. म्हणुनच तर प्रत्यक्ष भगवान रामचंद्रांना स्वर्गापेक्षाही माता श्रेष्ठ वाटते. म्हणूनच तर म्हणावेसे वाटते आई सारखे दैवत नाही.

जगात सर्व वस्तू पैशाने विकत घेता येतात. पण आईची माया तुम्हाला कोणत्याच मोठ्या दुकानात, मॉलमध्ये आणि कोणतेच तोल मोल देऊन विकत मिळणार नाही.

**आकाशाचा केला कागद**
**समुद्राची केली शाइ**
**तरीही आईच्या ममतेचा**
**निबंध लिहिता येणार नाही...**

# आदर्श आई बाबा

**कु. ऋतुजा तावरे, ११ वी वाणिज्य**

आई घराचं मांगल्य असते तर बाप घराचं अस्तित्व असतो. पण घराचं अस्तित्वाला खरंच कधी समजून घेतले आहे का? वडीलांना जास्त महत्त्व असूनही त्यांच्या विषयी जास्त लिहीलं जात नाही, बोललं जात नाही, काही लेखकांनी बाप रेखाटला आहे तो पण तापट, व्यसनी, मारझोड करणाराच.

आईकडे अश्रूंचे पाट असतात तर बापाकडे संयमाचे घाट असतात. आई रडून मोकळी होते. पण सांत्वन मात्र वडीलांनाच करावं लागतं, आणि सांत्वन करणाऱ्यावरच जास्त ताण पडतो. कारण ज्योतीपेक्षा समईच जास्त तापते. पण श्रेय मात्र समईला न मिळता ज्योतीलाच मिळते. जेवणाची सोय करणारी आई लक्षात येते पण आयुष्याची शिदोरी करणारा बाप आम्ही विसरतो.

**लिहून लिहून काय लिहू**
**शब्द अपुरे पडतील आता,**
**लाखामधला एक हिरा**
**असे माझे माता - पिता.**

सर्वासमोर आई मोकळेपणाने रडू शकते पण रात्री उशीत तोंड खुपसून जो रडतो तो बाप असतो. आई रडते पण बापाला रडता येत नाही कारण छोट्या भावंडांना जपायचं असतं. आई गेली तरी रडता येत नाही. कारण बहिणींना आधार द्यायचा असतो. बायको अर्ध्यातून सोडून गेली तरी अश्रूंना आवर घालायचा असतो. कारण मुलाबाळांची जबाबदारी त्याच्यावर पडलेली असते.

जिजाबाईंनी शिवाजी घडवला असं अवश्य म्हणावं पण त्यांच्याबरोबर शहाजी राजांची ओढाताण लक्षात घ्यावी. यशोदेचे कौतुक करावे. पण पुरातून पोराला डोक्यावर घेऊन जाणारा वासुदेवसुध्दा लक्षात घ्यावा. राम कौशल्याचा पुत्र अवश्य आहे. पण पुत्रवियोगाने तडफडून मरण पावला तो पिता दशरथ होता.

**आईवडिलांच्या डोळ्यात अश्रू येतील**
**असे मी कधीही वागणार नाही**
**कारण त्या अश्रूंची किंमत मी**
**कधीच चुकवू शकणार नाही.**

कोणत्याही मंगल प्रसंगी सर्वजण जातात. पण मयताच्या प्रसंगी बापालाच जावे लागते. मुलाच्या नोकरीसाठी सतत फेऱ्या मारणारा, सतत खास्ता खाणारा बाप खरोखरच किती ग्रेट असेल ना! मुलगा सलूनमध्ये, मुलगी ब्युटी पार्लर मध्ये वीस पंचवीस रूपये खर्च करतील पण बाप दाढीचा साबण संपला म्हणून आंघोळीच्या साबणाने दाढी करतो. शेवटी जाता जाता एवढेच म्हणावेसे वाटते,

"चेहऱ्यावर कठोरता तरी मन हळवं दाटलेलं
पिलांवरची नजर काही हटत नाही का कुणास ठाऊक?
बाप कुणा कळत नाही."

# वृध्दाश्रमाला भेट

**कु. सानिया अय्युब शेख, १२ वी, कला**

प्रत्येक वसाहतीची एक वेगळी ओळख असते. स्वतःची भाषा असते, संस्कृती असते, माणसं बदलतात, काही दिवसांसाठी तिथलीच होऊन राहतात. स्वतःचं अस्तित्व जपताना भोवतालच्या वातावरणाचा एक भाग बनून जातात. अशाच एका वेगळ्या वसाहतीत एका वृध्दाश्रमात जाण्याचा प्रसंग मी अनुभवला, जो मनात खूप सारे प्रश्न निर्माण करून गेला.

दि. ३ ऑक्टोबर रोजी समासशास्त्र विभागातर्फे सौ. पोळ मॅडम यांनी ही भेट आयोजित केली होती. ठरलेल्या वेळेनुसार आम्ही सर्व विद्यार्थी बारामती वृध्दाश्रमात पोहोचलो. वृध्दाश्रमाची इमारत तशी नजरेत भरण्यासारखी होती. तिथल्या अंगणात वृध्द दोन - चार स्त्रिया फिरताना दिसल्या आम्ही तिथे जाताच आज काहीतरी वेगळे होण्याची शक्यता आहे. असे सर्व वृध्द व्यक्तींना वाटत होते. वृध्दाश्रम तसा मागासवर्गीयांसाठी आणि मध्यमवर्गीयांसाठी होता. थोडे जास्त पैसे देऊन स्वतंत्र खोली किंवा दोन व्यक्तींसाठी एक खोली अशी सोय होती. पलंग, टेबल, खुर्ची, कपाट, प्रत्येक खोलीत स्वच्छतागृह आणि सर्वांसाठी वृध्दाश्रमाच्या मध्यभागी एकच टी.व्ही. अशी वृध्दाश्रमाची रचना होती.

तसेच वृध्दांना पकडण्यासाठी लोखंडी पट्ट्याही होत्या. जेवणाच्या वेळाही ठरलेल्या होत्या. कुणाची तब्येत बरी नसेल तर खोलीत जेवण मिळण्याची सोय होती. परिसरात एक गणपतीचे मंदिर होते. चिंच, आवळा अशी अनेक झाडे परिसरात होती. अशी सर्व व्यवस्था असूनही काहीतरी चुकल्यासारखे वाटत होते.

कदाचित सर्व वृध्द माणसेच दिसत असल्याने वातावरणात चैतन्य जाणवत नव्हते. दिनक्रमात फारसे वैविध्यही नसावे. लहान मुलांचे बागडणे, तरूणाईची लगबग, घरातले रूसवे- फुगवे काहीच नाही. एक विचित्र समंजसपणा सर्वत्र भरलेला होता. आम्ही सर्व विद्यार्थी वृध्दांसोबत बोलत होतो. त्यातून अनेक कहाण्या उलगडत होत्या. कुणी मुले विचारत नाहीत,त्यांना अडचण होते म्हणून येथे आलेले, कुणाची मुले परदेशात त्यामुळे एकटे म्हणून तर काही मुलांच्या संसारात अडचण नको म्हणून स्वखुशीने मुलांच्या संसारातून विरक्त होऊन आलेली.

आम्ही सर्वांनी वृध्दाश्रमातील सभागृहात कार्यक्रम आयोजित केला. तेथील आजी - आजोबांची आम्हाला गाणी, नाटक, अभंग वैगेरे म्हणून दाखविले नंतर आम्ही विद्यार्थ्यांनी आपली मनोगते व्यक्त केली आम्ही सर्वांसाठी आणलेला अल्पोहार दिला. आम्हीही दुपारचे जेवण केले.

खरोखरच किती झपाट्याने बदलली आपली संस्कृती २०-२५ वर्षापूर्वी वृध्दाश्रम ही संकल्पना आपल्यासाठी नवीन होती. परंतु आजकालच्या आधुनिक युगात शहरांबरोबरच ग्रामीण भागातही वृध्दाश्रमांची संख्या वाढलेली दिसते. जीवन झपाट्याने बदलत आहे. त्या वेगाशी जुळवून घेणे वृध्दांना कठीण होत चालले आहे. भौतिक सुखाच्या मागे लागणारे तरूण नात्यांतील जवळीक, प्रेम, आपुलकी विसरताहेत की काय भीती वाटावी अशी अवस्था अनेक घरांत दिसते. परदेशात राहणारी मुले काही पैसे पाठविले की जबाबदारी संपली असे मानतात. काही महिन्यापूर्वीच बातमी पाहिली आईच्या मृत्युनंतर त्यांच्या अंत्यसंस्कारासाठीही मुलांना परदेशातून येण्यासाठी वेळ नव्हता. त्यांची किंमतही ते पैशात मोजू पाहत होते. ही गोष्ट अतिशय भयावह आहे.

अनाथाश्रमांची गोष्ट ही वेगळी नाही, मला तर असे वाटते अनाथाश्रम आणि वृध्दाश्रम हे दोन्ही एक व्हावे. जेणेकरून मुलांना आजी - आजोबांचे प्रेम मिळेल आणि चांगले संस्कारही मिळतील. तसेच वृध्दांना त्यांची नातवंडे मिळतील आणि एक नवीन आशा उमेद घेऊन दोघांचेही आयुष्य तेजोमयी होईल.

वृध्दाश्रमाच्या भेटीने नेमके काय झाले? एका समाजवास्तवाची एका प्रश्नाची, नात्यातल्या भावबंधाची नव्याने जाणीव झाली. त्याचबरोबर परिस्थितीमुळे आजच्या काळातील वृध्दांचे होणारे हाल, अनेक गरीब, निराधार वृध्दांसाठी आपण जमेल ती आर्थिक मदत करणे, त्यांच्याशी संपर्क साधून त्यांचे काही क्षण आनंदाचे करणे, हे किती गरजेचे आहे हे जाणवले. सर्वात महत्त्वाचे म्हणजे घरातल्या आजी- आजोबांची किंमत कळाली...

रोजच्या प्रार्थनेत शब्द नसतील तरीही चालेल, पण हृदय हवे. हृदयाशिवाय असलेले शब्द मात्र नकोत.





# आमची बारावीची सहल

**कु. ऋतिका गणेश शिंदे बारावी, कला**

यावर्षी आमच्या कॉलेजने शैक्षणिक सहल काढायची ठरवली कारण आम्ही सर्व कला शाखेच्या विद्यार्थ्यांनी आमच्या शिक्षकांना खूप खूप विनंती केली होती. फार प्रयत्नातून सरांनी उपप्राचार्या व प्राचार्यांकडून परवानगी मिळविली. सहलीला परवानगी मिळाल्यामुळे आम्ही खूप खुश होतो. कारण कॉलेजच्या आणि त्यातही बारावीच्या वर्षातली आमची पहिलीच सहल होती.

सहल जाण्याच्या एक आठवडा अगोदर सरांनी आम्हाला सहलीविषयी संपूर्ण माहिती दिली सहलीचे ठिकाण विभागाप्रमाणे निवडले होते. भूगोल विभागाकडून रांजणखळगे, लवणस्तंभ, राज्यशास्त्र आणि इंग्रजी विभागाकडून हिवरेबाजार हे गांव (आदर्श ग्रामपंचायत) आणि इतिहास व मराठी विभागाकडून अहमदनगरचे रणगाडा संग्रहालय आणि चाँदबिबीचा महल इ. ठिकाणे निवडली गेली. आपल्या सर्वांची सहल जाणार हे ऐकून माझा तर आनंद गगनात मावेनासा झाला. सर्वांना आनंद आणि आनंदच झाला होता. सहलीला जाण्याच्या आदल्यादिवशी नुसती धांदल उडाली. काय काय घ्यायचं? याची यादी तयार करण्यापासून ते मोबाईलची बॅटरी चार्ज करण्यापर्यंत सगळी तयारी करून ठेवली. सहलीची उत्सुकता शिगेला पोहोचली होती. शेवटी उगवला ३० सप्टेंबरचा आमच्या सहलीचा दिवस. सहलीच्या दिवशी सकाळी सकाळी ६:०० वाजता आम्ही सगळे एकत्र आलो. बस समोर नारळ फोडून आम्ही सहलीला शुभारंग केला.

आम्ही सर्वांनी 'गणपती बाप्पा मोरया' म्हणून बारामतीहून अहमदनगरकडे प्रस्थान केले. बस आल्या आल्या सुरुवातीलाच आम्हाला सेल्फीचा मोह काय आवरता आला नाही. सगळे सेल्फी काढायला लागले. बसमध्ये साऊंड सिस्टिमही होती. बारामतीची हद्द सोडली आणि बस मध्ये साऊंड सिस्टिम सुरू केली. गाणी वाजताच सर्वांचे पाय थिरकायला लागले. सर्वांनी ताल धरला, मुलांपेक्षा मुलीच जास्त डान्स करत होत्या. नुसता धिंगाणा सुरू झाला. एकेक नवनवीन गाणी वाजत होती आणि आम्ही थिरकत होतो. आम्हाला साथ द्यायला आमचे शिक्षकही होते. एक एक गाव पार करत आम्ही आमच्या पहिल्या पॉईन्ट वर पोहोचलो. तो पॉईन्ट होता रांजणखळगे. जगातील सर्वात प्रसिध्द असे हे रांजणखळगे. मोठमोठे रांजणखळगे तेथे प्रत्यक्ष बघायला मिळाली. तेथील परिसर फिरून आम्ही पुढील ठिकाणी निघालो ते तेवढ्यात आमचा दुसरा पॉईन्ट आला. तो होता लवणस्तंभाचा. दोन्हीही ठिकाणे भूगोल विषयाशी संबंधित होती. तेथे आम्हाला आमचे भूगोलाचे सर माहिती देत होते. साखरे सर या ठिकाणांची परिपूर्ण माहिती फिरून देत होते. लवणस्तंभाच्या ठिकाणी ऊन असून सुद्धा थंडावा जाणवत होता. तेथील गुहेतील लवणस्तंभ आम्ही बघितला. तेथेच एका वडाच्या झाडाखाली आम्ही सर्वांनी जेवायचे ठरवले. पण किस्सा असा झाला डब्बे उघडताच माकडांची फौजच आमच्या पंगतीला येऊन बसली. माकडांच्या भीतीने आम्हाला पळता भुई थोडी झाली. तो प्रसंग आठवला तरी हसू येते.

जेवण करून आम्ही पुढच्या दिशेने निघालो. आमची बस वेगाने धावत होती. कधी आम्ही हिवरेबाजार येथे पोहोचलो कळलेच नाही. त्या गावात पाऊल ठेवताच आपण कुठे वेगळ्याच स्वच्छ दुनियेत आहोत असेच जाणवले. तेथे एक सुध्दा कागदाचा कपटा नव्हता की चॉकलेटचे रॅपर. सगळा गाव स्वच्छ आणि स्वच्छच होता. गावची ग्रामपंचायत, गावाला मिळालेले सर्व पुरस्कार असणारे संग्रहालय आम्ही बघितले. आमच्या पठाण सर व दोशी मॅडम यांनी आम्हाला याविषयी माहिती दिली. आम्ही संपूर्ण गावाचा फेरफटका मारला, फोटो काढले आणि गावातून स्वच्छतेचा संदेश घेऊन पुढे नगरकडे निघालो. नगरमधील कॅवलरी टँक म्युझियम पाहण्यासाठी सगळेच उत्सुक होते. म्युझियमची हद्द सुरू होताच तेथे पहिला रणगाडा दिसला. त्यामुळे रणगाडा बघण्याची उत्सुकता अजूनच शिगेला पोहोचली होती. तेथे पोहोचताच आम्ही चकित होऊन सगळं पाहू

एखादा देश आणि त्याची नैतिक मूल्ये किती महान आहेत, हे तेथल्या प्राण्यांना कशी वागणूक देतात त्यावरूनही कळून येते.

लागलो. केवढे मोठे जुने टँक तेथे होते! प्रत्येक रणगाड्यासोबत फोटो काढत, रणगाडे बघत बघत पुढे जात होतो. तेथे ३ मेमरी गॅलरी म्युझियम होते. प्रत्येक गॅलरी म्युझियममध्ये भारताने इतर देशांशी केलेल्या युद्धाची माहिती दिलेली होती. शहीद जवानांच्या कामगिरीची माहिती तसेच भारतीय सेनेविषयी माहिती दिली होती. रणगाडे बघत दोन तासाचा वेळ कसा गेला समजलेच नाही नंतर आम्ही तेथीलच फातिमा बाग बघण्यासाठी गेलो. या फातिमा बागेची हिस्ट्री खूप जुनी आहे. शाहजहानने ताजमहाल बांधण्यामागची आयडिया याच वास्तूपासून घेतली होती. यानंतर आम्ही चाँदबिबीचा मकबरा बघण्यासाठी गेलो. दोन्ही ठिकाणी आम्हाला आमचे इतिहासाचे सर (कळंत्रे सर आणि ओवेकर सर) माहिती देत होते. या ठिकाणाचे ऐतिहासिक महत्त्व जाणून घेतले. फोटो काढले आणि परतीच्या प्रवासाला निघालो.

कशी ही एकदिवसीय सहल संपली हे कळलेच नाही. सगळ्या मित्र-मैत्रिणींसोबत तो दिवस अतिशय आनंदित गेला. त्यासोबत आमचे शिक्षकही आम्हाला साथ देत होते. आमच्या समवेत सहल एन्जॉय करत होते. ते आमचे शिक्षक आहेत असे संपूर्ण ट्रिप मध्ये वाटले नाही. अगदी आमच्या सर्वांप्रमाणे शिक्षकसुद्धा आनंद घेत होते.

सहलीसाठी उत्साह निर्माण करणारे पठाण सर, साखरे सर, कळंत्रे सर, कुंभार सर, गावडे सर, मदने सर, दोशी मॅडम, खोत मॅडम आणि माने दादा या सर्वांमुळेच आम्ही ट्रिप एन्जॉय करू शकलो.

खरंच आमची ही सहल खूप खूप अविस्मरणीय होती. अजूनही सहलीतील वेगवेगळ्या प्रसंगाची आठवण आल्यावर मन संतोषित होते. खूप अनुभव यातून मिळाले. हा सहलीचा अमूल्य ठेवा आयुष्यभर स्मरणात राहील.

# मायबोली मराठी

कु. सानिया अय्युब शेख ,बारावी, कला

**लाभले आम्हास भाग्य**
**बोलतो मराठी**
**जाहलो खरेच धन्य**
**ऐकतो मराठी**

किती प्रेमळ आहेत या ओळी. या ओळीतून आपण मराठीची किमया तिचे महत्त्व पाहतो. २७ फेब्रुवारी रोजी आपण मराठी दिन किती उत्साहात साजरा करतो. परंतु आज एकविसाव्या शतकात जीवन जगत असताना आपण मराठी भाषेचे महत्त्व विसरत आहोत.

मराठी ही महाराष्ट्राची शान आहे आणि महाराष्ट्राची बोलीभाषा आहे. प्राचीन काळापासून महाराष्ट्रावर अनेक राजवटींनी राज्य केले. सातवाहन काळात मराठी भाषा व संस्कृती आकार घेऊ लागली. यादव काळात महाराष्ट्रीयन संस्कृती विकास पावली. संस्कृत भाषेतून मराठी भाषेचा जन्म झाला. मराठी ही महाराष्ट्राची लोकभाषा, मातृभाषा व एकमेकांशी संवाद साधण्याची भाषा म्हणून सातशे वर्षे सातत्याने आपण वापरत आहोत. आपण ज्या भाषेत जन्मतो, वाढतो ती भाषा आपल्या आयुष्याचा एक अविभाज्य घटक असते. थोर साहित्यिकांनी मराठी भाषेला नटवून, थटवून सुंदर केले, शुध्द केले. ज्ञानेश्वर, कालिदास, साने गुरूजी, कुसुमाग्रज या थोर साहित्यिकांनी मराठी भाषेच्या ग्रंथसंपदेमध्ये वाढ केली. महाराष्ट्रातील आचार - विचारांच्या परंपरांची मराठी संस्कृतीची जडणघडण केली अशी ही मोठी थोरवी आपल्या मायबोली मराठीची आहे.

परंतु आज आपण आपल्या मातृभाषेची आपुलकी, प्रेम, जिव्हाळा विसरत चाललो आहोत. असे नाही वाटत का? कारण बघा ना आईचं मम्मी झालयं, बाबा जिवंतपणीच डेड झालाय, ताईचं सिस आणि दादाचं ब्रो झालय या पाश्चात्य संस्कृतीने आपल्या मराठी भाषेचे विस्मरण होत आहे हे सगळं आता थांबायला हवं...

आधुनिक काळात इंग्रजी ही भाषा महत्त्वाची असली तरी मराठी ही आपली मातृभाषा आहे. याचे भान ठेवून आपण मराठीचा पुरस्कार करायला हवा. यासाठी मराठी भाषेच्या शाळेत आपल्या मुलांचा प्रवेश घ्यावा. मराठी पुस्तके असणारी ग्रंथालये सुरू करावी. मराठी चित्रपटांची संख्या वाढवावी. संपर्क साधने, दूरदर्शन, फॅक्स, ई-मेल, संगणक अशा सोसल मिडियाचा वापर व उपयोग आपण आपल्या मराठी भाषेच्या प्रचारांसाठी करायला हवा. सर्वांनी एकजुटीने प्रयत्न केल्यास समर्थांनी सांगितल्याप्रमाणे

मराठी तितुका मेळवावा
महाराष्ट्र धर्म वाढवावा

तुम्ही मला कैद करू शकता, माझा छळ करू शकता, माझे शरीर नष्ट करू शकता, पण माझ्या मनाला कैद करू शकत नाही.





# विद्यार्थ्यांचा अभ्यास... पालकांची डोकेदुखी

कु. पूजा विजय माने , ११वी विज्ञान

आजचे आधुनिक युग स्पर्धेचे आहे. प्रत्येक पालकाला वाटते की, या जीवघेण्या स्पर्धेत माझा मुलगा टिकला पाहिजे. स्पर्धेत सर्वश्रेष्ठ ठरला पाहिजे. त्यासाठी विद्यार्थ्यांनी अभ्यास करावा व चांगले गुण परीक्षेत प्राप्त करावे, अशी प्रत्येक पालकांची तसेच शिक्षकांची विद्यार्थ्यांकडून अपेक्षा असते. आपल्या मुलाचे उज्वल भवितव्य म्हणजे उत्तम शिक्षण! आपण मुलाकडून शक्य तेवढा अधिक अभ्यास करून घ्यायलाच हवा. आपल्याला शक्य होत नसल्यास खाजगी शिकवण्या लावून अभ्यासाचा कोठा पूर्ण करायला हवा. पण मुले अभ्यासाचा कंटाळा करतात. त्यांच्याकडून अभ्यासात टाळाटाळ होते ही पालक वर्गाची खरी चिंता आहे व पाठांतर, वाचन, लेखन म्हणजे अभ्यास असा सर्व पालकांचा गोड गैरसमज आहे.

अभ्यास म्हणजे सराव. विषय ठरलेले असतात. प्रश्नही ठरलेले व उत्तरेही ठराविक असतात. फक्त शेकडो प्रश्न असतात आणि त्यातले मोजकेच प्रश्न प्रत्यक्ष परीक्षेच्या वेळी सोडवायचे असतात. त्यात नाविन्यता काहीच नसते. केवळ आठवून उत्तरे लिहिणे म्हणजे परीक्षा! थोडक्यात प्रश्नांची उत्तरे आधीपासून ठाऊक असतात. ती लक्षात ठेवणे म्हणजे अभ्यास! यापेक्षा अभ्यासाला मोठा अर्थ नसतो.

अभ्यास म्हणजे स्मरणात ठेवून आवश्यक असेल तेव्हा ते सांगणे अथवा लिहिणे होय. मग तो कुठलाही विषय असो, कविता, धडा, गणित, शास्त्र, इतिहास, भूगोल यापैकी कुठल्याही विषयाचा अभ्यास करणे म्हणजे स्मरणशक्तीचा खेळ असतो. शिकवण्याची पद्धत खेळातून किंवा मनोरंजनात्मक असली तर शाळा किंवा अभ्यास मुलांना कंटाळवाणा वाटणार नाही. दुर्दैवाने आजची भारतातील शिक्षण पध्दती आणि अभ्यासाचे प्रकार रटाळवाणे आहे. त्यात मुलांना रमण्याचा, खेळण्याचा विचार केला जात नाही म्हणून अभ्यास हा विषय विद्यार्थ्यांसाठी कंटाळवाणा विषय बनून जातो. साधे गणिताचे पाढे किंवा कवितेची गोष्ट घ्या. ज्या मुलांना शिकविलेली नसताना सिनेमाची गाणी आपोआप पाठ होतात, त्यांनाच पाठांतर घेऊनही पाढे का लक्षात राहत नाहीत?

उत्तर अगदी सोपे आहे. जी गोष्ट बालकांना मनापासून आवडते ती गोष्ट मेंदूवर ठसा उमटवित असते व त्याच गोष्टीत विद्यार्थी रममाण होतात म्हणूनच त्यांना सिनेमातील फक्त गाणी लक्षात राहतात. त्यांचे मन त्याच गोष्टीत रममाण होत असते. तिथे जोरजबरदस्ती नसते, कंटाळा नसतो. साहजिकच जे समोर येते तेच मनमोकळे पणाने स्विकारते याउलट परिस्थिति शाळेत असेल तर त्याचा मनाचा दरवाजा बंद राहील. तो शाळेत फक्त देहाने हजेरी लावेल व त्याचा अभ्यासही होणार नाही.

विद्यार्थ्यांचे मन प्रसन्न असले, विषय त्याचा आवडीचा असेल तेव्हा ती गोष्ट मेंदू स्विकारण्याच्या तयारीत असतो व मनः पटलावर माहिती नोंदविली जाते. यालाच पक्का अभ्यास म्हणतात. ज्यावेळी विद्यार्थ्यांचे शाळेत लक्ष राहत नाही तेव्हा त्याच्या मेंदूचे दार पूर्णतः बंद असते. शिक्षकांनी कितीही दार ठोठावले तरी त्याचा काहीच उपयोग होत नाही. तेव्हा केवळ पालकांच्या इच्छेखातर किंवा शिक्षकांच्या भीतीपोटी मुले वर्गात बसतात, ऐकतात परंतु त्यांचे मन त्या वर्गात वा अभ्यासात नसतेच. मग घडलेल्या, दिसलेल्या, ऐकलेल्या गोष्टी लक्षात राहणार कशा? आणि लक्षातच राहिल्या नाहीत तर विचारल्यावर सांगणार तशी कशा? मग परीक्षेतही लिहिता येणार नाही व गुणही मिळणार नाहीत.

माहिती स्मरणात ठेवून योग्य वेळी सांगण्याची किंवा लिहिण्याची सज्ञता म्हणजेच अभ्यास होय! त्यासाठी त्या विषयात, तो ऐकण्यात किंवा समजून घेण्यात रस असला पाहिजे. अन्यथा मूल वर्गात बसेल पण त्याचा अभ्यास आजिबात होणार नाही. त्यासाठी मुलांना राजीखुशीने माहिती मिळविण्याची सवय लावणे आवश्यक आहे. त्यांच्या ज्ञानेंद्रियांना ही सवय लावली तर अभ्यास मुलांसाठी कंटाळवाणा होत नाही, की पालकांसाठी ती डोकेदुखी उरत नाही. मुलांसाठी खेळ किंवा विरंगुळा हा अभ्यासच बनून जातो. म्हणूनच शिक्षक बांधवांनी खेळीमेळीच्या वातावरणात मनोरंजनात्मक पध्दतीने अध्यापन कार्य करावे.

तुमच्या कृतीचे काय परिणाम होतील हे तुम्हाला कृती करण्याआधी कधीच कळणार नाही. पण तुम्ही काहीच केले नाही तर, त्यातून काही निष्पन्नही होणार नाही.

# सेंद्रिय शेती काळाची गरज

श्री. बुरूंगले श्रीनाथ दादासो., ११ वी विज्ञान

पर्यावरण म्हणजे काय? तर पर्यावरण म्हणजे निसर्ग या पर्यावरणात झाडे, पाणी, मनुष्य या गोष्टी असतात व त्या निसर्गावर अवलंबून असतात. याच निसर्गाचा एक मुख्य घटक म्हणजे शेती. आपण शेतीमध्ये धान्य पिकवतो म्हणून आपल्याला अन्न मिळते. शेतीमध्ये फळे, भाज्या मातीमधून पिकतात व त्या आपण खातो पण आजच्या काळातल्या भाज्या किंवा अन्न आपल्या आरोग्याला चांगले आहे? तर नाही कारण आजच्या काळातील भाजीपाल्यावर मोठ्या प्रमाणात रासायनिक खते व कीटकनाशकांचा मारा झालेला असतो. काही लोक आपले उत्पन्न वाढावे व पैसे मिळवण्यासाठी आपले पीक कसे चांगले उगवेल हे पाहतात पण यासाठी ते आपल्या शेतीला खूप जास्त प्रमाणात रासायनिक खत टाकतात. आणि त्यामुळे आपल्याला रसायनयुक्त अन्न खायला लागते.

आपल्या भारतीय परंपरेत माता व माती या दोन गोष्टींना खूप जास्त महत्त्व दिले गेले आहे. माता म्हणजे आपल्याला जन्म देणारी आई असते. व माती ही आपल्याला अन्न देणारी आई असते. म्हणजे दोन्ही गोष्टींमध्ये साम्य आहे. पण आज हीच माती प्रदूषित झाली आहे. आपण फळे स्वच्छ धुवून खातो पण आपण ते फळ कितीही वेळा धुतले तरी त्यामध्ये गेलेल्या रासायनिक (विषारी) अर्काला आपण काहीच करू शकत नाही. आपल्याला ते फळ खावेच लागते. जर त्या फळांमधील विषारी अर्क आपल्या शरीरात गेला तर त्याचा थेट परिणाम आपल्या शरीरावर होत असतो. त्यामुळे डायबेटीज, मदूमेह, कॅन्सरसारखे रोग आपल्याला होतात. कारण आपण जे रासायनिक खत मातीमध्ये टाकतो ते मातीत मिसळते. मातीत मिसळल्यानंतर ते रासायनिक खत झाडांच्या मूळाला जाऊन मिळते ते झाड ते रासायनिक खत शोषून घेते व त्या झाडांच्या फांद्यामधून फळांत जाते. ते फळ आपण खातो. त्यामुळे या सर्व गोष्टींवर एकच उपाय म्हणजे पर्यावरणपूरक सेंद्रिय शेती. तर सेंद्रिय शेती म्हणजे काय किंवा याचा पर्यावरणाला कसा फायदा होतो तर सजीव पर्यावरणीय रचना व जीवनचक्रास समजून घेऊन रासायनिक खतांचा वापर पूर्णतः टाळून केलेली एकात्मिक शेती म्हणजे सेंद्रिय शेती होय. आपल्या भारतामध्ये अनेक ठिकाणी सेंद्रिय शेती केली जाते. त्यामध्ये सिक्कीम हे राज्य सर्वात जास्त सेंद्रिय शेती करते. त्याचबरोबर महाराष्ट्र, छत्तीसगड यांसारखी राज्ये सेंद्रिय शेती करतात. आपल्या भारताबरोबरच इतर देशांमध्येही मोठ्या प्रमाणात सेंद्रिय शेती केली जाते. उदा. जर्मनी, फ्रान्स, इटली सर्वात महत्त्वाचे म्हणजे इस्त्राईल या देशात जगातील सर्वात जास्त उत्पादन मिळते ते सेंद्रिय शेतीचे. हा देश आपल्या महाराष्ट्रातील तीन जिल्ह्यांएवढा देश आहे. या देशात पाणी जास्त असते का? नाही. तर तेथील पाण्याची साठवण करून पुन्हा वापरले जाते व सेंद्रिय शेती केली जाते म्हणून तेथील शेती चांगली आहे. आपल्या देशातला शेतकरी हा रासायनिक खतांवर जास्त पैसे खर्च करतो. संपूर्ण भारतात साधारणपणे ६ लाख ८० हजार करोड रूपये हे रासायनिक खतांना जातात म्हणजे एवढा पैसा आपल्या देशातून बाहेरच्या देशात जातो. आपण आपल्या देशातील स्वदेशी गाईचे शेणखत वापरले पाहिजे. कारण आपल्या भारतीय संस्कृतीमध्ये गाईला देव मानले जाते.

आपले भारतीय शेतकरी शेती करतात पण योग्य पद्धतीने करत नाहीत म्हणून दुष्काळग्रस्त आहेत. आता योग्य शेती म्हणजे नक्की कशी तर रासायनिक खत शेतीला न टाकता सेंद्रिय खत शेतीला टाकावे. या सेंद्रिय शेतीमध्ये अनेक प्रकार असतात. त्यामध्ये गांडूळ खत, कंपोस्ट खत, शेणखत व जीवामृत या प्रकारची खते आहेत. त्यामध्ये गांडूळ खत ही एक सोपी खताची पद्धत आहे. आपल्या शेतामध्ये विविध प्रकारचे जीवजंतू असतात. त्यामुळे आपली शेती चांगली येते. जीवजंतू आपल्या शेतीतील मातीला सुपिक व पिकाऊ बनवते आणि आपला शेतकरी रासायनिक खते टाकून या जीवाणूंना नष्ट करून टाकतो. या जीवजंतूमध्ये गांडूळ नावाचा एक जीव असतो. या गांडूळाला शेतकऱ्याचा मित्र म्हणून ओळखले जाते. कारण गांडूळ असा एकमेव जीव आहे की, शेतकऱ्यांना शेतीमध्ये खूप जास्त मदत करतो.





म्हणजे गांडूळ शेतीची माती भुसभुशीत बनवतो. एका दिवसात गांडूळ तीन ते चार वेळा जमिनीतून वर-खाली करतो म्हणजे एका मार्गाने ते गांडूळ खाली गेले की दुसऱ्या मार्गाने वर येते. ते गांडूळ भुयारी मार्ग तयार करते. या मार्गातून पावसाचे पाणी जमिनीत साठून राहते व त्याचा फायदा शेतीला होतो. पावसाचे पाणी नदी, नाले यांना जाऊन मिळत नाही त्यामुळे पाण्याची बचत होते. हे गांडूळ एका वेळेस ५० ते ६० हजार पिल्लांना जन्म देते. एका विशिष्ट प्रकारचे गांडूळ तर एक लाख पिल्लांना जन्म देते. याच पद्धतीने आपल्या शेतामध्ये जर करोडो - करोडो गांडूळ तयार झाली तर आपल्याला त्याचा नक्कीच फायदा होणार आहे.

आपल्या महाराष्ट्रातील शेतकरी हा आज शेतमालाला बाजारभाव नाही, दुष्काळ, नापिकता व कर्जबाजारी म्हणून आत्महत्या करताना दिसतो. यावर एकमेव पर्याय म्हणजे सेंद्रिय शेती. जर शेतकऱ्याने सेंद्रिय झिरो बजेट शेती केली तर त्यांचा तोटा होणार नाही, फायदाच होईल, कारण खतांचा खर्च पूर्णपणे कमी होईल व त्यांच्या शेतमालाला मोठ्या प्रमाणात हमीभाव मिळेल. कारण सेंद्रिय शेतीला देशात मोठ्या प्रमाणात मागणी असल्याचे आपल्याला दिसते. म्हणून सेंद्रिय शेती हाच एक राजमार्ग आहे. जर आपण आपल्यामध्ये स्वदेशी वृत्ती बाळगली तर नक्कीच आपला देश महासत्ता झाल्याशिवाय राहणार नाही. कारण आपल्या देशातला पैसा आपल्या देशातच राहील हे माझे मत आहे. चला तर मग आपल्या देशाला विषमुक्त करूया शेतकऱ्यांना सांगू या रासायनिक छोडो और सेंद्रिय अपनाओ. आपण सेंद्रिय शेतीची माहिती पाहिली पण आपण हे खत व किटकनाशक घरच्या घरी कसे बनवावे हे पाहूया खाली दोन सूत्र दिलेली आहेत.

※ १ एकरासाठी (सेंद्रिय खत) - १० किलो शेण (देशी गाईचे) + १० लिटर गोमूत्र + १ किलो गूळ + १ किलो डाळीचे पीठ (बेसन) + १ किलो माती (वडाच्या झाडा खालील माती) + १०० लीटर पाणी.

हे मिश्रण एकत्र करूण एका प्लास्टिकच्या ड्रममध्ये पंधरा दिवस सावलीत कापड बांधून झाकून ठेवावे व नंतर शेतीला द्यावे.

※ १ एकरासाठी (सेंद्रिय किटकनाशक) - गाय ज्या झाडांच्या पानांना खात नाही त्या झाडांची पाने (उदा. सीताफळाचे पान, आघाड्याचे पान इ.) २ ते २.५ किलो + हिरवी किंवा लाल मिरची ३०० ग्राम + लसूण अर्धा किलो + ३० लिटर गोमूत्र + २०० लिटर पाणी

हे मिश्रण एका भांड्यात गरम करून थंड झाल्यावर गाळून रोपांवरती मारावे त्यामुळे कीटकांचा नाश होईल.

## मातीशी नातं

गुंठा गुंठा जमीन विकून
आज गोफ आली गळ्यात
पण एक प्लेट मातीचा वास हुंगायला
उद्या रक्त येईल डोळ्यात

काळ्या आईच्या तळतळीचा
हा दागिना किती दिवस जाईल
हाच सोन्याचा हार
उद्या गळ्यातला फास होईल

जन्माच्या सात बाऱ्यावर बोजा
चढला काय आणि उतरला काय
जित्या माणसांच्या काळजात बघा ना
इथे किती फेरफार झालाय
अरं त्याच कागदाच्या
तुकड्यासाठी बघा ना
इथे किती वेळा काळजाच्या
तुकड्यावर वार झालाय

आता तुमचंच राज्य होऊ द्या
तुमचीच हवा
तुम्ही मंगळावर जा चंद्रावर जा
उंच उंच उडायला
जशी शिकवते माती
पण खोल खोल गाडायला
तिला नसते कुणाची भीती

श्री. सौरभ जगताप, ११वी

# गरज ही शोधाची जननी

कु. साक्षी वाघमारे, ११ वी विज्ञान

गरज ही शोधाची जननी आहे हे काही खोटे नाही. पूर्वीपासून ते आजपर्यंत नवे नवे प्रयोग पहावयास मिळाले. ते आपण अनुभवले, करून बघितले. जसे की मानवाला आधीच्या काळात दूरवरचा टप्पा पायी चालत चालत पार करावा लागत असे. मग त्याने आपल्या वेळेची बचत व्हावी म्हणून दोन चाकांवर चालणाऱ्या सायकलचा शोध लावला. नंतर त्यामध्ये प्रगती होत होत जाऊन मोटारसायकल पर्यंत पोहोचली आहे. म्हणूनच वरील वाक्य त्रिकालबाधीत सत्य आहे.

तर सर्वांनाच पडणारा प्रश्न म्हणजे नारळाचं तेल काय इतकं स्वस्त आहे की ते डिझेलमध्ये मिसळावं? दरवर्षी १२,००० मॅट्रिक टन जादा तेलाचं काय करावं हीच एक जागतिक समस्या होऊन बसली आहे. मग नारळाचं तेल जास्त झालंच आहे, तर मग बघावं ते डिझेल मध्ये टाकून. तर असाच एक प्रयोग १९८२ साली फिलिपाइन्स मध्ये एका डिझेल इंजिनवर हा प्रयोग करण्यात आला. पण काही कालावधी नंतर असे लक्षात आले की, कोको डिझेलवर गाड्या चालवणाऱ्या चालकांच्या तक्रारी येऊ लागल्या. त्यास कारण असे की मशीनमधल्या इंधन गाळणीमध्ये गाळ साचून राहिल्यामुळे ते निकामी होताहेत असं आढळलं. तर यावर तज्ज्ञांनी शोध घ्यायला सुरूवात केली. त्यांच्या अभ्यासातून असे लक्षात आले की, कोको डिझेलचे साठे ज्या टाक्यामध्ये केले होते. त्या साठ्यांच्या तळाशी काही सूक्ष्मजंतूच्या वाढीमुळे बुळबुळीत पदार्थ मोठ्या प्रमाणात जमा झाला होता. त्यात प्रामुख्याने डिझेलचा साठा आणि जिवाणू व बुरशीची वाढ झालेली दिसून आली. बहुतेक या पाण्याने जंतूच्या वाढीसाठी योग्य असेल असं वातावरण तयार केलं असावं.

त्यानंतर १८८३ मध्ये कोकेन तेलाच्या चाचण्या सतत ६ महिन्यापर्यंत घेण्यात आल्या. ६ महिन्यानंतर असे लक्षात आले की, टाक्यांमध्ये फॅटी ॲसीड, प्रथिने आणि बाष्प यांच्या टक्केवारीत फरक पडला आहे, तसेच जंतूची वाढ थांबली आहे. असं होण्याचं कारण म्हणजे नारळाच्या तेलातील फॅटी ॲसिड्स व तेच इंधनात तरंगण्यासाठी पाण्याला मदत करतात. नारळाचं तेल हे समजा आधीपासूनच जंतू प्रदूषित असेल तर इंधनात बुरशीची वाढ झपाट्याने होत राहते. फॅटी ॲसिडला काही अंशी शुध्द केल्यानंतर कोकेन तेल असं म्हणतात व त्याचं प्रमाण ०.०५ टक्के ठेवण्यात आलं, जे पूर्वीच्या तेलात २ टक्के होते.

यात सर्वात महत्त्वाचा प्रश्न होता तो मोठ्या प्रमाणात इंधन साठवून ठेवण्याचा आणि दूर दूर अंतरावर वाहून नेण्याचा. नारळाच्या तेलात फॅटी ॲसिडसचं प्रमाण कमी करणं, बाष्पाचं कमी प्रमाण आणि जंतूंच्या वाढीवर नियंत्रण एवढी पथ्ये पाळली तर ३० टक्के नारळाचे तेल डिझेलला उत्तम पर्याय म्हणून वापरायला काहीच हरकत नाही.

आज आपलं शरीर आणि मन ५० % किंवा त्यातून जास्त पाण्याच्या भेसळीला उत्तम प्रतिसाद देतं की नाही, तशीच नारळाच्या तेलयुक्त डिझेलची कथा आहे. अशाच प्रकारे नारळाचं तेलसुध्दा डिझेलमध्ये मिसळलं तरी वाहनांना मुळीच त्रास नाही.





# महात्मा फुले यांच्या शैक्षणिक विचारांची गरज

कु. दीपाली मदने १२वी, कला

शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे. जो प्राशन करेल तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही. अशी एक म्हण आहे म्हणजे त्याचा अर्थ पूर्वीच्याकाळी शिक्षण हे फक्त राजांच्या, श्रीमंतांच्याच मुलांना मिळत असे. बाकी उर्वरित समाज थोडा फार सोडला तर त्यापासून दूरच असे त्यामुळे शिक्षणाचे महत्त्व मानवी जीवनात किती महत्त्वाचे आहे हे आपला इतिहास सांगतोच. त्यामुळे असे शिक्षण सर्वांना मिळण्यासाठी आधुनिक भारताच्या इतिहासामध्ये अनेक समाजसेवक, विचारवंतांनी आपले मत मांडून प्रत्यक्षात त्यासाठी कार्य देखील केले आहे.

या लेखातून शिक्षणाबद्दलचे महात्मा फुले व क्रांती – ज्योती सावित्रीबाई फुले यांचे विचार मांडण्याचा प्रयत्न करीत आहे.

आधुनिक भारताच्या इतिहासामध्ये इ.स. १८१८ साली पेशवाईचा अस्त झाला आणि तेथूनच पुढे ब्रिटिशांनी भारतात आपल्या सत्तेचे खऱ्या अर्थाने पाय रोवले, असे एकीकडे होत असताना महाराष्ट्रामध्ये दुसरीकडे सुधारक सामाजिक जागृतीची कामे करीत होते त्यातूनच हिमालयाच्या उंची एवढी व्यक्तिमत्त्वाची आणि कर्तृत्वाची कितीतरी माणसे इथे होऊन गेली. त्यापैकी एक उगवता तारा, महाराष्ट्राचे मार्टिन ल्युथर किंग म्हणजे महात्मा फुले होय.

म. फुले यांनी समाज सुधारणेसाठी कार्य करताना सामाजिक, आर्थिक, कृषी, शैक्षणिक इ. विषयी विचार मांडले त्यापैकी मी त्यांचे शैक्षणिक विचार या लेखातून मांडत आहे.

म. फुले यांनी १९ व्या शतकातील सामाजिक परिस्थितीचे परीक्षण करून शिक्षणासाठी जनजागृती करताना समाजातील सर्व जाती, धर्माच्या माणसांना ते मिळाले पाहिजे व ते गरजेचे आहे हे त्यांनी जाणले कारण समाजामध्ये अज्ञान, अंधश्रध्दा यामुळे फार विदारक परिस्थिती झाली होती. त्यामुळे शिक्षणातून समाजात बदल होईल त्यासाठी ते सक्तीचे व मोफत असावे हे महत्त्वाचे.

आज जागतिकीकरणामध्ये त्यांच्या या विचारांची अत्यंत गरज आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञान, संशोधन यामुळे मोठा बदल झाला आहे. त्यामध्ये इंटरनेटने तर सर्व जगच जवळ आले आहे. त्याचा पारंपरिक शिक्षणामध्ये उपयोग होत आहे. पण याच शिक्षणाची प्राथमिक गरज सक्तीचे यासाठी की एखाद्याने उच्च शिक्षण घेतले तरी त्याला इंटरनेट वरून फॉर्म भरता येत नाही म्हणून गरजेचे आहे व मोफत यासाठी की एखाद्या गरीब घराण्यातील पण त्यांची आर्थिक स्थिती चांगली नसेल तर इन्फोर्मेशन टेक्नोलॉजी चे शिक्षण घेता येत नाही.

म. फुले यांना नेहमी असे वाटे की, निसर्गाने सर्व मानव समान निर्माण केला आहे. तर त्यामध्ये भेदभाव का? पुरूषांना जे शिक्षण तेच स्त्रीला पण मिळालेच पाहिजे. पूर्वी पुरुष वर्गच शिक्षणात पुढे होता. स्त्रीला घरकामच करावे लागे. पण आज पुरूषांच्या बरोबरीने स्त्रियासुध्दा शिक्षण घेताना दिसत आहेत, नव्हे बरोबरीने प्रत्येक क्षेत्रात कार्यरत आहेत.

म. फुले पुढे असे म्हणतात की, शिक्षणाला मर्यादा, चौकट नसावी कारण शिक्षणामुळे मानवाला जीवनामध्ये उत्कर्षाप्रत जाता येते. आज जर आपण त्याबाबत पाहिले तर असे दिसते की, शिक्षणासाठी भारतातून बाहेरच्या देशात जाणारा व बाहेरच्या देशातून भारतात येणारा तरूण वर्ग हा जागतिक बदल आपणास दिसून येतो.

स्त्री – शिक्षणाबाबत तर फुले दाम्पत्यांनी मोलाचे कार्य केले आहे. म्हणून तर माझ्यासारख्या लाखो मुली आज देशभरातून उच्च शिक्षणाकडे वाटचाल करीत आहेत ते नेहमी म्हणत की पुरुषाच्या बरोबरीने स्त्रीलाही शिक्षण देण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. कारण पुरुष एकटाच शिकतो. पण एक स्त्री शिकली तर ती संपूर्ण कुटूंबालाच शिकवते. त्यासाठी त्यांनी १८४८ साली पुण्यामध्ये बुधवार पेठेतील भिड्यांच्या वाड्यात मुलींसाठी पहिली शाळा सुरू केली. यावरून आपणास असे दिसून येते की, स्त्री ही प्रत्येक क्षेत्रातील शिक्षणामध्ये आघाडीवर आहे. समाजकारण, राजकारण, अर्थकारण, क्रीडा, शिक्षण, कुंटुब, राष्ट्र, जागतिक पातळीवर

देखील भारतीय स्त्रीने आपल्या कामातून ठसा उमटवला आहे.

म. फुलेंचा शिक्षणाकडे पाहण्याचा दूरदृष्टीपणा लक्षात येतो. अडाणी, गंजलेल्या समाजाला या अन्याय, अत्याचार या वेदनांतून बाहेर काढावयाचे असेल तर शिक्षण हे अत्यंत महत्त्वाचे आहे.

परंतु तोच समाज शिक्षणातून सुशिक्षित झाल्यानंतरही स्त्रीकडे त्याचा बघण्याचा दृष्टीकोन या २१ व्या शतकातही बदलत नाही. कारण समाजामध्ये होणाऱ्या भयानक घटना उदा. अल्पवयीन मुली, शाळकरी मुली, स्त्री यांच्या वाट्याला अन्याय, अत्याचार हा या विज्ञान व तंत्रज्ञान युगातील समाजाकडून कमी झालेला दिसत नाही त्यामुळे समाजाला म. फुले यांच्या शिक्षणाची, विचारांची नितांत गरज आहे.

अमेरिकेत सदाचारी गोऱ्या लोकांनी काळ्या निग्रो लोकांची गुलामगिरीतून मुक्तता करण्यासाठी जे कार्य केले तेच कार्य सर्वांनी दलित इतर मागासवर्गाला धार्मि गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी करावे असे त्यांना वा अमेरिकेत रंगभेदनीती घातक होती. तशी भारतात जातीभे नीती घातक आहे असे त्यांचे म्हणणे होते आणि ते आ देशात जाती, धर्म, भेद किती मुळावर रूजला आहे या प्रचीती येते.

एक प्रकारे समानता नष्ट करणारी धार्मिक - जा गुलामगिरी त्यांना संपवायची होती. ज्याप्रमाणे अमेरि आणि युरोपात पोपशाही विरूध्द बंड झाले त्याप्र देशातील स्वतःच्या वर्गास उच्च समजणाऱ्या भटशाही वि त्यांनी बंड केले. ते जातीव्यवस्थेविरूध्द होते आणि या गोष्टी शिक्षणाच्या माध्यमातून दूर होतील असा त्यांचा विश्वास होता. म्हणूनच म. फुले यांच्या विचारांची आज आहे.

## उष:काल

निशिगंधेचे उदक प्रवाळी शिंपे सुन सडा
भल्या सकाळी देऊळमध्ये वाजे पावरी अन् चौघडा

सरली ती अंधार रात्र ही रिलया दिपक ज्योती
तारक मंडल पुष्प होऊनी भास्करचरणी वाहती

रविकिरणांनी आंगण नटुनी झाले ते खेमाचे
दव बिंदुना मोहर फुटले स्वर्गाचे ते झाले

क्षितीजावरती सुर्य उगवला परास्थली यामिनी
विहंग ते गगनात विहारी विजयध्वज रोवूनी

ध्वज तो भासे केसरी त्यासी जरी सोन्याची
कुठे साठवू अद्भुत पुंजी या विशाल दृश्याची

श्री. प्रसाद शरद कोकीळ १२वी. विज्ञान

माझ्यातल्या उणीवा आणि माझे अपयश हे माझं यश आणि माझ्या बुध्दिमत्तेसारख देवाकडून मिळाले आहे. मी या दोन्ही गोष्टी देवाच्या पायी





# महाविद्यालयातील माझी जडण घडण

कु. राधेश्याम सुभेदार ११वी, शास्त्र

ज्यावेळी मी पहिल्यांदा इ.११वीच्या निमित्ताने कॉलेजमध्ये पाऊल टाकलं त्यावेळी मी थोडा घाबरलेला होतो. गहिरवलेलाही होतो. जसे नव्याने जन्मलेले गरूडाचे पिल्लू आसमंतात झेप घ्यायला पंख पसरवतो. उत्साही निर्भींड पण कचरणारं मन नवा मुलूख पालथा घालायचा कसा? हे प्रश्नचिन्ह डोळ्यासमोर ठेवूनच. पाठीवर हात ठेवून लढ म्हणणारे शिक्षक तर होतेच म्हणूनच आसमंताची यशस्वी भरारी घेवून आनंदाने लँडींग करता आली. आज लिहिताना उमटणाऱ्या अक्षरांसवे या आठवणी जाग्या होतात. अगदी काल घडल्या सारख्या स्पष्ट. त्याचाच हा आढावा.

टी.सी. कॉलेज विद्याधनाबरोबरच इतर सर्व क्षेत्रातही अग्रेसर म्हणून प्रवेश घेतला तो मुळी ॲकडमीची गुलामगिरी धुडकावून स्वतंत्र अस्तित्व रेखांकित करण्यासाठी. माझ्यातला मी शोधण्यासाठी... अगदी सर्व विद्यार्थ्यांप्रमाणेच सर्व शिक्षकांचे प्रेम मिळवलं. ते प्रेम म्हणजे सकाळी पुष्पदलांवर पडणाऱ्या सोनेरी किरणांप्रमाणे ज्यांच्या आगंतुक स्पर्शाने अंग आखडून घेतलेलीही फुले रात्रीची चादर झटकून मटकन डोके बाहेर काढतात आणि फुलवतात.

कॉलेज विश्वाची प्रतिमा उलगडते तोच विज्ञान नाट्य एकांकिका येऊन धडकली. कॉलेजच्या विज्ञान मंडळाने या नाटिका स्पर्धेचे स्वागत केले आणि योगाहॉलमध्ये आमचा अभ्यास सुरू झाला. खरे पाहता नाटक क्षेत्राला मी सोडून बाकीचे नवखे माझा असा थोडासा अनुभव दुसऱ्यांकडून उधार आणलेला मात्र अंगात चिकाटी असणाऱ्या माझ्या मित्रांमुळे आणि आटोळे मॅडम, मांडवे मॅडम, शेख मॅडम, कंडरे सर, गणेश सर व समग्र विज्ञान मंडळ यांच्या आशीर्वादामुळे आम्ही पुणे येथे तृतीय क्रमांक पटकावला. मात्र या यशामागचे खरे सूत्रधार आमचे मार्गदर्शक शिक्षक त्यात प्रामुख्याने कॉलेजचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर सर, उपप्राचार्या माळी मॅडम, मोरे सर आणि आगवणे सर यांमुळेच हा शिवधनुष्य उचलता आला.

मोरोपंत वक्तृत्व स्पर्धेचे मी खूप आधीपासून ऐकत आलो होतो. ही स्पर्धा जिंकायचीच असे ठरवले आणि कामाला लागलो. आमचे कॉलेज व बारामती नगर परिषदेतर्फे आयोजित महाराष्ट्रातील नावाजलेली स्पर्धा जो जिंकेल तो उत्तम वक्ता असा त्यावर कायमचा शेरा लागत असे. पण जिंकणं इतकं सोपं नव्हतं. भुकेल्या वाघासमोरून शिकार आणण्याचं काम ते. पण सततचे प्रयत्न व गावडे सर, शेंडे सर व कुंभार सरांचे सतत चे मार्गदर्शन यामुळे कनिष्ठ विभागातील प्रथम क्रमांक मिळवणारा मी वक्ता ठरलो. यामुळे मला अजूनच हुरूप आला व मला व्याख्यानालाही बोलावले गेले.

यानंतर परिवर्तन स्पर्धा पुणे, प्रतिभा वक्तृत्त्व स्पर्धा सुपे येथील नाट्य स्पर्धा, एम बी ए कॉलेज बारामती येथील विनोदी नाट्य स्पर्धा, शिवजयंती निमित्त अनेक स्पर्धा यात सातत्याने आघाडी मिळवली. अनेकान्त आविष्कारमध्ये सूत्रसंचालनाची जबाबदारी माझ्याकडे होती. त्यामुळे अनेक लोकांसमोर बोलावे कसे हे कळले. मायक्रोबायोलॉजीच्या झालेल्या कॉन्फरन्सच्या सांस्कृतिक कार्यक्रमात तर देश-विदेशातून आलेल्या व्यक्तीसमोर काम करण्याची संधी मिळाली.

हे सर्व शक्य झाले ते शिक्षकांनी घेतलेले सततचे कष्ट, आमच्यावर केलेले निस्वार्थ प्रेम, यशात-अपयशात त्यांचे बरोबर राहणं त्यामुळे हे कॉलेज निवडून चांगलंच मिळवलं याची प्रचिती येते.

या जगातल्या सर्व महान धर्मांच्या मुलभूत सत्यावर माझा विश्वास आहे. ही सगळी देवाची देणगी आहे.
हे ही मला मान्य आहे. म्हणूनच फार पूर्वी मी एक निष्कर्ष काढलाय. की सर्व धर्म सत्य आहेत. आणि सर्वांमध्ये काही ना काही चुका आहेत.

देखील भारतीय स्त्रीने आपल्या कामातून ठसा उमटवला आहे.

म. फुलेंचा शिक्षणाकडे पाहण्याचा दूरदृष्टीपणा लक्षात येतो. अडाणी, गंजलेल्या समाजाला या अन्याय, अत्याचार या वेदनांतून बाहेर काढावयाचे असेल तर शिक्षण हे अत्यंत महत्त्वाचे आहे.

परंतु तोच समाज शिक्षणातून सुशिक्षित झाल्यानंतरही स्त्रीकडे त्याचा बघण्याचा दृष्टीकोन या २१ व्या शतकातही बदलत नाही. कारण समाजामध्ये होणाऱ्या भयानक घटना उदा. अल्पवयीन मुली, शाळकरी मुली, स्त्री यांच्या वाट्याला अन्याय, अत्याचार हा या विज्ञान व तंत्रज्ञान युगातील समाजाकडून कमी झालेला दिसत नाही त्यामुळे समाजाला म. फुले यांच्या शिक्षणाची, विचारांची नितांत गरज आहे.

अमेरिकेत सदाचारी गोऱ्या लोकांनी काळ्या निग्रो लोकांची गुलामगिरीतून मुक्तता करण्यासाठी जे कार्य केले तेच कार्य सर्वांनी दलित इतर मागासवर्गाला धार्मिक गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी करावे असे त्यांना वाटे अमेरिकेत रंगभेदनीती घातक होती. तशी भारतात जातीभेद नीती घातक आहे असे त्यांचे म्हणणे होते आणि ते आज देशात जाती, धर्म, भेद किती मुळावर रूजला आहे याची प्रचीती येते.

एक प्रकारे समानता नष्ट करणारी धार्मिक - जातीय गुलामगिरी त्यांना संपवायची होती. ज्याप्रमाणे अमेरिकेत आणि युरोपात पोपशाही विरूध्द बंड झाले त्याप्रमाणे देशातील स्वतःच्या वर्गास उच्च समजणाऱ्या भटशाही विरूध्द त्यांनी बंड केले. ते जातीव्यवस्थेविरूध्द होते आणि या सर्व गोष्टी शिक्षणाच्या माध्यमातून दूर होतील असा त्यांचा ठाम विश्वास होता. म्हणूनच म. फुले यांच्या विचारांची आज गरज आहे.

## उषःकाल

निशिगंधेचे उदक प्रवाळी शिंपे सुन सडा
भल्या सकाळी देऊळमध्ये वाजे पावरी अन् चौघडा

सरली ती अंधार रात्र ही रिलया दिपक ज्योती
तारक मंडल पुष्प होऊनी भास्करचरणी वाहती

रविकिरणांनी आंगण नटुनी झाले ते खेमाचे
दव बिंदुना मोहर फुटले स्वर्गाचे ते झाले

क्षितीजावरती सुर्य उगवला परास्थली यामिनी
विहंग ते गगनात विहारी विजयध्वज रोवूनी

ध्वज तो भासे केसरी त्यासी जरी सोन्याची
कुठे साठवू अद्भुत पुंजी या विशाल दृश्याची

श्री. प्रसाद शरद कोकीळ १२वी. विज्ञान

माझ्यातल्या उणीवा आणि माझे अपयश हे माझं यश आणि माझ्या बुध्दिमत्तेसारख देवाकडून मिळाले आहे. मी या दोन्ही गोष्टी देवाच्या पायी वाहतो.





# महाविद्यालयातील माझी जडण घडण

कु. राधेश्याम सुभेदार ११वी, शास्त्र

ज्यावेळी मी पहिल्यांदा इ.११वीच्या निमित्ताने कॉलेजमध्ये पाऊल टाकलं त्यावेळी मी थोडा घाबरलेला होतो. गहिरवलेलाही होतो. जसे नव्याने जन्मलेले गरूडाचे पिल्लू आसमंतात झेप घ्यायला पंख पसरवतो. उत्साही निर्भीड पण कचरणारं मन नवा मुलूख पालथा घालायचा कसा? हे प्रश्नचिन्ह डोळ्यासमोर ठेवूनच. पाठीवर हात ठेवून लढ म्हणणारे शिक्षक तर होतेच म्हणूनच आसमंताची यशस्वी भरारी घेवून आनंदाने लँडींग करता आली. आज लिहिताना उमटणाऱ्या अक्षरांसवे या आठवणी जाग्या होतात. अगदी काल घडल्या सारख्या स्पष्ट. त्याचाच हा आढावा.

टी.सी. कॉलेज विद्याधनाबरोबरच इतर सर्व क्षेत्रातही अग्रेसर म्हणून प्रवेश घेतला तो मुळी ॲकडमीची गुलामगिरी धुडकावून स्वतंत्र अस्तित्व रेखांकित करण्यासाठी. माझ्यातला मी शोधण्यासाठी... अगदी सर्व विद्यार्थ्यांप्रमाणेच सर्व शिक्षकांचे प्रेम मिळवलं. ते प्रेम म्हणजे सकाळी पुष्पदलांवर पडणाऱ्या सोनेरी किरणांप्रमाणे ज्यांच्या आगंतुक स्पर्शाने अंग आखडून घेतलेलीही फुले रात्रीची चादर झटकून मटकन डोके बाहेर काढतात आणि फुलवतात.

कॉलेज विश्वाची प्रतिमा उलगडते तोच विज्ञान नाट्य एकांकिका येऊन धडकली. कॉलेजच्या विज्ञान मंडळाने या नाटिका स्पर्धेचे स्वागत केले आणि योगाहॉलमध्ये आमचा अभ्यास सुरू झाला. खरे पाहता नाटक क्षेत्राला मी सोडून बाकीचे नवखे माझा असा थोडासा अनुभव दुसऱ्यांकडून उधार आणलेला मात्र अंगात चिकाटी असणाऱ्या माझ्या मित्रांमुळे आणि आटोळे मॅडम, मांडवे मॅडम, शेख मॅडम, कंडरे सर, गणेश सर व समग्र विज्ञान मंडळ यांच्या आशीर्वादामुळे आम्ही पुणे येथे तृतीय क्रमांक पटकावला. मात्र या यशामागचे खरे सूत्रधार आमचे मार्गदर्शक शिक्षक त्यात प्रामुख्याने कॉलेजचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर सर, उपप्राचार्या माळी मॅडम, मोरे सर आणि आगवणे सर यांमुळेच हा शिवधनुष्य उचलता आला.

मोरोपंत वक्तृत्व स्पर्धेचे मी खूप आधीपासून ऐकत आलो होतो. ही स्पर्धा जिंकायचीच असे ठरवले आणि कामाला लागलो. आमचे कॉलेज व बारामती नगर परिषदेतर्फे आयोजित महाराष्ट्रातील नावाजलेली स्पर्धा जो जिंकेल तो उत्तम वक्ता असा त्यावर कायमचा शेरा लागत असे. पण जिंकणं इतकं सोपं नव्हतं. भुकेल्या वाघासमोरून शिकार आणण्याचं काम ते. पण सततचे प्रयत्न व गावडे सर, शेंडे सर व कुंभार सरांचे सतत चे मार्गदर्शन यामुळे कनिष्ठ विभागातील प्रथम क्रमांक मिळवणारा मी वक्ता ठरलो. यामुळे मला अजूनच हुरूप आला व मला व्याख्यानालाही बोलावले गेले.

यानंतर परिवर्तन स्पर्धा पुणे, प्रतिभा वक्तृत्त्व स्पर्धा सुपे येथील नाट्य स्पर्धा, एम बी ए कॉलेज बारामती येथील विनोदी नाट्य स्पर्धा, शिवजयंती निमित्त अनेक स्पर्धा यात सातत्याने आघाडी मिळवली. अनेकान्त आविष्कारमध्ये सूत्रसंचालनाची जबाबदारी माझ्याकडे होती. त्यामुळे अनेक लोकांसमोर बोलावे कसे हे कळले. मायक्रोबायोलॉजीच्या झालेल्या कॉन्फरन्सच्या सांस्कृतिक कार्यक्रमात तर देश-विदेशातून आलेल्या व्यक्तीसमोर काम करण्याची संधी मिळाली.

हे सर्व शक्य झाले ते शिक्षकांनी घेतलेले सततचे कष्ट, आमच्यावर केलेले निस्वार्थ प्रेम, यशात-अपयशात त्यांचे बरोबर राहणं त्यामुळे हे कॉलेज निवडून चांगलंच मिळवलं याची प्रचिती येते.

या जगातल्या सर्व महान धर्मांच्या मुलभूत सत्यावर माझा विश्वास आहे. ही सगळी देवाची देणगी आहे.
हे ही मला मान्य आहे. म्हणूनच फार पूर्वी मी एक निष्कर्ष काढलाय. की सर्व धर्म सत्य आहेत. आणि सर्वांमध्ये काही ना काही चुका आहेत.

# भारतीय शास्त्रज्ञांची ओळख

श्री. तेजस भारत खरात, १२ वी विज्ञान

प्राचीन भारतीय विज्ञान तंत्रज्ञान क्षेत्रातला संशोधनाचा अभ्यास करताना आपण थक्क होऊन जातो. अक्षरशः १४ विद्या आणि ६४ कला त्यांना ज्ञात असल्याचे दिसून येते. भारतावर अनेक परकीय आक्रमणे झाली त्यावेळी मोगलांनी अनेक प्राचीन ग्रंथांचा विध्वंस केला. तर ब्रिटीशांनी अनेक मौल्यवान ग्रंथ पळवून नेले त्यामुळे थोर भारतीय शास्त्रज्ञांचा परिचय तसेच त्यांचे कार्य समजावे म्हणून हा लेख.

**महर्षी कणाद-**

कणान परमाणून अति सिद्धांत तत्वेन
आत्मसात्करोति इति कणादः

म्हणजे कण हा परमाणूंचा बनतो असा सिद्धांत आत्मसात करतो ते कणाद असंही म्हटलं जातं संशोधकांच्या मते कणाद हा इ.स. पूर्व ६०० या काळात होऊन गेला. न्यायदर्शनात सामान्य पदार्थाच्या जोडीने विशेष नावाचा आणखी एक पदार्थ कणादने मानला आहे. म्हणून त्याच्या दर्शनाला वैशेषिक दर्शन म्हणतात. त्याच्या वैशेषिक दर्शन ग्रंथात १० अध्याय आहेत. द्रव्याचे परमाणू असतात ही कल्पना कणादने प्रथम मांडली. सूर्यामुळे भूत-वर्तमान आणि भविष्यकाळाची उत्पत्ती होते हे कणादने प्रथम सांगितले.

**सुश्रुत व चरक-**

सुश्रुत हा शल्य चिकित्सक होता. त्याचा काळ इ.स. पूर्व ६०० असा आहे. त्यास शरीरशास्त्राचे पितामह असेही म्हटले जात. सुश्रुतसंहिता हा सुश्रुताचा ग्रंथ आहे. सुश्रुत हा ३०० प्रकारच्या शस्त्रक्रिया करत असे. त्यासाठी वापराव्या लागणाऱ्या १२० हत्यांराची माहिती सुश्रुताने दिलेली आहे.

चरकाचा काळ इ.स. पूर्व ३०० असा आहे. त्याचा चरक संहिता असा ग्रंथ आहे. पचनसंस्था आणि प्रतिकारशक्ती यावर विचार करणारा पहिला वैद्य म्हणजे चरक होय. शरीराची क्रिया ही मुख्यत्वेकरून वात, पित्त आणि कफ या तीन दोषांवर अवलंबून आहे. याचं संतुलन बिघडलं की आजार निर्माण होतात हे चरकाने सांगितले.

**आर्य चाणक्य-**

आर्य चाणक्याचा काळ इ.स.पूर्व ३५० चा आहे चाणक्य हा चंद्रगुप्त मौर्याच्या राजसभेत महामंत्री होता 'कौटिल्याचे अर्थशास्त्र' हा ग्रंथ त्याने लिहिला. भारती संस्कृतीतील सर्वांत दैदिप्यमान ग्रंथ म्हणून मानला जातो गृहनिर्माण शास्त्र व शहररचना शास्त्र यांबद्दल त्याने प्रथ माहिती दिली.

**आर्यभट -**

इ.स. ४७६ मध्ये या महान खगोलशास्त्रज्ञाचा जन्म झाला. वयाच्या २३ व्या वर्षी त्याने 'आर्यभटीय' हा ग्रं लिहिला. पायचे मूल्य, नक्षत्र दिनाचा काल, गोलयंत्र साइ टेबल, राहू, केतू, छेदन बिंदू इ. गोष्टी या आर्यभटा सांगितल्या.

**ब्रह्मगुप्त :**

ब्रह्मगुप्ताचा जन्म इ.स. ५९८ मध्ये झाला. त्या 'ब्राह्मस्फूटचा सिद्धांत' हा ग्रंथ लिहिला. तसेच त्याने दशमा पद्धत शोधून काढली. साइनरूल, साइन ऑफ अँग पृथ्वीचा व्यास याविषयीचे संशोधन केले.

**गणित शिरोमणी भास्कराचार्य -**

या महान गणित तज्ज्ञाचा जन्म इ.स. १११४ म महाराष्ट्रातील चाळीसगाव जवळ पाटण येथे झाला भास्कराचार्यांनी ११५० मध्ये सिद्धांत शिरोमणी हा ग्रं लिहिला. भास्कराचार्यांनी वेध घेण्यासाठी त्यांनी रामयं सम्राटयंत्र आदी यंत्रे बनविली. त्यांनी पृथ्वी भोवताल वातावरणाची उंची मोजली बीजगणित व कॅलक्युलस भास्कराचार्यांनी जगाला दिलेली देणगी आहे.

१९३० मध्ये नोबेल पुरस्कार मिळवणारे डॉ. सी. रामन यांच्या 'रामन परिणाम' या शोधामुळे भारताचे ना चारी दिशांना पोहोचले.

डॉ. अब्दुल कलाम यांचे अणुचाचण्याती संशोधनामुळे भारताने जगात आपला दबदबा निर्माण केला.

भेकडपणा ही हिंसेपेक्षाही अधिक तिरस्करणीय आहे.







# माझा एन.सी.सी. मधील अनुभव

श्री. रासकर अजयकुमार भरत, १२ वी कला

पाऊलवाट ही एकाच दिशेने जात असते. तिला अडवणारं कुणीही नसतं. एकांतात जसं फुलपाखरू बागडत असतं तसा वाटसरू त्या वाटेवरून जात असतो. वाटेतील काटेरी झुडपे काळोखामधील किडेमुंग्या यांना मागे सोडत असतो. आपलं आयुष्य देखील तसंच आहे. केवळ तीस हजार दिवसांचा काळ पण म्हणायला आयुष्य किती मोठं असतं? जीवनात जगण्याला खूप महत्त्व आहे पण त्याला महत्त्व तेव्हाच येतं जेव्हा जगण्याची दिशा समजत असते. अनेक--वेळा स्वप्नांवर काटेरी कुंपणे लावली जातात पण त्या कुंपणामध्ये आयुष्यातील होणाऱ्या चांगल्या घडामोडींची बाग फुलत असते. खरोखर जेव्हा गरज असते तेव्हा मदतीला धावून येणारा सोबती मार्गदर्शक, उपदेशक असावा असं वाटतं. तो मला प्रथमच तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील (राष्ट्रीय कॅडिट कोर) एन.सी.सी. च्या स्वरूपात मिळाला.

कॉलेज जीवन म्हणजे नक्की काय असतं? हे मला या महाविद्यालयात आल्यानंतर कळलं. खूप काही असतं बोलण्यासारखं, पण ते केवळ ओठांवरच राहतं दबून राहिलेला ज्वालामुखी जसा उफाळून बाहेर येतो, तसंच मनातील विचार बाहेर आल्यावर बंड केल्याशिवाय राहत नाहीत हे एन.सी.सी. च्या माध्यमातून रणांगणावर शत्रूला घाबरून जिवंत राहणं हाच खरा मृत्यू असतो. याची जाणीव एन.सी.सी. ने करून दिली. मला लहानपणापासून आर्मी मध्ये जायची आवड आहे. मी महाविद्यालयात प्रवेश घेतल्यानंतर एन.सी.सी. मध्ये प्रवेश निश्चित केला. एन.सी.सी. मध्ये प्रवेश केल्यानंतर आम्हाला एकत्र कसे वागायचं, युनिटी कशी असते हे सुरूवातीला समजावलं, दर रविवारी आमची परेड असायची. आम्हाला परेड मध्ये ड्रील शिकवली जायची. आमची १५ ऑगस्ट व २६ जानेवारीसाठी तयारी करून घेतली जायची. त्यानंतर जून महिन्यात कॉलेज भरल्यानंतर मला पुणे येथे कॅम्पला जाण्याची संधी मिळाली. १० दिवस आपल्या नातेवाईकांपासून जीवलगांपासून लांब राहायचं होतं कॅम्पमध्ये आम्ही सगळे कॅडेट वेगवेगळया शाखेतील होतो. त्यांच्या साथीने ड्रील करण्याची संधी मला मिळाली आणि पहिल्यांदाच एकी म्हणजे काय असते त्याची जाणीव झाली. आपलं आयुष्य हे एखाद्या काळजी करणाऱ्या व्यक्तीशिवाय किती अपूर्ण आहे हे त्यावेळी मला समजलं होतं. खूप आनंदी वातावरण असायचं दहा दिवसांची ती आठवण अजूनही दिव्य प्रकाशासारखी डोळ्यासमोर आहे. दोन दिवसांच्या मैत्री मधील ती गोड भाडणं, काही वेळ रूसणं, ग्रुपमधील गप्पा सिनीयरची हसत खेळत खाल्लेली बोलणी एकमेकांना दाखवलेला विश्वासावर सगळं अगदी मनाला भावणारं होतं.

आपण हे देखील लक्षात ठेवायला पाहिजे की आपण जे काम करतो ते करण्यासाठी या जगात आपल्यातील उपजत गुण ओळखा कारण नुसतं कॉलेजमधील सहा लेक्चर करून आयुष्यात जग जिंकता येऊ शकेल, परीक्षेतील प्रश्नांची उत्तरे तर कोणीही देऊ शकतो,पण जग जिंकणारा तोच असतो जो खऱ्या अर्थाने जीवनाच्या संकटांना, प्रश्नांना निर्भयपणे उत्तरे देत असतो. आपल्या कामावर तुमचा पूर्ण विश्वास असू द्या. असं म्हणतात की, बोलणाऱ्याची माती ही विकली जाते, पण न बोलणाऱ्याचं सोनं सुध्दा विकत नाही. वास्तविक पाहता पुस्तकी ज्ञान असून उपयोग नाही. त्यासाठी अंगी कौशल्ये आत्मसात करता आली पाहिजेत. पण परिस्थितीसमोर भलेभले बदलतात. एन.सी.सी च्या माध्यमातून समजलं की रणांगणात/ मैदानात एकट्यालाच उतरावं लागतं आणि एकट्यालाच खेळावं लागतं याची जर जाणीव झाली तरच आपण आपले स्वप्न पूर्ण करु शकू आणि भारताला जगातील एक महान शक्ती बनवू शकू.

कोणत्याही पुरूषाने अथवा स्त्रीने माझ्या सारखाच प्रयत्न केला आणि माझ्या प्रमाणे आशा आणि श्रध्दा यांचा विकास आपल्या मनामध्ये केला तर मी जे काही सिध्द केले आहे. ते कोणताही पुरुष अथवा स्त्री सिध्द करू शकेल याबद्दल मला कोणतीही शंका नाही.

# निरोप घेताना

कु. श्रीया स्वप्निल गांधी, १२ वी विज्ञान

Our ways may chage but not our hearts
Our life may lead us apart,
but our memories will link us together.

अकरावीत प्रवेश घेतला आणि कॉलेज सुरू झाले. अकरावीत असताना वेगवेगळ्या स्पर्धा जशा चित्रकला स्पर्धा, निबंध स्पर्धा, अनेकान्त अविष्कार यांसारख्या कार्यक्रमांमुळे कलागुणांना वाव मिळाला. बघता बघता अकरावी संपली आणि बारावी सुरू झाली. बारावीतील शिक्षक दिन हा नेहमीच आठवणीत राहील.

या दोन वर्षांमध्ये खूप काही शिकायला मिळाले. शिक्षकांनी आमच्या अज्ञानावर त्यांच्या ज्ञानाचा, अनुभवाचा, संस्कृतीचा लेप दिला. मनाच्या कोऱ्या करकरीत पाटीवर समतेचे, ममतेचे धडे गिरवले आणि आज ती पाटी ज्ञानरत्नांनी शिगोशिग भरलेली आहे. खरंच एवढे काळजी घेणारे, मार्गदर्शन करणारे, नेहमीच साथ देणारे शिक्षक मल लाभले यासाठी मी स्वतःला खूप भाग्यशाली समजते.

म्हणूनच जीवनाच्या सफरीतील एक पान पलटलं जीवनाचं एक तप उलटलं

दंगा केली, मस्ती केला, बोलणीही खाल्ली,

शाब्बासकीचा हात तसा, टाळ्याही झेलल्या.

हा निरोप घेताना खूप वाईट वाटतंय, दुःख मना अंतरीया पुन्हा पुन्हा दाटतंय.

सर्व मॅडमला आणि सरांना पुन्हा केव्हा भेटणा मनामध्ये साऱ्या आठवणी, सावली करून जपणार.

दिलेत तुम्ही खूप खूप, जातो आता दूर.

गुरूजन द्या आशीर्वाद, तुम्हीच दिली गती, तुम्ही दिली गती.

# ✻ धरा मार्ग सत्याचा ✻

देवानं, सर्वांना माणूस बनवून पाठवलं
मानवानं मग माणसाला जातीत बाटवलं,
जातीभेद करून जातीचं राजकारण पेटवलं
माणसाची खरी जात माणूसकी आहे
हे विधानच मग त्याने संपवलं ।।

इच्छा, ध्येयवादाहूनही आकर्षक माणूस होणे
अन् माणुसकीवरल्या श्रद्धेचं बीज बोने
त्याचा लोकांना का विसर पडतो कोण जाणे?
जातीच्या नावाखाली, धर्मच्या बुरख्याखाली
राष्ट्रप्रेमाचा मुखवटा घालुनिया
निरनिराळ्या रूपांनी प्रवृत्त झाला
माणूस, माणसाची हत्या करावया।।

देवळामध्ये माजला सारा आळश्यांचा स्वार्थ
बेचिराख करावेत जाती धर्म देशाच्या अभ्युदयार्थ,
मानवनिर्मित आहेत सर्व जाती-धर्म-पंथ
हे विश्वचि माझे घर सांगती साधू संत ।।

ब्राम्हण नाही, हिंदूही नाही न मी एक पंथाचा
तेच पतित की जे आखडिती प्रदेश साकल्याचा
म्हणे नवा शिपाई केशवसुतांचा
सर्व माणसे समान आहेत
धरा मार्ग सारे सत्याचा ।।

कु. राधा अविनाश चव्हाण, ११वी, विज्ञान

भयग्रस्त मनुष्य सत्याचा किंवा प्रेमाचा उपासक असू शकणार नाही.







# माझा राईफल शुटिंगचा अनुभव

श्री. लोहिताक्ष गणेश बनछोड, १२ वी, कला

आज मी तुमच्यासमोर माझा संघर्षमय जीवनाचा अनुभव मांडणार आहे की मी कसा जिल्हास्तरा पासून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरांवर गेलो आणि आज माझं भारतीय संघाच्या लिस्टमध्ये नाव आलेलं असून हे सर्व कसं आणि कोणामुळे शक्य झाले आणि मला या खडतर आणि संघर्षमय जीवनामध्ये कोणी - कोणी साथ दिली. खरंतर या प्रवासाला खडतर आणि संघर्षमय म्हणणे योग्य नाही कारण या प्रवासाच्या प्रत्येक क्षणाला, प्रत्येक भावनांना मी एन्जॉय करत होतो त्या सर्व गोष्टींचा मी आनंद घेत होतो कारण ते माझ्या आवडीचं कार्य होतं. माझ्या या खेळाला खूप प्रमाणात पॅशन डेडिकेशन आणि पेशंन्सची गरज लागते म्हणून मी इथे खडतर आणि संघर्षमय शब्द वापरला कारण सुरुवातीला हे सर्व गुण माझ्याकडे मुळीच नव्हते व हे सर्व गुण मला आत्मसात करावे लागले व ते मी कसे केले त्याचा हा संघर्षमय प्रवास...

जेव्हा मी लहान म्हणजेच ११ ते १२ वर्षाचा होतो तेव्हा माझ्या वडिलांनी मला ५ ते ६ गेम्स निवडण्यासाठी दिल्या त्यामध्ये ॲथलेटिक्स, कराटे,स्कॅटिंग, फुलबॉल, बॅडमिंटन आणि राईफल शूटिंग तर वडिलांनी मला या सर्व खेळांमध्ये सहभाग घ्यायला लावला आणि आवडीचा खेळ निवडायला सांगितला मग मी या सर्व खेळांमधून राईफल शूटिंग हा खेळ निवडला.

माझं वय वर्ष ११ असताना म्हणजेच मी इ. ४ थी मध्ये शिकत असताना माझ्या वडिलांनी माझा पहिला शूटिंगचा क्लास बालेवाडी स्टेडियममध्ये गन फॉर ग्लोरी या शूटिंग ॲकॅडमीमध्ये सुरु केला. तो माझा सात दिवसांचा सेफ्टी बेसिक कोर्स होता. त्यामध्ये मला सर्व राईफल शूटिंगच्या बेसिक गोष्टी शिकायला मिळाल्या म्हणजेच राईफल कशी पकडायची, आपल्या पायाची पोजिशन कशी असायला हवी, टार्गेटवर ऐमिंग कशी करायची, राईफल बाबतीतल्या सेफ्टी रूल्स इत्यादी या सर्व गोष्टी मला तिथे शिकायला मिळाल्या. तो कोर्स एका स्पर्धेसारखा होता. ज्यामध्ये १०० हून अधिक मुलं सहभागी झाली होती. सात दिवसात मला माझी गुणवत्ता सिद्ध करून दाखवायची होती. सात दिवसांमध्ये आमच्या सर्व स्पर्धा व टेस्ट झाल्या आणि त्या १०० जणांमधून माझा तृतिय क्रमांक आला ते मेडल माझ्या आयुष्यातील पहिलं मेडल होतं. सर्वांना आश्चर्य वाटलं की एवढ्या लहान मुलाने १०० जणांमधून तृतीय क्रमांक कसा मिळवला आणि ते पण माझ्यापेक्षा ४ ते ५ वर्षांनी मोठ्या असलेल्या मुलांमध्ये, कारण मी आणि माझा लहान भाऊ दोघेच त्या कॅम्प मध्ये खूप लहान होतो. मी चौथीत होतो आणि माझा भाऊ दुसरीत. तो कोर्स किंवा तो कॅम्प माझ्यासाठी एक ट्रायल होती. एक संधी होती माझ्या वडिलांनी दिलेली आणि त्या ट्रायल मध्ये मी पास झालो होतो. त्यामुळे माझ्या वडिलांनी माझ्यामध्ये एक ऑलिम्पिक वीर घडविण्याचेच स्वप्न पाहिले.

काही मुलांमध्ये कौशल्य हे जन्मजात असते आणि काही मुलांना कौशल्य हे आत्मसात करावे लागते.माझ्यामध्ये कोणतेच कौशल्य जन्मजात नव्हते. मी आत्मसात केले.बॅडमिंटन, कराटे,ॲथलेटिक्स, स्केटिंग, फुटबॉल इत्यादी या सर्व खेळांमध्ये प्रथमतः मी माहीर झालो. नंतर मी राईफल शूटिंग हा खेळ निवडला. राईफल शूटिंगचा मला अभ्यासामध्ये खूप फायदा झाला. त्यामुळे माझी एकाग्रता वाढली आणि अभ्यास केलेला लगेच लक्षात रहायला लागला. ध्येय प्राप्तीसाठी कौशल्य हा खूप महत्त्वाचा घटक आहे.इंटरनॅशनल खेळण्याचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी मला माझ्या आई वडिलांचे मार्गदर्शन लाभले. बालेवाडीचा कोर्स झाल्यानंतर २०१३ मध्ये माझ्या वडिलांनी माझ्यासाठी एक नवीन राईफल घेतली सतरा हजाराची. तेव्हा इंटरस्कूलच्या पण मॅचेस जवळ आल्या होत्या. माझे वडील मला आणि माझ्या भावाला सकाळी ४:०० वा. उठवत व्यायाम आणि ध्यानधारणा करायला सांगत. व्यायाम करून झाल्यावर ५.०० वाजता ते माझी प्रॅक्टिस घेत. प्रॅक्टिस झाल्यावर नाष्टा म्हणजेच डाइट खायला देत (अजून सुध्दा देतात) हे सर्व केल्यानंतर ते स्वतः मला शाळेत सोडवायला येत.

एखादा मनुष्य काही काम करू इच्छितो याची खातरजमा करणारा व ग्वाही देणारा गुण म्हणजे शिस्त होय.
त्याग, शिस्त व संचय नसेल तर मुक्ती व आशा यांची गोष्टच नको. शिस्त शून्य त्याग व्यर्थ होय.

माझे वडील १९९६ मधील राष्ट्रीय खेळाडू आहेत. नेमबाजी मध्ये, त्यांना राज्य स्तरावर मुलांमधून सुवर्ण पदक मिळाले होते. त्यांनी काही अडचणींमुळे पुढे जाता आले नाही त्यामुळे त्यांना त्यांचे स्वप्न माझ्यामध्येच पाहिले. माझे वडील माझ्या आयुष्यातील सर्वात मोठे मार्गदर्शक आहेत. ते माझे प्रथम गुरू आहेत. तेव्हा मी कोणत्याही गोष्टीमुळे डिमोटिवेट होतो तेव्हा मला मोटिवेट करण्याचे काम माझे वडील करतात. त्यांनी माझ्या चांगल्या-वाईट प्रसंगात मला एक वडील म्हणून नाही तर एक जिवलग मित्र म्हणून साथ दिली. ते माझ्या सोबत राहिले. जिथे कुठे मी डगमगलो तिथे त्यांनी मला सावरायचे काम केले आणि जेव्हा मी अहंकाराच्या बळी पडलो तिथे त्यांनी मला सावध केले. मला अहंकारामधून बाहेर काढले. माझ्या रोजच्या खाण्यापिण्यापासून ते माझ्या मॅचेसच्या फीस भरण्यापर्यंत सर्व कामे माझे वडील करतात.
माझी आई २०१२ ते २०१६ पर्यंत दर मॅचेसला माझ्यासोबत होती.

मी माझी पहिली इंटरस्कूल मॅच राजगुरूनगर पुणे येथे खेळलो २०१३ ला त्या मॅचमध्ये मला रौप्य पदक (सिल्व्हर मेडल) मिळाले. त्या ठिकाणी माझी आणि माझ्या शूटिंगच्या कोचची भेट झाली म्हणजेच माझे आदरणीय गुरू आनंद बोराडे सर जे अजून माझे गुरू आहेत त्यांनी मला बेसिक मधून ऍडव्हान्समध्ये आणलं.मी त्यांच्याकडे २०१४ ला कोचिंग लावली तेव्हापासून माझ्या परफॉर्मन्समध्ये वाढ झाली. त्यांनी मला प्रत्येक शूटिंग मधल्या टेक्निक्स सांगितल्या ज्यामुळे माझा स्कोर वाढीला लागला. जेव्हा मी लहान होतो तेव्हा बारामती मध्ये शूटिंग रेंज उपलब्ध नव्हती त्यामुळे मी दर शनिवार- रविवार माझ्या आईसोबत पुण्यात येऊन जाऊन प्रॅक्टिस करायचो. मला त्यांच्या मार्गदर्शनाखालील प्रत्येक मॅचमध्ये मेडल मिळत होते. सरांनी मला शिकवले कमी प्रॅक्टिस मध्ये आपले गोल कसे अचि[illegible] करायचे. ते मला प्रत्येक मॅचेसच्या आधी मोटिव्हेशन करतात ते मॅच खेळण्याची मेंटॅलिटी तयार करतात. माझी मॅच कशी चांगली जाईल याचा पूर्ण प्रयत्न करतात.

खरंतर मला मुख्य पिकअप पॉईंट सातवीमध्ये भेटला. माझी खरी शूटिंग ची सुरूवात तेव्हा झाली.मी माझी राष्ट्रीय स्पर्धादिल्ली येथेआठवीमध्ये १० मी. ओपन साईट या प्रकारात खेळलो. या सहा वर्षात मी ११ राष्ट्रीय स्पर्धा खेळलो, त्यामध्ये मला ४ राष्ट्रीय स्पर्धेत मेडल आहे. या सहा वर्षामध्ये माझ्याकडे २० सुवर्ण, ९ रौप्य आणि ११ कांस्य पदक अशी एकूण ४० पदके आहेत. माझी यावर्षी म्हणजेच २०१९ ला भारतीय संघात (इंडियन शूटिंग टीम मध्ये) निवड झाली आहे व मी आता आंतरराष्ट्रीय स्पर्धा म्हणजेच विश्व करंडक स्पर्धा (वर्ल्ड कप) खेळण्यासाठी सज्ज झालेलो आहे. माझ्या या सहा वर्षाच्या मेहनतीत आणि आता पर्यंतच्या सर्व यशामध्ये माझ्या आई-वडिलांचा आणि मार्ग दाखवणाऱ्या गुरूजनांचा खूप मोठा वाटा आहे. हे मला ऑलिम्पिक मध्ये भारताचा झेंडा फडकवण्याकरिता असेच मार्गदर्शन करतील याची मला पूर्ण खात्री आहे.

## मी शेतकरी

माझ्या विहिरीत पण नाही दोन थेंब पाणी
कोरडी नदी पण गातेय दुष्काळाची गाणी
ऊस जातो जळून कापसाला लागते कीड
त्या पिकलेल्या पिकात रानडुकरांची भीड
दिवसरात्र, राहून का मिळत नाही मला फायदा
मी मरेपर्यंत झोपा काढतोय का तुमचा हा कायदा?
अशी आहे माझ्या कर्जबाजारी आयुष्याची कथा
कुणीतरी ऐका माझी आत्महत्याग्रस्त कष्टाची व्यथा

कु. शिवानी राजेंद्र ढवळे, ११ वी विज्ञान

## माझी एंजल

माझी प्रिय बहिण, तुझ्याविना मी कसा राहिन ।।
तुच आहेस माझी एंजल..
तू असली की सर्व काही मंगल
तुच आहेस माझी एंजल
आपल्या दोघांचा जमतो चांगला मेळ ।
कारण तू आहेस खुपच प्रेमळ
घरामध्ये असते आपल्या दोघांचीच दंगल
खरच तुच आहेस माझी एंजल...

श्री. ओंकार सोमनाथ गुरव, ११वी विज्ञान

मी अशा हिंदुस्थान साठी झटेन की जेथे गरीबांमधल्या गरीबांनाही हा आपला देश आहे असे वाटेल. जो घडवून आणण्यास त्यांचाही वाटा असे





# स्मरण महात्माजींचे

प्रा. मानाजी गावडे (मराठी विभाग)

महात्मा गांधी १८६९ ते १९४८ अवघे ७८ वर्षाचे आयुष्य. आज त्यांना या जगाचा निरोप घेऊन ७२ वर्षे झाली आहेत. तरीही ते सर्वांना कुतूहलाचा विषय आहेत. आइनस्टाइनने गांधीजीबद्दल म्हटले आहे, येणाऱ्या पिढ्यांचा यावर क्वचित विश्वास बसेल की असाही हाडामांसाचा एक मनुष्य या भूतलावर होवून गेला.

गांधीजीच्या जीवनाचा आरंभ सर्वसाधारण माणसाच्या जीवनासारखाच आहे. परंतु पुढील काळात त्या जीवनाचा विकास महात्मा या स्थानापर्यंत झाला. सर्व जगाने त्यांची दखल घेतली. हा विकास, ही उंची, हे मोठेपण (महात्मा) कुठल्याही सत्तेने नाही तर ते त्यांनी त्याग करून मिळविले. त्यांनी कोणतेही नवे तत्त्वज्ञान शोधून काढले नाही. तर जुन्याच तत्त्वांचे आचरण त्यांनी केले व त्यांना पुन्हा जगन्मान्यता मिळवून दिली. त्यासाठी त्यांना कोणत्याही गुरूंकडून मार्गदर्शन झाले नाही, तर त्यांनी स्वतःच स्वतःचे गुरुत्व केले. निसर्ग नियमानुसार जीवनाचा स्विकार करणे, श्रमांची उपासना करणे, दीन दलित यांच्यावरील अन्यायाला वाचा फोडणे, त्यांच्यात मिसळून त्यांची सेवा करणे, भेदभावाला मूठमाती देणे, सर्वांच्या कल्याणाचा विचार करणे त्यानुसार कृती करणे आणि यासर्वांना नैतिक आधिष्ठान देणे, साधी रहाणी आणि उच्च विचारसरणी या तत्त्वाचा अवलंब करणे इ. थोडक्यात गांधीजींनी ईश्वराचा शोध मानवसेवेत घेतला.

गेल्या शतकातील सर्व श्रेष्ठ मानव म्हणून गांधीजींना ओळखले जाते. परंतु इमर्सनने एका ठिकाणी म्हटले आहे, टु बी ग्रेट, ईज टु बी मिस अंडरस्टुड. हे इतरांच्या बाबतीत कितपत खरे आहे. हे माहित नाही, परंतु म. गांधीच्या बाबतीत १०० टक्के खरे आहे. गांधीजींना महात्मा रविंद्रनाथ टागोरांनी म्हटले तर राष्ट्रपिता ही सर्वमान्य पदवी सुभाषचंद्र बोस यांनी दिली. याचे कारण राष्ट्रीयत्वाचे मुख्य लक्षण एकमेकां बरोबर रहाण्याची फक्त तयारी नव्हे तर ती इच्छा आकांक्षा हे आहे. ही भावना महात्मा गांधीजींच्या उदयानंतर त्यांच्या चळवळी मधून विधायक कार्यक्रमामधून जन्माला आली म्हणून सुभाषबाबूंनी त्यांना राष्ट्रपिता म्हटले हे जाणून घेणे आवश्यक आहे.

म. गांधींनी आपल्या जीवनात संपूर्ण स्वदेशीचा स्वीकार केला. राजकारण आणि समाजकारण यांच्या जोडीला अध्यात्माचाही आधार घेतला. भगवद्‌गिता त्यांना प्रिय होती पण त्याच्या जोडीला इतर धर्मांच्या ग्रंथाचाही त्यांनी स्वीकार केला. थोडक्यात गांधीजी हे सर्व धर्म समभाव आणि सद्‌विचारांचे संग्राहक होते. त्यांनी आपल्या कार्याला विशिष्ट तत्त्वाज्ञानाची जोड दिली. त्यासाठी सात सामाजिक पापांचा उल्लेख केला आहे.

१) सिध्दांतविहीन राजनिती
२) परिश्रमविहीन धनोपार्जन
३) सदाचार विहीन व्यापार
४) चारित्र्यविहीन ज्ञान
५) विवेकहीन सुख
६) संवेदनविहीन विज्ञान
७) वैराग्यविहीन उपासना

या पापांची व ही पापे करणाऱ्यांची प्रतिष्ठा नसेल असा समाज त्यांना अभिप्रेत होता. परंतु समाजाने त्यांची तत्त्वे सोयीस्कर पणे सोडून दिली. व सोयीपुरते त्यांना समोर ठेवले. त्यामुळेच कुसुमाग्रज म्हणतात - महात्मा गांधींच्या पाठीमागे फक्त सरकारी ऑफीसातील भिंतीच आहेत, जेथे ते फोटोच्या रूपाने टांगले गेले आहेत व अशा महात्म्यांना मरण असते दोनदा. एकादा वैऱ्याकडून आणि मग भक्तांकडून! एक प्रत्यक्ष मरण दुसरे संगमरवरी मरण! पुतळ्याच्या रूपाने! म्हणून आजही महात्मा गांधींना समजून घेण्याची आणि आचरण्याची खरी गरज आहे.

म. गांधीच्या बद्दल समाजात अनेक गैरसमज आहेत आणि ते त्यांना समजून न घेतल्यामुळे अधिक आहेत. काळाबरोबर समाजही बदलतो. परंतु काही शाश्वत तत्त्वे जतन करायची असतात. याचा अनेकांना विसर पडतो. गांधीजीच्या बाबतीत तेच घडले. आम्ही एकतर त्यांना तसबीरीत बंद करतो, अथवा त्यांच्या नावाचा उदो-उदो करतो, परंतु हे आम्हाला विसरता कामा नये. की अहिंसा, सहनशीलता, सहिष्णुता, सर्व धर्म समभाव, सामंजस्य यांची बीजे गांधीजीच्या प्रयत्नाने भारतीय समाजात रूजली आहेत. गांधीजींनी अहिंसा, सामर्थ्य आणि दूरदर्शीपणा यांची सांगड घातली त्याची फळे आज आपण चाखत आहोत.

विश्वामध्ये समृध्दी व शांती केवळ बाह्यसाधन संपत्तीच्या जोरावर प्रस्तापित करता येणार नाही हे गांधीजीच्या लक्षात आले होते. म्हणूनच समाजाला पैसा, यंत्रसामुग्री व भौतिक सुखाच्या मागे न पळण्याचा सल्ला त्यांनी दिला. मानवाने नैसर्गिक साधन संपत्तीचा वापर करावा, तो करणे गरजेचे आहे, परंतु वापर

जेथे उच्च-निच्च वर्गभेद राहणार नाही, तेथे सर्व जाती जमाती संपूर्ण तया गुण्यागोविंदाने नांदतील.

अतिरेकी नसावा, शोषण मुक्त असावा. धरती सर्वांचे पोषण करण्यास समर्थ आहे. परंतु लालसा भागवायला असमर्थ आहे. त्यामुळेच गांधी विचारांचे आकर्षण सर्वांना आहे. अजूनही विदेशी भारताला गांधींचा भारत असेच मानतात. गांधीजींचा एकूणच जीवनपट पाहिल्यास आपल्या असे लक्षात येते की – नितिमूल्ये, तत्त्वांबाबत त्यांच्या मनात भ्रामक कल्पना नव्हत्या. शरीरश्रमाला महत्त्व देणे, प्रार्थनेला दिनचर्येचा भाग बनविणे, स्वच्छतेचा आग्रह धरणे, आत्मसंयमावर जोर देण्याचा प्रयत्न हे सर्व मानवी जीवन समृध्द करण्यासाठीच त्यांनी अंगीकारले होते. म्हणूनच समाजातील सर्व स्तरातील लोकांनी गांधीजींना स्विकारले आपलेसे केले.

म. गांधींनी फार पूर्वी पासून चालत आलेल्या, धर्माग्रथांत नमूद केलेल्या सत्य, अहिंसा, ब्रह्मचर्य, अस्तेय, अपरिग्रह, उपवास, प्रार्थना, मौनव्रत इ. नैतिक मूल्यांचा पुनरूच्चार केला व त्यांचे सामर्थ्य स्वतःच्या आचरणातून सिध्द केले. एवढेच नव्हे तर हे सर्वांना शक्य आहे असा विश्वास त्यांनी जनमाणसांत निर्माण केला. अशा महात्म्यास जग कसे विसरेल. अल्बर्ट आईनस्टाइन, जॉर्ज बर्नाड शॉ, रोमारोला, इ. एम. फॉस्टर, लुई फिशर, जे. सी. कुमारप्पा, श्रीनारायण अग्रवाल, डॉ. जाकिर हुसेन, विनोबा भावे, दादा धर्माधिकारी, काकासाहेब कालेलकर, कृपलानी इ. ना. त्यांच्या विचाराचे महत्त्व पटले होते. प्यारेलाल, डि.जी. तेंडुलकर यांच्या सारख्यांनी त्यांच्यावर प्रदीर्घ ग्रंथ लिहीले. समाजातील सर्व स्तरांतील लोकांनी गांधीजींना स्वीकारले. भारतातील १९१७ ते १९४७ या वर्षातील त्यांच्या समाजसेवेला तोड नाही. त्यात त्यांना लाला लजपतराय–पंजाब, राजेंद्रबाबु –बिहार, राजगोपाला चारी– तामिळनाडू, वल्लभभाई पटेल – गुजरात, खान अब्दुल गफारखान – पठाण, नेहरू पिता पुत्र – काश्मिर अशा अनेकांची साथ मिळाली.

महात्माजींचे विचार आजच्या काळातही समजण्यास आणि आचरणात आणण्यास सहज शक्य आहेत. त्यांची विचारसरणी म्हणजे संतांकरिता तयार केलेली आचारसहि नव्हे. मानवी दुर्गुणांचे त्यांना पुरेपूर भान होते. गांधीजीं कोणताही नविन धर्म स्थापन केला नाही. परंतु सर्व धर्मांत सत्याचा त्यांनी पुनरूच्चार केला. अहिंसेला कृतिशिलतेचा एक न अर्थ दिला. संत अथवा राजकारणी अशी त्यांची वेगळी नव्हती व त्यांनी स्वतःला कधीही संत मानले नाही. समाज तळागाळात मिसळणारे, तिसऱ्या वर्गात प्रवास करणारे, पदया करणारे महात्माजी हे थोर समाजसेवक होते. मानवता गांधीजींचे दैवत होते, इतर जनात त्यांना ईश्वर शोधायचा होत रंजल्या – गांजल्यांच्या सेवेतूनच ईश्वर प्राप्ती होते यावर त्या ठाम विश्वास होता. त्यामुळे गोपाळ कृष्ण गोखले म्हणाले होते थोर थोर हुतात्मे व धीरोदात्त नायक यांचे रसायन गांधीजी नसा–नसातून वाहतेय. संपूर्ण जगाला गांधीजीच्या विचारखेरी अन्य पर्याय दिसत नाही आम्ही मात्र गांधी व त्यांचे विच कालबाह्य व संदर्भहीन झालेत म्हणून त्याची चर्चा करण्यात भूषण मानित आहोत. गांधींनी मांडलेले विचार आधुनिक नाही म्हणून संदर्भहीन झालेत असे म्हणणाऱ्यांना आधुनिक म्हण काय हेच नेमके कळलेले नाहीत. हे उद्गार आहेत. न्या.चंद्रशे धर्माधिकारी यांचे. आज आधुनिकतेच्या नावाखाली चंगळवा भोगवाद, दांभिकता यांनी थैमान घातले आहे. समाजाच्या स क्षेत्रात मूल्यांची घसरण सुरू आहे. केवळ भौतिक सुख आणि झ दीपवरणारी समृध्दी यालाच प्रगती समजणारा समाज आ पोखरला गेलाय. हे आम्हाला दिसत नाही. जीवनाची सार्थक आणि कृतार्थता यांचा बहुतेकांना विसर पडलाय अशा वेळी गांधींच्या विचारांची अत्यंत आवश्यकता आहे. पण ती भाषणबाजी अथवा जयंती – पुण्यतिथीच्या आठवणी पुरती नको तर त्यांच्या एका तरी तत्त्वाचे आचरण करण्याची गरज आ तर मानव सुखी होईल. कारण म. गांधी केवळ राष्ट्रवादी नव्हते मानवतावादी, विश्वधर्मी होते. सर्व मानवजातीच्या सुखाचा आ स्वास्थ्याचाच विचार त्यांनी आयुष्यभर केला होता.

## ❋ उंच भरारी ❋

साथीला आले आभाळ हे  
सांगते उंच भरारी घे  
येतील अनेक वादळे  
जाऊन तू त्यांना सामोरे  
उंच भरारी घे

कधी न झुकता वादळासमोर  
लढ शूरतेने आज तू  
पंखात येईल बळ  
जेव्हा लढशील आत्मविश्वासाने  
प्रयत्न त्यांचा असेल  
तुला धुळीत मिळविण्याचा  
पण तू सोडू नकोस

कधी ध्यास जिंकण्याचा  
जर माग फिरलास  
होशील तू असूनही नसल्यासारखा  
लढशील, अमर होशील  
जगशील तू नसूनही असल्यासारखा

कु. साक्षी कुंभार, ११वी वि





# करिअरच्या विविध वाटा

प्रा. पांडुरंग ओवेकर (इतिहास विभाग)

विद्यार्थी मित्र – मैत्रिणींनो,

इ. १२ वी झाल्यानंतर तुमच्या समोर मोठा प्रश्न असतो. तो करिअर निवडण्याचा. आपल्या मनात करिअरविषयी नेमक्या काय कल्पना असतात. करिअर या संकल्पनेतून आपल्याला काय अभिप्रेत असते ? एक म्हणजे आपण निवडलेल्या क्षेत्रात दीर्घकाळ राहून पैसा व नाव कमवायचे, निवडलेल्या क्षेत्राचा नीट अभ्यास करणे, कामाचा अनुभव घेणे व काम केल्याचे समाधान मिळविणे अशा सर्व गोष्टींचा सर्व समावेशक अर्थ म्हणजेच करिअर म्हणण्यास हरकत नाही.

करिअर विषयी निर्णय घेण्याचा महत्त्वाचा टप्पा इ. १० वी पासून सुरू होतो. यावेळी आपणास मिळालेल्या गुणांच्या आधारे योग्य निर्णय घेतला व योग्य मार्गदर्शन मिळाले तर तुमच्या करिअरची सुरूवात योग्य दिशेने होते. आता आपण करिअरच्या विविध वाटांविषयी माहिती घेऊ –

✲ **<u>कलाशाखेतील करिअर</u>** - या शाखेतील विद्यार्थ्यांना योग्यवेळी योग्य मार्गदर्शन मिळाल्यावर त्यांना योग्य दिशा मिळते. कलाशाखेतील विद्यार्थ्यांना विषय निवडीचा प्रश्न संतापत असतो. पण अशावेळी आपल्याला आवडीच्या विषयाची निवड केली व प्रामाणिकपणे अभ्यास केला तर निश्चित आपणांस फायदा होतो.

✲ **<u>अर्थशास्त्र</u>** - हा विषय मानवी जीवनाच्या सर्व अंगांना व्यापणारा विषय आहे. उद्योग व्यवसाय, ग्रामीण विकास, नियोजन शेती इ. घटनांच्या संबंधित हा विषय येतो. अर्थशास्त्रीय संशोधक, अर्थशास्त्रीय विश्लेषक, अर्थशास्त्रज्ञ रिसर्च यासारख्या पदांवर काम केल्याने शिक्षण, अनुभव व पगार चांगला मिळतो. एम ए अर्थशास्त्र ही पदवी मिळाल्यानंतर स्टॉक मार्केट, शेअर बाजार, इन्शुरन्स एजन्सी, इन्व्हेस्टमेंट ॲनेलिस्ट इत्यादी म्हणून सहज नोकरी मिळू शकते. याशिवाय वृत्तपत्रात अर्थवृत्त संकलक म्हणून काम करता येते. कृषी अर्थतज्ञ म्हणून कृषी उत्पादनापासून कृषी विपणनापर्यंत मोलाची भूमिका बजावता येते. शासकीय सेवेतील वित्त अधिकाऱ्यांना जागतिक बँक, आशिया बँक अथवा संयुक्त राष्ट्राच्या अर्थविषयक समित्यांमध्ये नियुक्ती मिळू शकते.

✲ **<u>इतिहास</u>** - पदवी व पद्व्युत्तर परीक्षांसाठी इतिहास विषय घेतला व पुढे सेट अथवा नेट या परीक्षा पास झाल्यानंतर वरिष्ठ महाविद्यालयात प्राध्यापक होता येते. तसेच इतिहास संशोधन मंडळाच्या माध्यमातून संशोधन करता येते. पुरातत्त्व विभागामध्ये नोकरीच्या संधी उपलब्ध आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे स्पर्धा परीक्षांच्या दृष्टीने इतिहास विषय फार महत्त्वाचा आहे. अगदी वैद्यकीय व अभियांत्रिकी शाखेतील उमेदवार या स्पर्धा परीक्षांसाठी इतिहास विषयाची निवड करतात. याशिवाय पर्यटक मार्गदर्शक, संग्रहालय व्यवस्थापक म्हणून काम पाहाता येते.

✲ **<u>मानसशास्त्र</u>** - मानवी मनाचा शोध घेणारे शास्त्र म्हणून ओळख आहे. मानवी मनाची जडणघडण, व्यक्तिगत विकास इत्यादीची मीमांसा या विषयात केली जाते. मानसशास्त्राच्या बाल मानसशास्त्र, औद्योगिक मानसशास्त्र, रूग्णविषयक व वर्तणूक मानसशास्त्र या उपशाखांमध्ये करिअर संधी उपलब्ध आहेत. याविषयी मानसोपचार तज्ञ म्हणून काऊन्सेलिंग व व्यक्तिमत्त्व विकास याबाबत काम करता येते. याद्वारे बराच पैसा मिळवता येतो.

✲ **<u>समाजशास्त्र</u>** - स्पर्धा परीक्षेच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण विषय आहे. तसेच पदवी नंतर एम.एस.डब्ल्यू. हा कोर्स पूर्ण केल्यानंतर स्वयंसेवी संस्थांमध्ये मोठ्या प्रमाणावर नोकरीच्या संधी उपलब्ध आहेत.

वरील विषयाव्यतिरिक्त भूगोल, राज्यशास्त्र, हिंदी, इंग्रजी, संगीत, तत्त्वज्ञान या विषयांमध्येही करिअरच्या संधी उपलब्ध आहेत. गरज आहे ती स्वतःला झोकून देण्याची अभ्यास करण्याची व योग्य विषय निवडण्याची

याशिवाय एल.एल.बी., एल.एल.एम., संगणक शास्त्रातील प्रोग्रॅमर, ॲटोकॅड, ॲनिमेशन, इंटरनेट, आयटीआय, पोलिससेवा, अभिनय, नृत्य, शिल्पकला, चित्रकला, फॅशन डिझायनिंग, इंटेरिअर डिझायनिंग, छायाचित्रकार, पत्रकारिता जाहिरात, वृत्त निवेदक, सूत्रसंचालक, परकीय भाषा दुभाषी इत्यादी क्षेत्रात करिअरच्या संधी उपलब्ध आहेत.

वरील बाबतीत आपण आपल्या आवडीनुसार आपले क्षेत्र निवडले तर आपला उज्वल भविष्यकाळ घडविण्यात आपणास सहज यश मिळू शकते. प्रयत्नपूर्वक अभ्यास, मेहनत, जिद्द, चिकाटी या गुणांच्या जोरावर आपण करिअर निश्चितच घडवू शकाल.

आपणांस पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा!

# भारत माझा देश आहे!

सौ. प्रियांका भानुदास सायकर (राज्यशास्त्र विभाग

'भारत माझा देश आहे' शालेय जीवनापासून ही प्रतिज्ञा आपण सर्वजण म्हणत आलो. या प्रतिज्ञेमध्ये भारत माझा देश आहे असे आपण म्हणतो कधीही आपण भारत आपला देश आहे असे म्हणत नाही. कारण येथे आपण एखादी वस्तू माझी आहे असा जेव्हा विचार करतो तेव्हा त्या वस्तूची जास्त काळजी घेतो. म्हणून तर आपण भारत माझा देश आहे असे म्हणतो. म्हणजेच माझ्या देशाची काळजी मलाच घ्यायची आहे. असा विचार प्रत्येकाच्या मनात भिडायला हवा... पण खरंच असे होते का? आज भारत माझा देश आहे असे जरी आपण म्हणत असलो तरी वागतो मात्र वेगळे.

भारत देशाला स्वातंत्र्य मिळून अनेक वर्षे झाली. परंतु स्वातंत्र्य आणि हक्क या संकल्पनांशी जरी आपली ओळख झाली तरी कर्तव्याशी मात्र आपण ओळख करून घेतलीच नाही. एक भारतीय नागरिक म्हणून कर्तव्य पालनसाठी स्वयंप्रेरणा हवी.

भारतात अनेक कायदे आहेत आणि ते कायदे भारताचा प्रत्येक नागरिक जाणतो. हे न्याय व्यवस्था गृहीत धरते त्यामुळे तर न्याय करताना कोणतेही न्यायालय आरोपीला कायदा माहीत होता की नव्हता याचा विचार करीत नाही. पण खरतर भारतात कायदे सोडाच पण बहुतांश नागरिकांना त्यांची मुलभूत कर्तव्ये देखील माहीत नाहीत.

आज ही मुलभूत कर्तव्ये प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षणामध्ये समाविष्ट करून शिकवली जाणे काळाची गरज आहे.

भारतीय संविधानात कलम ५१ 'क' ते ५१ 'ट' ही कलमे भारतीय नागरीकांची मुलभूत कर्तव्ये काय आहेत हे सांगतात.या कलमामध्ये काही महत्त्वपूर्ण तरतुदी केलेल्या आहेत. जसे की–

१) प्रत्येक नागरीकांनी संविधानाचे पालन करावे आणि त्याचे आदर्श व संस्था, राष्ट्रध्वज, राष्ट्रगीत यांचा आदर करावा. मात्र यांचा आदर हा स्वतः करावयचा आहे. ही बाब सर्व प्रथम ध्यानात घ्यावी. जरी कोणी याचा अवमान करीत असेल तरी संविधानाच्या कक्षेत राहून विरोध करावा. त्यासाठी तोडफोड किंवा मारहाण करायची गरज नाही.

स्वतः मध्ये जोपर्यंत देशभावना निर्माण होत नाही तोपर्यंत ती दुसऱ्यापर्यंत पोहोचणार तरी कशी? याचाच अर्थ दुसऱ्याला देशभावना शिकविण्याच्या नादात स्वतःमध्ये असलेली देशभावना नष्ट होण्याचाच संभव अधिक असतो.

२) आपल्या राष्ट्रीय लढ्यास ज्यांच्यामुळे स्फूर्ती मिळाली त्य आदर्शांची जोपासना करणे.

ज्यांनी भारताच्या स्वातंत्र्यलढ्यासाठी बलिदान दिले आहे, ज्यांच्या विचारांमधून स्फूर्ती आणि नवचेतना मिळालेले आहे त्या सर्वांचा आदर करून देशाचे स्वातंत्र्य चिरायू ठेवायचे आहे.

३) भारताची सार्वभौमता, एकता व एकात्मता उन्नत ठेवणे व त्यांचे संरक्षण करणे

यासाठी खरतर सकारात्मक वैचारिक संरक्षणाची गरज आहे. मात्र आज आपण एकात्मता धोक्यात येईल अशा दृष्टी आपली वैचारिक पार्श्वभूमी तयार करीत आहोत. त्यामुळेच त धर्म, जात यांच्या आधारावर समाज विभागला जात आहे. म्हणज माझे हे कर्तव्य पार पाडण्यात आम्ही कमी पडत आहोत कि देशाच्या एकात्मतेलाच तडा देण्याचा गुन्हा करत आहोत या विचार करणे गरजेचे आहे.

४) देशाचे संरक्षण करणे व आवाहन केले जाईल तेव्हा राष्ट्रीय से बजावणे–

सीमेवर राहूनच फक्त देशाचे संरक्षण करायचे अस का? तर नाही कारण विध्वंसक वृत्ती आणि विध्वंसक विच यापासून देशाचे संरक्षण करणे हे नागरिकांचे कर्तव्य आहे.

५) धार्मिक, भाषिक व प्रादेशिक किंवा वर्गीय भेदांच्या पलिक जाऊन भारतातील सर्व जनतेमध्ये सामंजस्य व बंधुभाव वाढी लावणे–

स्त्रियांच्या प्रतिष्ठेला बाधा आणणाऱ्या प्रथांचा त्या करणे हे कर्तव्य आपण कितीजण बजावतो? हा एक प्रश्न आ वरील कर्तव्ये प्रत्येक भारतीय नागरीकांसाठी आहे. त्या अपवाद कोणीही नाही पण भेदाभेद करणारे आणि संविधाना अभिमान सांगणारे बहुतांश नागरीकच या कर्तव्याला हरत फासतात.

खरंतर या कर्तव्यांची पायमल्ली ही लोकशाही पंचवार्षिक निवडणूक उत्सवात ठरलेलीच आहे. या कर्तव्या पालन जोपर्यंत काटेकोरपणे होत नाही तोपर्यंत भारत राज्यघटनेचे उद्दिष्ट साध्य होणार नाही.

६) आपली जी संमिश्र संस्कृती आहे त्याच्या समृध्द वारशाचे मो जाणून तो जतन करणे हा वारसा धार्मिक, ऐतिहासिक कि वैचारिक असू शकतो. त्यातच भारतीय संस्कृती संमिश्र स्वरूपा





असल्याने त्या संस्कृतीचे भान ठेवत त्या वारशाचे मोल जाणून त्याचे जतन नागरीकांनी करावयाचे आहे.

आज मात्र त्या अस्तित्वात असलेल्या वारशाचे जतन होत नसून देश आर्थिक तोट्यात असूनही नवजीवन खर्चिक स्मारके उभारून केवळ देखावे निर्माण केले जात आहेत.

७) नद्या, जंगले, सरोवरे व अन्य जीवसृष्टी यांच्याबरोबर नैसर्गिक पर्यावरणाचे रक्षण करून त्यात सुधारणा करणे आणि प्राणीमात्रांबद्दल दयाबुध्दी बाळगणे हे आपले कर्तव्य आहे.

पण आज पर्यावरणविषयक कायदे सर्रास पायदळी तुडविले जातात. नैसर्गिक पर्यावरणालाच एक आव्हान उभे राहील असे भौगोलिक बदल केले जातात. त्याविरोधात काही सजग नागरिक उभे राहिले तरी त्यांच्यामागे इतर नागरिक उभे राहत नाहीत. पर्यावरणाचे कायदेसुध्दा विशिष्ट वर्गाचा विचार करून फायदा बघून बदलले जातात. प्राणीमात्रांबद्दल दयाबुध्दी बाळगणाऱ्याला अनेकांच्या रोषाला सामोरे जावे लागते.

८) विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन, मानवतावाद आणि शोधकबुध्दी व सुधारणावाद याचा विकास करणे–

मुळात हे आपल्या राज्यघटनेमध्ये आहे. हेच मुळात बऱ्याच जणांच्या पचनी पडणारं नाही. कारण हे अंगिकारायचे म्हणजे स्वतःचा धर्म, जात, पंथ यांच्याशी तडजोड करावी लागणार. पुन्हा घटनेनेच धर्माचा, भाषेचा, विविध परंपरांचा आदर करा असे वरील कलमात सांगितल्यामुळे हे कर्तव्य आणखी कशासाठी? असाही प्रश्न काहीजण विचारू शकतात. परंतु विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन हा तुम्हाला बाळगायचा आहे. तसेच तुम्हाला इतर धर्मांचा आदरदेखील करायचा आहे. मात्र ही कर्तव्ये स्वतः पाळायची आहेत हे महत्त्वाचे आहे.

९) सार्वजनिक मालमत्तेचे रक्षण करणे व हिंसाचाराचा निग्रहपूर्वक त्याग करणे–

हे कर्तव्य प्रत्येक भारतीयाने अंगिकारले तर कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न पूर्णपणे सुटेल.

सार्वजनिक मालमत्ता ही आपली आहे ही भावना स्वतः मध्ये निर्माण होणे गरजेचे आहे. परंतु अशी भावना आताच्या काळात दुर्मिळ होत चालली आहे. आज सार्वजनिक मालमत्ता म्हणजे उद्रेक, हिंसा व्यक्त करण्याचे साधन बनले आहे. लोकशाही च्या मार्गाने विरोध होण्यापेक्षा हिंसेचा पर्याय स्वीकारला जातो व त्याचे भक्ष सार्वजनिक मालमत्तेला केले जाते.

१०) राष्ट्राचा विकास नेहमी चढत्या श्रेणीत जाईल अशा प्रकारे सर्व व्यक्तीगत व समुदायिक कार्यक्षेत्रात पराकाष्ठेचे या संपादन करण्यासाठी झटणे

याचाच अर्थ असा की एक नागरिक म्हणून स्वतःच्या अर्थार्जनाचे काम किंवा सार्वजनिक आयुष्यातील सेवा या राष्ट्राच्या हिताच्या असाव्यात.

११) माता-पिता किंवा पालकाने सहा ते चौदा वर्षे वयोगटा दरम्यानचे आपले अपत्य किंवा पाल्य याला शिक्षणाची संधी देणे. १२ डिसेंबर २००२ रोजी खरेतर हे कर्तव्य घटनेत समाविष्ट करण्यात आले कारण भारतात याच वयोगटातील बहुतेक मुले शिक्षणापासून वंचित राहत होती व याला त्यांचे पालक जबाबदार होते. यावरून देशात शिक्षणाला दिले जाणारे महत्त्व लक्षात येते.

तर अशी ही नागरिकांची मुलभूत कर्तव्ये आहेत. ही कर्तव्ये आपण स्वतः किती पाळतो हे प्रत्येकाने पडताळून पाहणे गरजेचे आहे. ही कर्तव्ये आपण पाळली तर आपोआपच घटनेंतर्गत असलेले कायदेही पाळले जातात.

स्वातंत्र्य हे आपल्याला सहजासहजी मिळालेले नाही. त्यासाठी खूप मोठी किंमत मोजावी लागली आहे. पण आजच्या पिढीला फुकटात मिळालेल्या गोष्टीची किंमत न ठेवण्याची सवय नाही. हे स्वातंत्र्य अबाधित राहण्यासाठी या मुलभूत कर्तव्यांचे स्वयंप्रेरणेने व काटेकोरपणे प्रत्येक नागरिकाने पालन करायलाच हवे. तरंच आपल्याला भारत माझा देश आहे हे म्हणायला अधिकार असेल.

## ❊ चारोळ्या ❊

कु. रेणुका सुजित कोरे ,११वी, विज्ञान.

आपल्याला काही हवं असणं म्हणजे आपलं जगणं आहे.
येणाऱ्या प्रत्येक क्षणाकडे आपलं काही मागणं आहे.

पोटात भूक भाकरीची ओठावर पाण्याची तहान.
तरीही लोक बोंबलतायत मेरा भारत महान

कायम स्वप्न पहावीत त्यात हवं ते बघता येतं,
जागेपणी जमलं नाही तरी, किमान झोपेत हवं तसं जगता येतं.

शृंगार तुझा झाकून ठेव मला त्याची हौस नाही
दुःखावर सुध्दा प्रेम करता येतं बहुतेक यावर तुझा विश्वास नाही

बँकेच्या चेकच्या पाठीमागे लिहिलेली कविता मस्त होती
चेकच्या आकड्यापेक्षा माझ्यासाठी कवितेची किंमत जास्त होती

न वाचता फाडलेल्या पत्रांचे तुकडे कधीही जोडून बघ
सापडलेच नाही कुठे तर माझ्या कवितेत मला शोधून बघ

# व्यसनाधिनतेच्या विळख्यात अडकलेला तरूण

कु. साक्षी संदीप तापकीर, ११ वी शास्त्र

कधीतरी असेही जगून बघा...

संकटांच्या विळख्यात अडकलेले खूप जण असतात पण त्या संकटांवर मात करून जीवनाचा आनंद घ्यायला शिका खरंच या उक्तीप्रमाणे आजचा तरूण वागतो का? पूर्वी म्हणजे अगदी आपले आजी आजोबा आपल्याला सांगतात की सकाळी सूर्य डोक्यावर आला की, आम्ही आमच्या कामाला सुरूवात करायचो, आजचा तरूणही म्हणतो की, मी देखील सूर्य डोक्यावर आला की उठतो पण तोच तरूण म्हणतो की फक्त माझे घर हे पश्चिम दिशेला आहे! अशी तर ही आजची तरूण पिढी खरं पाहता आजची तरूण पिढी ही अभ्यासाच्या नादी लागयचं सोडून ते त्या छोट्याश्या डबड्याच्या (मोबाईल) नादी लागली आहे. जेव्हा बघाव तेव्हा बसलेली असतात ती मोबाईल घेऊन मग हे एक प्रकारचे व्यसनच नाही का?

आपल्या आजी आजोबांना दररोज किमान चार कप तरी चहा लागतो मग म्हणता येईल की त्यांना चहाचे व्यसन आहे पण ही आजची तरूण पिढी तर भलतीच की ज्यांना मोबाईलचे व्यसन लागले आहे. आपल्याला निसर्गाने काही बंधने घालून दिली आहेत पण आजची ही पिढी ते नियम तोडून स्वतःचे नवीन नियम तयार करत आहे. आजची तरूण पिढी ही सतत त्या व्हाटस्अप आणि फेसबुकच्या नादाला लागली आहेत. त्यांना त्या व्हाटस्अप वर रोज नवीन स्टेटस टाकायला वेळ असतो. पण अभ्यास करायला मात्र त्यांच्याकडे वेळ नसतो. आपण केला तर आपण त्या मोबाईलचा चांगला देखील उपयोग करून घेऊ शकतो पण सततचं त्याच्यात गुरफटून राहतो. हा मग एक प्रकारचा व्यसनाचाच प्रकार म्हणता येईल!

आपणा सर्वांनाच माहित आहे की,

"Everyone tries to find right person But, they do not try to be a right person"

खरंच हे वाक्य आपल्याला किती प्रेरणा देते. त्याचप्रमाणे तरुण पिढीची सवय देखील यातून समजून येते. आजच्या या तरुण पिढीत एखाद्या गोष्टीला आत्मसात करण्याचे बळ खूप आहे. पण त्याला मात्र एक गोष्ट थांबा देते. ती गोष्ट म्हणजे आजचा तरूण पिढीमध्ये असलेला आळस. 'आलस्यानाम् मनुष्यस्य रिपू वर्तते'। हे संस्कृतमधील वाक्य आपल्याला सूचित करते की, माणसाने आळस मागे सारून प्रयत्नांना वाव दिला पाहिजे आजची तरूण पिढी ही त्या मोबाईलच्या जगात गेली आहे त्यामुळे आजच्या या तरुण पिढीमधला खर संवादच हरवला आहे. कॉलेजमध्ये तर मुले अभ्यासदेखील त्या मोबाईलवरच करू लागली आहेत तरूण पिढी ही उठताना, बसताना सतत त्याला सोबत ठेवतात हे एक प्रकारचे व्यसन आणि त्या व्यसनात ही तरूण पिढी अडकलेली पहायला मिळते.

आणखी एका प्रकारचे व्यसन मुलांना महाविद्यालयात प्रवेश घेतल्यानंतर लागते. यात मुलांचा काहीच दोष नसतो तर दोष असतो तो म्हणजे त्यांच्या सोबत असलेल्या मित्रांचा कॉलेजमध्ये प्रवेश घेतल्यानंतर मुलांची मानसिकता बदलायला सुरूवात होते. मुलांना आई वडीलांपेक्षा त्यांचे मित्र मंडळी हे अधिक जवळचे वाटतात. परंतु याचा परिणाम हा त्यांच्या अभ्यासावर नकळतपणे होत असतो. म्हणून परीक्षेत गुण कमी मिळतात हे गुण आई वडिलांना कळाले तर काय होईल? याच्या भितीने ते दारू, सिगारेट इ. गोष्टींचे सेवन करतात हे देखील आजच्या तरूण पिढीला जखडणारे एक महाभयंकर व्यसन आहे.

आपणा सर्वांनाच माहीत आहे की, आजचे युग हे स्पर्धेचे युग आहे. या स्पर्धेच्या युगात आपल्यावर आलेल्या संकटांवर मात करून जो पुढे जातो. तोच आपल्या जीवनात यशस्वी होतो. पण हे सगळं करणं काही सगळ्यांनाच जमत नसतं म्हणून तरूण हे अपमार्गाला आणि व्यसनाच्या आहारी जातात. म्हणूनच जर आमची तरूण पिढी ही जर योग्य मार्गाला लागली तरच आपल्या या भारत देशाचा विकास होईल आपल्या भारताला किती दिवस विकसनशील ठेवणार तर आमच्या पिढीने या भारताला विकसित बनवण्याचा निर्धार केला पाहिजे म्हणूनच असे म्हणतात की,

ज्याप्रमाणे भाषेला व्याकरणाचा, गणिताला सुत्रांची हवा असतो आधार त्याचप्रमाणे या भारताला विकसित करण्यासाठी लागतो तरूण पिढीचा आधार! अशाप्रकारे तरुणांनी प्रत्येक गोष्टीचा विचार करून योग्य पाऊल उचलले पाहिजे.





# व्यथा दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांची

कु. संध्या तानाजी इंगवले, ११ वी कॉमर्स

पोटापुरता पसा पाहिजे नको पिकाया पोळी
देणाऱ्याचे हात हजारो दुबळी माझी झोळी

शेतकरी हा भूमातेचा पुत्र आहे. जमीन ही त्याची माता आहे.

आपला शेतकरी बांधव रात्रंदिवस शेतात राबतो म्हणून 'मेरे देश की धरती सोना उगले उगले हिरेमाती मेरे देश की धरती...' या सारख्या ओळी आपल्या ओठावर सहज येतात. शेतकरी सुखी तर देशी सुखी. जिथे राबती हाथ तेथे हरी। अशी शेतीच्या महतीची वचने आपण नेहमी ऐकतो. वाचतो आणि कौतुकाने लिहितो. परंतु शाळेतील परीक्षामधील गुणवंताच्या तोंडून मी डॉक्टर होणार, मी इंजिनिअर होणार अशी महत्त्वांकाक्षा बाहेर पडते. पण यापैकी कोणीच मी एक आदर्श शेतकरी होणार आणि मी माझे जीवन शेतकामावर झोकून देणार असे कोणीच म्हणत नाही. शेतकरी म्हणजे दुय्यम समाज असा दृष्टिकोन आजच्या या नव्या पिढीला झाला आहे.

जय किसान असे आपण शेतकऱ्यांना गौरवितो. परंतु त्या शेतकऱ्याच्या जीवनाचा त्याच्या अडचणींचा आपण कधीच विचार करत नाही. आपल्या या मातृभूमीसाठी, देशासाठी, अन्नधान्य पिकवणारा, सुजलाम सुफलाम धरती बनवणारा हा शेतकरी स्वतःच्या पोटाची खळगी भरण्यासाठी रात्रंदिवस शेतात राबतो. पण दोन वेळचे पोटभर जेवणही नीट त्याला मिळत नाही यामुळे त्याच्या एकूण उत्पन्नाच्या दहा टक्के उत्पन्नही त्याला मिळत नाही.

शेतमालाला मिळेल तो दर, सरकारचे वेगळे कर, कायदे, यातून त्याला थोडेच उत्पन्न मिळते पण या सर्व शेतकऱ्याच्या उत्पन्नाच्या नफ्याला चटावलेला सर्व नियम कायदे कानून खिशात घेऊन फिरणारा आणि पैशाने लालची असलेला व्यापारी या गरीब शेतकऱ्याला पिळत असतो. जागत असतो.

अंगमेहनत करूनही शेतकऱ्याच्या कष्टाला मोल राहत नाही, लालची व्यापारी मात्र कष्ट न करता पैसे लुबाडत असतो. माल कमी किंमतीत खरेदी करून आपल्या शेतकरी बांधवाला नाराज करतात. त्यामुळे त्याच्या कष्टाला किंमत राहत नाही.

शेतकरी शेतात राब राब राबतो पण कधी कधी निसर्ग त्याला साथ देत नाही. पाऊस न पडल्यामुळे तो नाराज होतो. शेतीमध्ये कर्ज घेऊन पेरलेलं बी पाऊस न पडल्या कारणाने उगवत नाही. यामुळे शेतकऱ्याच्या डोक्यावर कर्जाचा डोंगर उभा राहतो. यातून निराश होऊन आत्महत्येच्या मार्गाकडे तो वळतो. तसेच जरी पाऊस चांगला पडला, पीक हातात आले तरी शेतमालाला भाव मिळत नाही.

आपल्या शेतकरी बांधवाने जर शेतात धान्य पिकवले नाही. तर आपण काय खाणार? त्याच्या या कष्टाला आणि मेहनतीला म्हणजेच शेतमालाला योग्य तो भाव मिळत नाही. यासारख्या अनेक नैसर्गिक आपत्तींना सामोरे जावे लागते. कधी दुष्काळ तर कधी वादळ यामुळेच तर तो आत्महत्येचा मार्ग अवलंबतो.

उसवलं गणगोत सारं आधार कुणाचा नाही.
भेगाळल्या भुईपरी जिनं अंगार जीवा जाळी.
करपलं रान देवा जळलं शिवार,
तरी न्हाई धीर सोडला, खेळ मांडला....

## आयुष्य

चांदणं तेच असलं तरी
रात्र अगदी नवीन आहे....
आयुष्य मात्र एकदाच का ?
हा प्रश्न जरा कठीण आहे.

कु. ऐश्वर्या तांबे
(१२ वी सायन्स)

# निसर्ग माझा मित्र

कु. पायल नंदकुमार लोणकर, १२ वी शास्त्र

पहिल्यांदा विषय वाचल्यावर थोडसं वेगळच हसू आलं कारण अगदी पाचवी सहावीत असल्यापासूनच हा विषय असायचा. मग आता बारावीत आले तरीही निसर्ग माझा मित्र हा विषय दिसला. पण नंतर थोडा अंर्तमुख होऊन विचार केला आणि मनाला निसर्गानं वेढून टाकलं आणि पेन उचलला.

भौतिकशास्त्राच्या तासाला सरांनी या विश्वाच्या निर्मितीबद्दल अनेकवेळा चर्चा केली. निसर्गाच्या उदयापासून ते भविष्यात होणाऱ्या ऱ्हासापर्यंत सगळं शिकवलं. तर रसायनशास्त्रांच्या सरांनी निसर्गात होणाऱ्या रासायनिक क्रिया शिकवल्या. मराठीचे सर या निसर्गाचं अप्रतिम वर्णन करतात. हे सगळं मी आठवलं पण तरी हवा तसा दिलासा मिळत नव्हता. मग मी अंगणात आले. आणि वर आकाशात पाहिलं मला निसर्गाचा अनुभव आला. आकाश काळेकुट्ट होते, पण त्यात लुकलुकणाऱ्या त्या चिमुकल्या चांदण्या माझं मन मोहून घेत होत्या. माझी आई जी माझी सर्वांत खास मैत्रिण आहे तीने माझ्याकडे प्रेमाने पाहिल्यावर तिच्या डोळ्यातली ती चमक, मला त्या चांदण्यामध्ये दिसत होती. शांत अन् शितल असा चंद्रमा आकाशातल्या त्या चांदण्याचे नेतृत्वच करत होता जणू, जशी माझी आई शांतपणे सगळं सांभाळते. मग हे दृश्य पाहिल्यावर माझ्या मनातून एक आवाज आला, निसर्ग माझा मित्र!

झाडे, फुले, फळे, वेली हे तर निसर्गाचा अविभाज्य असा भाग आहे. पण आजपर्यंत कधी त्यांच्याकडे मित्र म्हणून पाहिलंच नव्हतं. रस्त्याने जाताना थकल्यावर झाडाखाली बसले. ज्याला कधी पाणी घातलं नव्हतं की खत दिलं नव्हतं पण त्याची सावली अगदी उबदार वाटली. एक निस्वार्थी मित्र भेटला. सध्या थंडीचे दिवस आहेत. सगळ्यांना कुडकुडी भरवणारे! पण ही पण निसर्गाची लिलाच आहे. कृष्णाने बासरी वाजवल्यावर जसा अंगावर शहारा यावा तसा हा गार वारा अंगावर शहारे आणतो. शेतात येणाऱ्या छोट्या छोट्या पानांना दिलासा भेटतो. दिवसभर सूर्यदेवाची किरणे सहन करण्यासाठी या गारव्यातून जणू निसर्ग त्यांना बळ देतो आणि हेच शेतातलं धान्य निसर्गाची देणगी मला काम करायला दिवसभर ताकद देते. म्हणजे माझा मित्र मला भक्कम बनवतो.

काळी आई ! रोज तिच्यावर चालतो, बसतो, झोपतो आणि जगतो सुद्धा. जेव्हा ही माती मी कपाळावर लावते ना तेव्हा माझी आई सोबत असल्यासारखं वाटतं. सकाळी सूर्यदेवताचं दर्शन घेऊन त्यांची कोवळी किरणे फार आल्हाददायक वाढतात. अगदी बाबांनी माथ्यावरून हात फिरवल्यासारखी पण दुपार झाल्यावर मात्र सूर्यदेव तळपतात पण हे नसते तर झाडे-फुले वाढलीस नसती. समुद्राला येणारी भरती-ओहोटी, ढगांमधून पडणारा पाऊस, वारूळात शिरणाऱ्या मुंग्या, पाण्यात पोहोणारे मासे, डोंगर, नद्या बापरे! सगळं किती विलक्षण आहे. म्हणजे दूरवर असलेल्या ग्रह ताऱ्यांपर्यंत प्रत्येक गोष्ट मला काहीतरी शिकवून जाते. मी असण्याला फक्त हा निसर्गच कारणीभूत आहे.

माझ्या जन्मापासून ते मृत्यूपर्यंत माझी प्रत्येक गोष्ट या निसर्गाचीच देणगी आहे. एखाद्या जीवाभावाच्या मित्राने आयुष्यभर साथ द्यावी तसाच हा निसर्ग माझी साथ देतो. खरचं हा निसर्ग माझा मित्र आहे. पण मी माझी बाजू कितपत पार पाडली? निसर्गाला मी काय दिलयं?

देणाऱ्याने देत जावे, घेणाऱ्याने घेत जावे,
घेता घेता एक दिवस, देणाऱ्याचे हातच घ्यावेत?

असचं केलय मी. निसर्गाकडून सगळं घेतलं पण मी त्याला काय दिलं तर दारात चार - दोन झाडं लावली पण दुसरीकडे दहा झाड तोडली. स्वतःच्या स्वार्थासाठी काळ्या आईचा कसाही वापर केला, ज्ञान विज्ञानाच्या जोरावर निसर्गावर मात करायचा प्रयत्न केला. पण हे मित्र-मैत्री असं कधीच नसते. म्हणजे एकाने भरभरून द्यायचं आणि दुसऱ्याने फक्त ओरडायचं पण आता असं नाही होणार माझ्या विचारांना आणि आचरणाला आता मी वेगळा आकार देणार. या माझ्या मित्राला जपणार. माझी मैत्री निभावणार! कारण मनापासून निसर्ग माझा मित्र आहे आणि कायम राहणार...

अहिंसा व सत्य ही अविभाज्य आहेत आणि एकातच दुसरे गृहीत धरले आहे.







# आयुष्याचा सांगाती

श्री. अशोक देवकर (शारीरिक शिक्षण निदेशक)

आयुष्याच्या प्रत्येक वाटेवर आपल्याला अनेकांचा सहवास लाभत असतो त्यामध्ये आई, वडील, पत्नी, मुलगा, मुलगी, भाऊ, बहीण, मित्र परंतु यापैकी तुमचा आयुष्यभराचा जोडीदार जर कोण असेल तर ते तुमचं शरीर. तुमचं शरीर हे तुमच्या जन्मापासून ते मृत्यूपर्यंत तुमच्या बरोबर असते. या शरीराने जर तुमची साथ सोडली तर तुमचं अस्तित्व देखील संपून जाते. म्हणूनच आपल्याला आयुष्यातील या महत्त्वाच्या सांगतीची आपण जेवढी काळजी घ्याल तेवढे कमीच आहे. आपणाला जर सतत आनंदी, सुदृढ, निरोगी आयुष्य जगायचे असेल तर त्यासाठी थोडा वेळ या आपल्या सारथी असलेल्या शरीरासाठी दिल्यास नक्कीच त्याचा लाभ मिळेल.

आजच्या धकाधकीच्या जीवनशैलीत आपण पैसा या घटकाला अनन्यसाधारण असे महत्त्व देतो याच पैशासाठी आपण रात्रंदिवस कामाच्या व्यापात अडकून राहातो. आपण आपल्या आहाराकडे दुर्लक्ष करतो, अवेळी जेवण, कमीत कमी आराम, शारीरिक कष्ट कमी, बैठ्या स्वरूपाचे काम तसेच बदलत्या जीवनशैलीचा स्वीकार करणे, इत्यादी, परंतु आपण सर्वजण या पैसा म्हणजे सुख या संकल्पनेत अडकून पडतो. खरे सुख जर काय असेल तर ते म्हणजे तुमच्या आयुष्याचा सांगाती म्हणजे तुमचे शरीर निरोगी असणे होय.

शरीर निरोगी ठेवण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावे लागतात. त्यासाठी आपल्या रोजच्या दैनंदिन कार्यक्रमातून किमान एक तास वेळ हा शरीरासाठी दिला पाहिजे. हा एक तासाचा दिलेला वेळ शारीरिक सुदृढता विकसित करण्यासाठी किंवा त्यामध्ये सातत्य टिकवण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करणे गरजेचे आहे. यामध्ये रनिंग करणे, जॉगिंग करणे, चालणे, ऍरोबिक्स एक्झरसाइज, योगा प्राणायाम, सूर्यनमस्कार, जिम ट्रेनर च्या मार्गदर्शनानुसार व्यायाम प्रकार करणे व यामध्ये सातत्य ठेवणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

शारीरिक श्रम केल्यावर त्यासाठी लागणारा आहार देखील तितकाच महत्त्वाचा भाग आहे. शरीर निरोगी ठेवण्यासाठी व्यायाम व आहार हे दोन्ही घटक तितकेच महत्त्वाचे आहेत. निरोगी शरीर ही तुमची खऱ्या अर्थाने सर्वात मोठी श्रीमंती आहे. तुमच्याकडे पैसे आहेत परंतु निरोगी शरीर नसेल तर तुम्हाला त्या संपत्तीचा, सुखाचा उपभोग देखील घेता येऊ शकत नाही.

लक्षात ठेवा तुमचे शरीर हाच तुमचा कायमचा पत्ता असतो कारण तुम्ही व तुमचे शरीर हेच खरे आयुष्याचे सांगाती असतात. तुम्ही जिथे असतात तिथे तुमची शरीर असते आणि शरीर जिथे असते तिथे तुम्ही असता, म्हणूनच शरीराची काळजी घ्या, सदैव तंदुरूस्त राहा, आनंदी जीवन जगा, लक्षात ठेवा तुमच्या शरीराला तुमच्या शिवाय कोणीही नातेवाईक किंवा मित्र मदत करू शकत नाहीत.

ध्यान करावे : मन:शांतीसाठी
सूर्यनमस्कार करावे : शरीर लवचिकतेसाठी
प्राणायाम करावे : फुफ्फुसांसाठी / हृदयासाठी
योगासने करावीत : शरीर सुदृढतेसाठी

मी महात्मा म्हटला गेलो म्हणून माझे वचन प्रमाण आहे असे समजून कोणीच चालू नये. महात्मा कोण हे आपल्याला माहित नाही म्हणून चांगला मार्ग हा की महात्म्यांचे वचन देखील बुध्दीच्या कसोटीवर घासून घ्यावे आणि ते कसास न उतरल्यास त्याचा त्याग करावा.

# अनोखी भेट

भेट झाली कधी तर
ओळख मला दाखवशील का?
गाली पुन्हा ती खळी खुलेल का?
आठवणीच्या स्वप्नामध्ये
पुन्हा मज नेशील का?
भेट झाली कधी तर ओळख मला दाखवशील का?
मी नव्हे कुणी ऐरागैरा सदैव तुझी काळजी घेणारा
साथ मला देशील का?
जरी सोडून दिले अर्ध्यावरती
तरी आठवण माझी काढशील का?
भेट चुकून झाली कधी तर
ओळख मला दाखवशील का?

श्री. गणेश सोमनाथ नेवसे , ११वी, विज्ञान

# एक कळी उमलण्याआधी

आई ! नकोस ना मारूस, खरंच जगायचंय गं मला
लेक म्हणून तुझ्याच गं, तुझ्याच पोटी यायचंच मला
दादा सारखंच तुझ्या प्रेमात चिंब भिजायचंय मला
तुझ्या आणि बाबांच्या कौतुकात नहायचंय मला
आदर्श बहिण, आदर्श पत्नी, आदर्श माता व्हायचंय मला
या जगात येऊन सारे सुंदर अनुभव घ्यायचेत मला
जानकी, द्रोपदी, आहिल्या, तारा, मंदोदरी याचा वारसा जपायचाय मला
मदर तेरेसा, इंदिरा गांधी, कल्पना चावला यांच्या वाटेने जायचंय मला
नको ना आई! गर्भातच असे संपविण्याचा प्रयत्न करू मला
फार फार यातना होत आहेत गं मला, कसं सांगू मी तुला?
नको करूस निसर्गाविरूद्ध जाऊन निष्ठूर कृत्य असं संपविण्याचं मला
एक कळी उमलण्याआधीच चिरडण्याचा काय अधिकार आहे तुला
मला जन्म देऊन तर पहा, मीच होईन आधार तुम्हांला
माझ्या कर्तृत्वाने माता झाल्याचा, सार्थ अभिमान वाटेल बघ तुला

सं. - कु. शिवानी राजेंद्र ढवळे, ११वी विज्ञान

सत्यापेक्षा श्रेष्ठ असा परमेश्वर नाही. सत्य हीच प्रथम संपादण्यासारखी गोष्ट आहे.





## ❊ शब्द ❊

बोलताना जरा संभाळून
शब्दाला तलवारी पेक्षा धार असते
फरक फक्त एवढाच की
तलवारीने मान तर शब्दांनी मन कापले जाते
जरी तलवारीच्या जखमेतून रक्त आणि
शब्दांच्या जखमेतून अश्रु येत असेल तरी
दोघांपासून होणाऱ्या वेदना मात्र
सारख्याच असतात म्हणून म्हणते
शब्द जरा सांभाळून
शब्दाला तलवारीपेक्षा धार असते ।।

शब्दच माणसाला जोडतात
अन् शब्दच माणसाला तोडतात.
हे शब्द आहेत, ते कधी रामायण
तर कधी महाभारत रचतात
तर तुझ्या एका शब्दावर
माझे रडणे अवलंबून असते म्हणून म्हणते
शब्द जरा सांभाळून
शब्दाला तलवारी पेक्षा धार असते. ।।

कु. अमृता सुरज खरात, १२वी, कला

## ❊ भ्रूण व्यथा ❊

सांग ना आई, बोल ना, अशी निष्ठूर का झाली?
गर्भातच माझी अशी तू का भ्रूण हत्या केली?

तुझाच धरून पदर मज चालायचे होते
अ, आ, इ गिरवीत गं, आई बोलायचे होते

फुल होऊन जगात मज फुलायचे होते
कुशीमध्ये आई तुझ्या थोडे खेळायचे होते

उदरात आई तुझ्या मी स्वप्न पाहिले होते
दुःखात आसवे तुझी मी गं पुसणार होते

सांग ना आई बोलना मी होते तुझीच बाळ
का मारलेस मला तू? का गं कापलीस नाळ

कु. अमृता सुरज खरात, १२वी, कला

# आयुष्य

आयुष्यभर सोबत असून जवळ काही बसत नाही
एकाच घरात राहून आम्ही एकमेकांत दिसत नाही

हरवला तो आपसातला जिव्हाळ्याचा संवाद
एकमेकांस दोष देवून नित्य चाले वादविवाद

धाव धाव धावतो आहे दिशा मात्र कळत नाही
हृदयाचे पाऊल कधी हृदयाकडे वळत नाही

इतके जगून झालं पण जगायलाच वेळ नाही
जगतो आहोत कशासाठी काहीच कसला मेळ नाही

क्षण एक येईल असा घेऊन जाईल हा प्रवास
अर्ध्यावर थांबलेला असेल जीवनप्रवास

अजूनही वेळ आहे थोडं तरी जगून घ्या
सुंदर अशा जगण्याला डोळेभरून बघून घ्या.

कु. दिपाली मदने, १२वी, कला

शांततामय, निश्चयाधिष्ठित आणि आस्तिक अशा लोकांच्या आक्रमणास जागतिक कोणतीही शक्ती रोखू शकत नाही.

## ❊ जीवन आहे तरी काय ❊

जीवन एक खेळ आहे - तो खेळा
जीवन एक उत्साह आहे - तो प्राप्त करा
जीवन एक संघर्ष आहे - तो लढवा
जीवन एक रंगमंच आहे - तो सजवा
जीवन एक देणगी आहे - ती स्वीकारा
जीवन एक कला आहे - ती हस्तगत करा
जीवन एक संधी आहे - ती मिळवा
जीवन एक प्रिती आहे - तिचा आस्वाद घ्या
जीवन एक यात्रा आहे - ती पूर्ण करा
जीवन एक आव्हान आहे -त्याला सामोरे जा
जीवन एक दुःख आहे - त्यावर विजय मिळवा
जीवन एक कर्तव्य आहे - ते पार पाडा
जीवन एक गीत आहे - ते गात रहा
जीवन एक रहस्य आहे - ते उलगडत रहा
जीवन एक ध्येय आहे - ते साध्य करायला शिका

**कु. अमृता सुरज खरात, १२वी, कला**

## ❊ शोध ❊

क्षण सुखाचा क्षण दुःखाचा
सुखदुःखाची ही जोडी फिरते घरोघरी

सुखाचा जरी सहवास प्यारा
दुःखाचाही अंदाज मग न्यारा

सुखासुखी न मिळतेते सुख
अन् आपणहून येते ते दुःख

सुखाच्या क्षणी हसतो
अन् दुःखाच्या क्षणी रडतो

का बर, दुःखालाही मग दुःख देतो आपण
न कळे अर्थ या दुःखाचा

कोण भला अन् कोण चांगला
शोधू या आपणच त्याला

**श्री. गणेश सोमनाथ नेवसे , ११वी, विज्ञा**

## ❊ शाळा माझी आई ❊

शाळा, शाळा म्हणजे घर
घरातून वाहतो ज्ञानाचा सर
जसं आई मुलं जेवले नाही वेळेवर
ती रागवते त्याच्यावर
तसचं शिक्षक त्याने अभ्यास केला नाही वेळेवर
ते रागवतात त्याच्यावर
कारण ती जबाबदारी त्यांच्यावर
म्हणून मला वाटतं शाळा....

असं आईला वाटतं, मुलाने अभ्यास चांगला करावा
नि शाळेचं नाव उज्वल करावं
तसचं शिक्षकांना वाटतं चांगला अभ्यास करावा त्याने
नि शाळेचे नाव कमवाव
म्हणून मला वाटतं शाळा...

जसं पालक म्हणतात हा मुलगा माझा
तसचं शिक्षक म्हणतात हा विद्यार्थी माझा
मग या सर्व ओळींमध्ये फरक काय ?
तुम्हीच मला सांगा ?
म्हणूनच मला वाटतं, शाळा...

जसं आईला सर्व मुलं समान
तसचं शिक्षकांना सर्व विद्यार्थी समान
म्हणून मला वाटतं, शाळा...

**कु. निलोफर नजीर सय्यद, ११ वी, विज्ञान**

जगातील सर्व शस्त्र संभारापेक्षा ही अहिंसा जास्त बलसंपन्न आहे.





## जिमखाना विभाग - कनिष्ठ महाविद्यालय

### शालेय विभागस्तर स्पर्धेसाठी निवड झालेले महाविद्यालयाचे खेळाडू


अनोज माने
११ वी वाणिज्य(शुटींग)


प्रज्योत चव्हाण
११ वी विज्ञान(नेटबॉल)


अवधूत शिंदे
११ वी विज्ञान(जलतरण)


प्रेरणा गरूड
११ वी विज्ञान(सॉफ्टबॉल)

### पुणे विभागस्तर स्पर्धेसाठी निवड झालेले महाविद्यालयाचे खेळाडू


श्रावणी तावरे
११ वी विज्ञान(कराटे)


श्रुती राऊत
१२ वी विज्ञान(कराटे)


ऐश्वर्या लोखंडे
१२ वी विज्ञान(तायक्कॉंदो)


दिपाली मदने३
१२ वी कला(तायक्कॉंदो)

### शालेय राज्यस्तर स्पर्धेसाठी निवड झालेले महाविद्यालयाचे खेळाडू


साक्षी शिंदे
११ वी विज्ञान(सॉफ्टबॉल)


प्रियांका निंबाळकर
११ वी वाणिज्य(सॉफ्टबॉल)


सिध्देश दाभाडे
११ वी कला(कबड्डी)


अंशुमन गायकवाड
१२ वी कला(कबड्डी)


अभिजीत सावंत
१२ वी विज्ञान(तलवारबाजी)


रोहन जाधव
११ वी वाणिज्य(तलवारबाजी)


भाग्यश्री कदम
१२ वी विज्ञान(तलवारबाजी)


स्वाती सुरवसे
१२ वी विज्ञान(तलवारबाजी)


ऐश्वर्या निंबाळकर
१२ वी विज्ञान(तलवारबाजी)

## ॥ अनेकान्त आविष्कार २०१८ ॥



'अनेकान्त आविष्कार उद्‌घाटन समारंभ'
मा.प्रा.डॉ.चंद्रशेखर मुरुमकर यांच्या हस्ते



चित्र प्रदर्शन पाहताना- मा.प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमक



मॅजिक बॉक्स



चित्रकार - जितेंद्र काकडे ११ वी सायन्स



सामान्य विभाग-प्रोजेक्ट पाहताना



कॉमर्स शाखा- वेब तयार केली तो प्रसंग



Q.R. कोड- प्रात्यक्षिक पाहताना



ऑटो इलेक्ट्रीक सायकल

# हिंदी विभाग



BHAGAT SINGH

वो आदमी नहीं है मुकम्मल बयान है ।
माथे पे उस के चोट का गहरा निशान है ।
वे कर रहे हैं इश्क पे संजीदा गुफ्तुगू ।
मैं क्या बताऊँ मेरा कहीं और ध्यान है ।
सामान कुछ नहीं है फटे-हाल है मगर ।
झोले में उस के पास कोई संविधान है ।
उस सर- फिरे को यूँ नहीं बदला सकेंगे आप ।
वो आदमी नया है मगर सावधान है ।
फिसले जो उस जगह तो लुढकते चले गए ।
हम को पता हनीं था कि इतना ढलान है ।
देखे हैं हम ने दौर कई अब खबर नहीं ।
पाँव तले जमीन है या आसमान है ।
वो आदमी मिला था मुझे उस की बात से ।
ऐसा लगा कि वो भी बहुत बे-जबान है ।

- दुष्यंत कुमार

**अनेकान्त**
कनिष्ठ महाविद्यालय
सन २०१८ - २०१९

विभागीय संपादक
श्री. किशोर भोसले

# अंतरंग....

## गद्य विभाग


| | |
|---|---|
| महात्मा कबीर का जीवन परिचय | कु. स्वरांजली धनंजय भागणे, ११ वी विज्ञान |
| कोशिश | कु. प्राजक्ता कमलाकर वाघ, १२ वी विज्ञान |
| मोबाईल फोन | कु. फरीन राजु तांबोळी, ११ वी विज्ञान |
| मनुष्य जीवन के कडवे सच | कु. वैष्णवी अनिल शिंदे, ११ वी विज्ञान |
| भाषा और साहित्य | कु. विजया अजय महाडिक, ११ वी विज्ञान |
| वृध्दाश्रम एक सामाजिक समस्या | अनामिक |
| महात्मा गांधी | कु. केतकी किरण काशीद, ११ वी विज्ञान |


## पद्य विभाग


| | |
|---|---|
| टी. सी. कॉलेज हमारा | कु. वैभवी दराडे, ११ वी विज्ञान |
| जिंदगी के रास्ते | कु. केतकी काशिद, ११ वी विज्ञान |
| दोस्ती | कु. नेहल दोशी, १२ वी विज्ञान |
| इजाजत | कु. स्वागता दोशी, १२ वी विज्ञान |
| रूके न तु | कु. रेणुका कोरे, ११ वी विज्ञान |
| याद | फरदिन डांगे, ११ वी विज्ञान |
| भले चाहे | प्रसाद कोकीळ, १२ वी विज्ञान |
| वीरों को सलाम | नितिन खोमणे, संरक्षणशास्त्र विभाग |






# 'टी. सी. कॉलेज हमारा'

सारे महाविद्यालयों से प्यारा, टी. सी. कॉलेज हमारा।
हम सब की आँखों का तारा, टी. सी. कॉलेज हमारा।

शिक्षा उसमें पाते है हम,
अपना ज्ञान पाते है हम,
छात्रों का है यही सहारा,
टी. सी. कॉलेज हमारा।

कला, विज्ञान, वाणिज्य शाखा
प्रितीमय संगम, अती न्यारा,
मराठी, हिंदी, अंग्रेजी भाषाओं की बहुत धारा
टी. सी. कॉलेज हमारा।

ज्ञानी अध्यापकों का हमें सहारा,
टी. सी. कॉलेज हमारा।
जीवन की सही दिशा देनेवाला



# महात्मा कबीर का जीवन परिचय

कु. स्वरांजली धनंजय भागणे ११वी विज्ञा

भारतीय समाज जीवन को अपनी क्रांतिकारी चेतना से प्रभावित करने वाले महामानवों में महात्मा कबीर का नाम सबसे ऊपर आता है। महात्मा कबीर ने अपने-अपने समय की समस्त विकृतियों तथा विषयमताओं को न केवल पहचाना बल्कि उन्हें समाज मानस से दूर करने का व्यापक प्रयत्न किया। सामान्य आदमी हमेशा से ही व्यवस्था कें द्वारा दमित एवं शोषित होता रहा है। इस सामान्य आदमी में दमन एवं शोषण के विरूद्ध आवाज उठाने की न ही क्षमता होती है, और न समझ। ऐसे समय पर सामान्य आदमी का हितैषी बनकर कोई चिंतक सामने आता है जो अपने कार्य-कर्तृत्व के द्वारा इस सामान्य आदमी की आवाज को स्वर देने का प्रयास करता है।

महात्मा कबीर ने अपने समय के दबे कुचले सामान्य आदमी की पीडा, व्यथा, वेदना तथा निर्मम शोषण के दुष्ट चक्र को न केवलं समझा बल्कि इससे सामान्य आदमी को मुक्त करने के लिए व्यापक कार्य किया। महापुरूषों को समय की संतान कहा जाता है। कुरूपताओं से ग्रसित समाज में ही समाज का उत्कर्ष करने वाले महापुरूों का जन्म होता है। भारत की भूमि में अनेक धर्मचिंतकों का जन्म हुआ। अपनी प्रखर चेतना से उन्होंने मानव को उच्च विचार भूमि पर प्रतिष्ठित किया।

समग्र हिन्दी साहित्य में संत कबीर का व्यक्तित्व इतना क्रांतिकारी, तेजस्वी तथा ओजपूर्ण है कि जो भी इसे देखता है उसकी आँखे चकाचौंध हो जाती है। उनका समग्र जीवन लोग कल्याणार्थ तथा लोक संस्कार के लिए समर्पित था। अपने समय के सामाजिक विषमताओं पर खुलकर प्रहार करनेवाले कबीर का संकल्प समतामूलक समाज की निर्मिति करना था। किंतु साधना तो उनके लिए केवल साधन थी, जिसके माध्यम से वे समाज में प्रचलित गैरबराबरी तथा असमानता के तत्त्व को उखाड कर फैंकना चाहते थे। कबीर की जन्म तिथि के संबंध में जो कुछ भी कहा गया है, वह केवल तर्क तथा किंवदन्तियों के आधार पर ही कहा गया है।

कबीर पंथ में कबीर चरित्र बोध ग्रंथ का अत्यं महत्त्वपूर्ण स्थान है। इस ग्रंथ में कबीर की जन्म तिथि का बो करानेवाला एक दोहा दिया गया है जो इस प्रकार है।

चौदह सौ पचपन साल एक चन्द्रवार इक हाट हुए
जेठ सुदी बरसायत को पूरनमासी प्रकट भाए ।।

डॉ. श्यामसुंदर दास जी यह दोहा धरमदास का मान है। धरमदास कबीर के प्रमुख शिष्य थे। मान्यता है कि धरमदास ने ही कबीर के दोहों को शब्द रूप दिया है। हम देखा कि कबीर जन्म तिथि के संबंध में विदवानों में म भिन्नता है, उसी प्रकार कबीर का जन्म कहाँ हुआ इस बात को लेकर भी कोई निश्चित मान्यता स्थापित नहीं हो पायी है कबीर के जन्म स्थान संबंधी विविध विद्वानों ने अपने अप मत प्रकट किये है। डॉ. श्यामसुंदर दास कबीर के अतः सा के आधार पर कबीर की जन्म भूमि काशी ही मानते है।

तू बामन मैं कासी का जुलाहा, चिन्ही न मोर गियाना।

डॉ. श्यामसुंदर दास के अतिरिक्त आचार्य परशु चतुर्वेदी, डॉ. प्रभाकर माचवे आदि विद्वान कबीर का ज स्थान काशी मानते है। कबीर के गुरू संबंधी विचार अत् सुस्पष्ट है। सामान्यः कबीर के गुरू के रूप में रामानंद का न लिया जाता है। रामानंद को कबीर के गुरू के रूप में स्थापि करने का प्रयास अनेक विद्वानों ने किया है । डॉ. श्यामसुं दास रामानंद को ही कबीर का गुरू मानते है।

कबीर के काव्य में काव्य के तीनों गुण विद्यमान दिख देते है। प्रसंग के अनुसार कबीर माधुर्य, ओज तथा प्र गुणों से युक्त भाषा का प्रयोग करते हुए दिखाई देते है। कबी का समाज निरीक्षण अत्यंत सूक्ष्म था। कबीर का सम काव्य उनके प्रगल्भ सामाजिक चिंतन का परिचायक है। स्वयं भारतीय समाज व्यवस्था की दृष्टी से निम्नकुल ज था। वास्तविकता है कि भारतीय समाज व्यवस्था का सना ढाँचा ध्वस्त करने की मुहिम में जितने भी महापुरूषों के ना का आदरयुक्त उल्लेख होता है।

कबीर की जन्म तिथि जिस प्रकार विवाद का विषय

तुम्ही उपकारांची फेड उपकाराने केली तर तो व्यवहार झाला. त्यात काही भूषणास्पद नाही परंतु उपकाराची फेड उपकाराने केली तर ती एक प्रभावी शक्ती बनते. तिच्या समोर वाईट गोष्ट टिकत नाही. ही शक्ती वाढत जाते व अखेरीस तिचा प्रतिकार करता येत नाही.





उसी प्रकार कबीर की मृत्यू तिथि भी विवाद का विषय बनी हुई है। कबीर के निधन संबंधी कोई एक तिथि भी विवाद का विषय बनी हुई है। कबीर की मृत्यु के जो भी संकेत मिलते हैं वे सब अनिश्चयात्मक अंतः साक्ष्य, तर्कहीन, बहिः साक्ष्य तथा अतिशय श्रध्दा से निर्मित सांप्रदायिक जनश्रुतियों पर आधारित है। कबीर के निधन संबंधी जो लिखित काव्य सामग्री उपलब्ध है, वह इस प्रकार है

पन्द्रह सौ औ पाँच में मगह कीहों, गौन।
अगहन सुद एकादसी, मिल्यो पौज में पौन ।।
पन्द्रह सें उनचास में मगहर कीन्हो गौन ।
अगहन सुदि एकादशी मिलो पौन में पौन ।।
समन्त पन्द्रा सौ उनहत्तरा रहाई ।
सतगुर चली उठि हसा ज्याई ।।

इससे यह स्पष्ट होता हैं कि कबीर की मृत्यु तिथि के संबंध में विद्वानों में तथा कबीर पंथियों के मत में पर्याप्त अंतर है। कबीरपंथ में कबीर की मृत्यु संवत १५७५ में ही मानी गई है। मृत्यू के समय उनके संप्रदाय के लोग उनके साथ होंगे ही, अत उनके द्वारा कबीर की मृत्यू संवत १५७५ बताई जाती है वही प्रमाण मानी जा सकती है। साथ ही हम देखते है कि अधिकांश विद्वान कबीर के मृत्यु स्थान के बारे में एकमत दिखाई देते है।

सगल जनमु सिवपुरी गवाइया ।
मरती बार मगहरि उठ आइया ।।
बहुतु बरसं तपु कीआ कासी ।
मरनु भइया मगहर की बासी ।।
कासी मगहर सम बिचारी ।
ओच्छी भगति कैसे उतरसी पारी ।।

## * जिंदगी के रास्ते *

ये मत कहो खुदा से
मेरी मुश्किले बडी है ।
मुश्किलों से कह दो
मेरा खुदा बडा है।
आति है, आँधियाँ तो,
कर उनका सामना

तुफा से हुए है जलंद
खुदा ने तुझे बनायाँ तो
आते है रास्ते में काँटे तो,

उन से निकलकर
आगे बढते रहो
मंजिल तुम्हारी ।
द्वार पर खडे रहकर
राह देख रही है ।

ये मत कहो खुदा से
मेरे रास्ते बडे है।
रास्तों से कह दो
मेरा खुदा बडा है

कु. केतकी किरण काशिद, ११वी विज्ञान

केवळ जुन्या पुरान्या हस्तलिखित पोथ्यांचा आधार आहे एवढ्याच साठी कशावरही अंधपणाने विश्वास ठेवू नका. तुमची सारी जात विश्वास ठेवते आहे म्हणून सुध्दा कशावरही विश्वास ठेवू नका किंवा बालपणापासूनच विश्वास ठेवण्याचे वळण मिळाले आहे म्हणून ही एखादया गोष्टीवर विश्वास ठेवू नका. स्वतः सारासार विचार करा आणि असे विश्लेषन केल्यानंतर जर तुम्हाला दिसले की ती गोष्ट सर्वांच्या दृष्टीने हितकारी व चांगली आहे तर तिच्यावर विश्वास ठेवा. तद्नुरूप वर्तन करा आणि इतरांनाही तसे वागण्यासाठी मदत करा. – भगवान गौतम बुध्द

# कोशिश

कु. प्राजक्ता कमलाकर वाघ, १२ वी विज्ञान

जीतनेवाले कभी हार नहीं मानते और
हार मानने वाले कभी जीत नहीं सकते

आज सभी लोग अपने भाग्य और परिस्थियों को कोसते है। अब जरा सोचिये अगर एडिसन भी खुद को अनलकी समझ कर प्रयास करना छोड़ देता तो दुनिया एक बहुत बड़े अविष्कार से वंचित रह जाती। आइंस्टाईन भी अपने भाग्य और परिस्थियों को कोस सकता था लेकिन उसने ऐसा नहीं किया तो आप क्यों करते है।

अगर किसी काम में असफल हो भी गए हो तो क्या हुआ ये अंत तो नहीं है ना, फिर से कोशिश करो, क्योंकी कोशिश करने वालों की कभी हार नहीं होती।

मित्रों असफलता तो सफलता की एक शुरूवात है, इससे डरना नहीं चाहिये बल्कि पुरे जोश के साथ फिर से प्रयास करना चाहिये.

जो सफर की शुरूवात करते है,
वे मंजिल भी पा लेते है।
बस, एक बार चलने का
हौसला रखना जरूरी है।
क्योंकी अच्छे इंसानों का तो
रास्ते भी इन्तजार करते है।...

बार-बार मिल रही असफलता से कही बार मन करता है की अब छोड़ दूँ यह सब हार ही मान लूँ, यह सब अब मेरे बस का नहीं तब एक बात याद रखना हार मान लेने से कुछ भी हासिल नहीं होगा। लेकिन एक और कोशिश आपको सफलता दिला सकती है, एक और कोशिश आपको अपने अपनो का जीवन दे सकती है, एक और प्रयास आपकी सारी मेहनत, बलिदान और संघर्ष की कीमत चुका सकता है।

इस लिए अपने जीवन में कभी हार मत मानो और बार बार प्रयास करते रहो। "रूक जाना नहीं तू कही हार के कांटो पे चल के मिलेंगे साये बहार के ओ रही।"

सिर्फ इसलिए मत छोड दे, कि चीजे कठिण हैं क्योंकी शुरुवात हमेशा कठिन होती है।

असफलता तो जिंदगी का हिस्सा है पर फिरसे लडने के लिए तैयार होना यह जिंदा होणे की निशानी है।

मित्रों, अगर हम किसीभी यशस्वी इंसान को देखे तो उसे उसके जीवन में शुरू शुरू में असफलता ही मिली लेकिन उन्होंने अपने आप पर भरोसा रखा और प्रयास करते रहे और उन्होंने अपने जीवनमें यश प्राप्त कर ही लिया और सबके। लिए एक आदर्श व्यक्तिमत्त्व बन गए। सइसे मुझे कहानी याद आती है। कई सालों पहिले एक राजा था। उसका राज्य बहुत बडा था। उसके पास बहुत संपत्ती थी। लेकिन उस राजा के पास आत्मविश्वास की कमी थी। उसे लगता था की वह युद्ध कौशल्य में बहुत कमजोर है। वह युद्ध नहीं कर सकता। एक बार एक शत्रु ने उनके राज्य पर हमला कर दिया बहुत सैन्यबल होने के बावजूद आत्मविश्वास के अभाव के कारण वह राजा हार गया। अपनी जान बचकर वह पहाडोंपर गया और एक गुफा में छुप गया। एक दिन राजा गुफा में हताश हो कर बैठा था। तभी उसने एक चींटी को देखा। बह चींटी गुफा की दीवार के उपर जाने का प्रयास करती थी। लेकिन वह बार बार निचे गीर जाती थी। अंत में वह चींटी दीवार पर चढ ही गई। तब राजा ने सोचा अगर एक चिटी हार नहीं मान सकती तो में कैसे हार मान सकता हूँ। तब राजाने पुरे जोश के साथ सेना तैयार की और शत्रू पे आक्रमण किया और अपना राज्य वापस ले लिया।

इस कहानी में चीटीं ने राजा को हार न मानने कि सीख दी। संसार में छोटासा जीव भी कभी हार नहीं मानता। मेहनत और लगन से अपना काम पुरा कर लेता है। हम तो मनुष्य है हमारे पास तो बहुत शक्ति है फिर हम क्यों असफलता से डरे? असफलता आएगी तो हम उसे सफलता में बदल देंगे।

दिल में आशा होनी चाहिए
जीतने की, क्योंकी नसीब
बदलो या ना बदलो.
पर वक्त जरूर बदलता है।

एखाद्या माणसांत अहंभाव, अहंमन्यता असेल तर तेथे अहिंसा राहू शकत नाही. विनम्रते खेरीज अहिंसा अशक्य आहे.





# मोबाईल फोन

कु. फरीन राजु तांबोळी ११वी, सायन्स

ना पढाई कि कोई चिंता
ना भविष्य का कोई ध्यान
क्या टिकटॉक या पब्जी
पर खेल खेलना
क्या यही है तुम्हारा काम?

आज आधुनिक युग में मोबाईल फोन जितना उपयुक्त है उतना विद्यार्थ्यों के लिए हानिकारक बन गया है। हा! पर इस मोबाईल फोन के वजह से बहुत सी कठिनाईयाँ कम हो गई है। जैसे की हमें किसी गाँव में या शहर में जाना। पर हमें उसका पता मालुम नहीं है। तो हम मोबाईल फोन के गुगल मॅप द्रवारा हम उस शहर का पता देख सकते और उसके। द्रवारा हमें आसानी हो जाती है। और हमें कोई भी और किसी भी जगह की जानकारी हमे चाहिए तो हम वह मोबाईल फोन के वजह। हम उसें प्राप्त कर सकते है। अभी मोबाईल फोन में बहुतसे अॅप ऐसे है जिससे हमें बहुत-सा लाभ प्राप्त होता है। अभी तो हमें पढाई का कोई हिस्सा समझ नहीं आया तो हम मोबाईल फोन द्रवारा हम उसें अच्छो से समझ पाऐंगे।

जैसे सिक्के के दो अंग होते है। पैसे ही मोबाईल फोन के भी दो अंग है। एक जगह मोबाईल फोन हमारे लिए बहुत उपयुक्त है और दुसरी जगह वो हानिकारक भी है। हा! मोबाईल फोन यह नाम छोटे बच्चें से लेंकर बडे बच्चों तक एक मनोरंजन का साधन बन गया है। क्या यह हमारे लिए जान सें भी प्यारा है? जहाँ देखो वहाँ मोबाईल फोन का नारा है। व्हाटस्‌अप, इनस्टाग्राम. फेसबुक, हाईक इस के कारण सभी बच्चों का ध्यान पढाई से हट रहा है। मोबाईल फोन मनुष्य की अच्छी खासी जिंदगी को बिगाड सकता है और इस के कारण बच्चे - बच्चे अपनी पढाई लिखाई छोडकर क्या तो वह पब्जी खेल रहे है। जहाँ देखो वहा बच्चे अपनी पढाई छोडकर पब्जी खेल-खेलते समय बिता रहे है। ज्यादा कर बच्चे अपना वक्त इस मोबाईल फोन पर जाया कर देते है। अब तो माँ भी बच्चे को खाना खिलाते समय मोबाईल फोन उसे देती है। तभी बच्चा खाना खाता है। वही माँ उस बच्चें का भविष्य खतरे में डाल रही है।

आज कल दुर्घटनाँओं की संख्या बहुत ज्यादा बड रही है। क्योंकी लोग वाहन चलाते समय मोबाईल फोन प्रयोग करते है। इससे दुर्घटनाए होती है। अब तो मोबाईल फोन एक फैशन बन चुकी है। स्कुली छात्र मोबाईल फोन पर खराब आदतों का शिकार हो रहे है। क्या तो अब सभी घरवाले टिकटॉक अपने व्हिडीओ बनाने में व्यस्त है। माँ अपने बच्चे की पढाई लिखाई छोडकर उसके साथ टिकटॉक पे व्हिडीओ बना रही है। मोबाईल फोन के वजह से घर के लोग भी व्हाटस्‌अप पे ही घर वालों के साथ बात करते है। इस मोबाईल फोन के वजह से पहली जैसी कोई बात ही नहीं रही। अभ तो हम किसी से भी व्हिडीओ कॉल पे बात कर सकते उसे देख भी सकते है पर इस की वहज से घर में मेहमान आना कम हो गए है। मोबाईल फोन आने से सभी चीजे बदल गई है।

हा! एक तरफ स्वंय ही अपनी सुविधा के उपकरण बना रहा है, तो दुसरी तरफ स्वंय ही उनका दुरूपयोग कर मानवता के साथ खिलवाड कर रहा है। अतः सरकार को चाहिए की मानवता के साथ खिलवाड कर रहे लोगों के लिए सख्त से सख्त कानुन बनाए। विद्यार्थीयों को भी सोचना चाहिए की हमें दुनियाँ में सफल होना है या नहीं? वह प्रश्न हर विद्यार्थी के लिए आवश्यक है। और अपने माँ-बाप को भी बच्चों को ऐसे उपकरण बचपन में नहीं देने चाहिए।

विकास की आड में मानव इस कदर हो चुका अंधा है। खुद ही विकास और खुद ही पतन को दे रहा कंधा है। मोबाईल फोन में इंटरनेट है। आदि अनादि गुण विराजमान है पर विकास तो वही अच्छा हैए जिसमें सुख, चैन है और आराम है।

केवळ अक्षर ओळख हा शिक्षणाचा अर्थ नाही. अक्षर ओळख हे शिक्षणाचे केवळ साधन आहे. मन लावून आपल्या इंद्रियांकडून बालकाला उत्तम काम करण्याचे सामर्थ्य येणे हा शिक्षणाचा खरा अर्थ, आपले हात, पाय इ. कर्मेंद्रियांचा खरा उपयोग करण्याचे ज्ञान बालकाला येणे म्हणजेच शिक्षण.

# मनुष्य जीवन के कडवे सच

कु. वैष्णवी अनिल शिंदे ११वी, वाणि

लम्बा धागा और लम्बी जबान हमेशा उलझ जाती है। इसलिए धागे को लपेट कर रखे और जुबान को समेट कर रखे। मजा और पैसा दोनों सोच समझकर उडाने चाहिए। ये जीवन का कडवा सच है। ना लोगों को तो बस अपने फायदे पसंद है। ना लोगों को वायदे पसंद है। इसलिए हमेशा झुठी तारीफ करने वालों से दुरी बनानी चाहिए। सुना है तारीफो के फुल के बीचेसे मतलब की नदी बहती है। रास्ते में लुट लेती है। ये जिंदगी अकसर उन्हें जिन्हें खुद की किंमत का अंदाजा नही होता। ये इन्सान तुम जरा नीचे गीरकर देखो कोई नही आयेगा। उठाणे और तुम जरा उडकर देखो सब आयेंगे गिराणे। आज के समय रूपया कितना भी गिर जाए इतना कभी नहीं गिर पाएगा जितना रूपये के लिए इंसान गिर चुका है। यहा सच्चे इंसान को झुठे इंसान से अकसर ज्यादा सफाई देनी पडती है। किसी इंसान की अच्छाई पर तो हजारों सवाल उठते है। पर जब बात उसकी बुराई की हो तो लोग तुरंत यकीन कर लेते है।

आज के जमाने में ज्यादा अच्छा होना भी एक गलती ही है। लोगों को लगता है कि आप दिखावा कर रहे है। लोगों पर अच्छी नसीहतों का असर इसलिए नहीं होता क्योंकि लिखने वाले और पढने वाले दोनों ये समझते है कि यह नसीहत दुसरे के लिए है ना जाने लोग ये क्यों भुल जाते है। आपको हर वक्त पत्ता होता है कि आपके पास कितनी दौलत है लेकीन आप यह नही जान सकते कि आपके पास कितना वक्त है।

हमेशा उन लोगों पर भरोसा कीजिए जो आपकी यह तीन बातें जाने १) मुस्कुराहट के पिछे का दुःख २) गुस्से के पिछे छुपा प्यार ३) आपके चुप रहने के पीछे का कारण अगर जिंदगी में सफल रहना चाहते हो तो ये तीन बाते याद रखना जरूरी है।

लोग अफसोस से कहते है की, कोई किसी का नहीं लेकीन कोई ये नहीं सोचता की, हम किसके हुए इंसान की फितरत ही कुछ ऐसी है की जब जरूरत बदल जाती है तो उसके बात करने का तरीका ही बदल जाता है। जब बात किसी की अच्छाई की हो तो सब खामोश रहते है। लेकीन चर्चा किसी की बुराई की हो तो गुंगे भी बोल उठते है। किसी इंसान की फितरत पहचानना नामुमकिन हो गया है क्योंकि यहाँ लोग अपनी जरूरतों को हिसाब से चेहरे बदलते है। आपने की सौ गुनाहों पर परदे डाल कर हर शक्श कहता है की जमाना बहुत खराब है। अगर कोई अपना आपनो को धोका दे तो ये मत सोचना की वो इंसान बदल गया बल्की ये सोचना की उसका नकाब उतर गया।जब इंसान का बुरा वक्त आता है तो ऐसे नकाब उतरता है। बुरा वक्त बुरा नहीं बल्की अच्छा है बुरा वक्त हमको आगे के लिए संचेत करता है की आप गलत व्यक्ति के भरोसे बैठे है।

अजीब लोग है इस दुनिया में अगरबत्ती भगवान के लिए खरीदते है, और खुशबु खुद की पसंद की तय करते है अगर ढुंढणा ही है तो परवाह करने वालों को ढुँढेये। इस्तेमाल करने वाले तो खुद ही आपको ढुँढ लेंगे...। मतलबी लोगों ने दुनिया पर ऐसा असर डाला है की किसी को प्रमाण करो तो उसे ये लगता है की जरूर कोई मतलब होगा। हमको हमेशा अपने हिसाब से जीवन जीना चाहिए बदलती है। लोगों की सोच की क्या वो तो समय-समय पर बदलती है। चाय में मक्खी गिर जये तो पुरी चाय फेंक देंते है और जब घी में मक्खी गिर जये तो केवल मक्खी निकाल कर फेंक देते है लोगों का काम है कहना सर उठा कर चलोंगे तो कहेंगे कि अकड कर चल रहा है। सर झुका कर चलोंगे तो कहेंगे कि किसी कि तरफ देखता तक नहीं। तो कभी ऐसे लोंगों कि फिक्र मत कीजिए के कोई जो अपने मन को अच्छा लगे। हर चीज उठायी जा सकती है पर गिरी हुई सोच नहीं।

कचरे में फेकी हुई रोटियाँ ये क्या करती है की पेट भरने के बाद इंसान अपनी औकात भुल जाता है। पैर की मोच और छोटी सोच, हमें आगे बढने नहीं देती। टुटी कलम और औरो से जलन खुद का भाग्य लिखने नहीं देती। काम का आलस और पैसों का लालच हमें महान बनने नहीं देती। सब्र का फल मीठा होता है और समय किसी के लिए नहीं रूकता। यदी आप के चंद मीठे बोलोंसे किसी का रक्त बढता है तो यह भी रक्त दान है। यदी आपके द्वारा किसी की पीठ थपथपाने से उसकी थकावट दुर होती है तो यह भी श्रम दान है। यदी आप कुछ भी खाते समय उतना ही प्लेट में ले कि कुछ व्यर्थ ना जाए तो वह भी अन्न दान है। अगर आप अपने जीवन में परिवर्तन चाहते है। तो आज अभी और इसी वक्त शुरुवात कीजिए।

सपने और लक्ष्य में एक ही अंतर है। सपने के लिए बिना मेहनत की नींद चाहिए और लक्ष्य के लिए बिना निंद की मेहनत। अगर हम पेन्सील बनकर किसी कि खुशीयाँ नहीं लिख सकते तो कोशिश करो रबर बनकर किसी के गम मिटा दो।

जीवन का कडवा सच एक और भी है चिडीया जब जिवीत रहती है तब तो किडे मकोडे को खाती है। और चिडीया जब मर जाती है तो किडे मकोडे उसे खाते है। इसलिए इस बात का ध्यान रखो कि समय और स्थिति कभी भी बदल सकती है। इसलिए कभी किसी का अपमान मत करो कभी किसी को कम मत आंको तुम शक्तिशाली हो सकते हो पर समय तुमसे भी शक्तिशाली है। एक पेड की लाखों माचिस की तिलीयाँ बनाई जा सकती है। पर एक माचिस की तिली से लाखों पेड भी जल सकते है। इसलिए ये इंसान कभी गर्व से मत चल अपने आप पर गुरूर मत कर आखिर अंत में भी तेरी मिट्टी ही होनीवाली है।

(१)

ये दोस्ती का रिश्ता भी कितना अजीब होता है।
दुरिया होते हुए भी दिल कितने करीब होता है।
नहीं देखते हम रंग जाति और हेसियत का
क्योंकी ये सभी रिश्तों से ज्यादा अजीब होता है।

– कु. नेहल दोशी (१२ वी विज्ञान)

(२)

एक बेटी का कहना है।
मुझे पापा से अच्छी शाम लगनी है।
क्योंकी पापा तो बस खिलोंने लाते है।
लेकीन शाम तो पापा को लाती है।
छुपा लु पढाई को हातों में इस तरह
की टाईम पास करके की लिए इजाजत मागनी पढे
मदहोश हो जाऊँ किताबों में इस तरह

कु. स्वागता दोशी, १२ वी विज्ञान

## ✻ रूके न तु ✻

धरा हिला, गगन गुँजा नदी बहा, पवन चला.
विजय तेरी, विजय तेरी ज्योती सी जल, जला

भुजा भुजा फडक फडक रक्त में धडक धडक
धनुष उठा, प्रहार फर तू सबसे पहला वार कर

अग्नि सी धधक धधक, हिरन सी सजग सजग
सिंह सी दहाड कर, शंख सी पुंकार कर

रूके न तू, थके न तू, झुके न तू, थमे न तू
सदा चले, थे न तू, रूके न तू, थके न तू

कु. रेणुका सुजित कोरे, ११वी विज्ञान

तुम्ही उपकारांची फेड उपकाराने केली तर तो व्यवहार झाला. त्यात काही भूषणास्पद नाही परंतु उपकाराची फेड उपकाराने केली तर ती एक प्रभावी शक्ती बनते. तिच्या समोर वाईट गोष्ट टिकत नाही. ही शक्ती वाढत जाते व अखेरीस तिचा प्रतिकार करता येत नाही.

# भाषा और साहित्य

कु. विजया अजय महाडिक ११वी, विज्ञान

**अभिमान है, स्वाभिमान है, हिंदी हमारा मान है।**
**जान है, जहान है, हिंदी हमारी शान है।**
**गीता में लिखा गया है**
**न ही ज्ञानेन सदृश पवित्रसिहं वर्तते**
**तत्स्वयं योगसंसिद्ध कालेनात्मनि विन्दति**

अर्थात ज्ञान से बढकर हमारे जीवन में पवित्र कुछ भी नहीं है। यदि हम ज्ञान का सदुपयोग करें तो हमारा जीवन अत्यंत सुंदर और सुखमय बन सकता है।

